No. 33] *[2-7-1764*

असल बमोजीब नकल

श्री

राजश्रिया विराजित राजमान्ये राजश्री

हरि दामोदर स्वामी गोसावी यांसी

पौ रघुनाथ बाजीराव ना विनंति उपर येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. माहादजी सिंदे यास हुजूर यावयाकरिता वारंवार पत्रें पाठविली, परंतु त्याचा येयाचा प्रकार दिसोन न ये तेव्हां कारकूनहि पाठविले तथापि न आले. इतकियात सकूबाई येथे आली हे वर्तमान त्यासी कलल्यावर तेहि हुजूर आले. सरकारचे मुद्दे पाच लक्ष रुा द्यावे व खासा स्वारीबरोबर पांच हजार फौजेनसी यावे वगैरे सर्व मुद्दे कबूल केले. परंतु सरकारची मर्जी माारनिलेनी हमेशा सकूबाईच्या डेरियास जाऊन त्यांच्या च्यार गोष्टी आधिकउण्या सोसून त्यास राजी राखावे येविसी आज्ञाहि केली असता याप्रमाणें न करीत. येक महिना हुजूर होते त्यांत येक दिवस भेटीसहि न गेले. सकुबाई नित्य येऊन श्रमी होत, त्यांची भीड पडली सबब रा मानाजी सिंदे यासी सरदारीची वस्त्रें दिल्ही. माहादजी सिंदे यास तीन च्यार हजार फौजेची सरदारी सांगोण काही सरंजाम व काही नख्त याप्रमाणें द्यावयाचा प्रकार करीत असता ते न ऐकोण आज्ञेसिवाये पलोण गेले. त्याचे बंदोबस्ताची आज्ञा रा नारो कृष्ण याजकडील लोक बऱ्हाणपुरी आहेत त्यासी केली असे. तरी तुम्हापासी राऊत असतील, त्यानिसी त्याची कुमक करून महादजी सिंदे पुढे न

जात ऐसा बंदोबस्त करणे. जाणिजे छ २ मोहरम. तुम्ही त्याजकडील कारकून असतील त्यासी हाती घेऊन हर तजविजेने माहादजीचा आटकाव होये ते करणे. जाणिजे छ मजकूर बहुत काय लिहिणे हे विनंति.

¶*Raghunathrao writes to Hari Damodar saying that Mahadaji Sindia got alienated from him owing to his right of succession being transferred to Manaji. The addressee is asked to stop Mahadji proceeding to the North.*

No. 34] *[5-7-1764*

पौ छ १ सफर खमस

श्रावण मुा नाशीक

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी

गोसावी यांसीं

विनंती उपरी. तुम्हीं छ २१ जिल्हेजचीं पत्रें पाठविली ती छ ९ मोहरमी पावोन लिहिलें वर्तमान सविस्तर विदित जाहाले. रसदांचा ऐवज जमा करावयाविसीं पत्रें आली त्यावरून तमाम मामलेदारांस बोलावणी पाठविली आहेत. ऐवजाचा भरणा करावयाची सोय बालोबा आदिकरून सर्वांचे मते पुण्यातच फडशे करून ऐवज द्यावा. च्यार रुपये जाजती पडले तरी देऊ याप्रमाणें मामलेदार म्हणतात; परंतु श्रीमंताचे बोलावणे आले तेव्हा जाणे प्राप्त जालें. त्यास आषाढ शुध्द द्वितीयेस निघोन जाणार. तेथे गोलियावर जसी मर्जी तसें करूं म्हणून तपसिले लिहिले तें कलले. ऐशास तुम्हीं पुण्यातच असोंन माहालचें फडशे होते तर मातबर ऐवज जथोंन इकडे उपयोगी पडता. याजकरिताच येथून तीर्थरूपास पत्रें दोन च्यार वेल लिहिली कीं पुण्यास यावे; परंतु येणे न जाले. तुम्हासच तिकडे बलाविलें. ऐशास तुम्हीं तिकडे जातच आहा. तेथें जाऊन तीर्थरूपांस सविस्तर अर्थ समजाऊन च्यार रुपये अधिक जथत ते गोष्ट करणे; आणि ऐवज इकडे वरचेवर रवाना करीत जाणे. येथून रसदेच्या ऐवजी वराता जाहाल्या आहेत, त्यांचा ऐवज मुदतीप्रो पावता होय ते करणे. कृष्णाजी हरि यांची वरात पंचावन हजाराची जाली आहे. त्यास ऐवज राजश्री नारो आपाजी यासी बोलून पुणे सुभा व दाभाडी पारणे मिलून पंचेतालीस हजार रसंद करार केली, ते देविले व वीस खंडी गला पागेकडे खरेदी करून द्यावयाप्रो करार करून विल्हे लाविलें म्हणून लिहिले ते कललें. दाहा हजार रुपये वरातेपैकी राहिले ते हरयेक

यैवर्जा लाऊन देतो म्हणून लिा कलले. उतम आहे. रा छ ७ मोहरम सुा खमस सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Peshwa Madhavrao writes to Nana Fadnis asking him to explain matters to his uncle who had sent for the addressee at Nasik.*

No. 35] *[8-8-1764*

छ १० सफर

श्री

यादी ताकीदपत्रे :

१ पेठकर चिमणाजी दलपतराव राजे यास पत्र कीं नेवजी सुभेदार मौजे असे प्रो वाशळे येथे राहत होता. यास त्याने मौजे मजकुराचा पाटील संभाजी याजला घरास बोलाऊन त्यास जिवें मारिलें, आणि पाच सात घरे कबिल्या-सुधा पळोन गेला आहे; तरी तुम्ही आपले तालुकियात शोधं करून, याजला ठिकाणी लाऊन, राजेश्री रामचंद्र नारायेण कमाविसदार याचे स्वाधीन करणे म्हणून पत्र.

१ सदरहुप्रो वासदेकर राज्यास पत्र.

१ आपाजी हरि तालुके वाघेरा यास पत्र.

१ जव्हारकर राज्यास पत्र.

४

येणेप्रमाणे पत्रे की राजश्री रामचंद्र नारायेण पारपत्यास कोल्याचे पाठविले आहेत तरी तुम्ही सामील होऊन कोली मजकूर ठिकाणी लाऊन मशारनिल्हेचे स्वाधीन करणे. पौ रुबरू छ ९ सफर खमस सितैन मया व अलफ.

¶*Chimnaji Dalpatrao is ordered to find out and hand over Nevji Subhedar who had murdered Sambhaji Patil and absconded.*

No. 36] *[25-8-1764*

पौ छ १० जमाावल

श्री

राजश्री आनंदराव धुलप

गोसावी यासी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद. सुा खमस सितैन मया व अलफ. गोवेकर फिरंगी याणी आपणास

वस्त्रे पाठविली ते बज्रिनस हुन्नूर पाठविली. त्याचे मुबदला फिरंगीयासी बारासे रुपयेयाचीं वस्त्रें दिल्ही आहेत. त्याची आज्ञा करावी म्हणोन चिंतो नारायेण याणीं विनंती केली. यैशास फिरंगीयास तुम्हीं वस्त्रे पाठविली त्याची वाजबी किंमत आकारली असेल ते आरमाराचे हिसेबी खर्च लिहिणें; त्याप्रमाणे मजुरा पडेल. जाणिजे छ २६ सफर बहुत काय लिहिणे.

¶*Madhavrao Ballal informs Anandrao Dhulap that orders have been issued to make payment for the dresses sent to the Portuguese of Goa by Dhulap.*

No. 37] *[3-9-1764*


पौ छ २६ रोवल
खमस मुा भोगुर

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी
गोसावी यांसी

विनंती उपरी. तुम्हीं पत्र छ २२ सफरचें पाठविलें ते पावले. लिहिलें वर्तमान कललें. तोफखान्यांकडील सरंजाम पहिली रवानगी गोले सत्रासें चौतीस व पावणे दोन खंडी शिसें येक खंडी, एक मण दारू व दुसरी रवानगी पंचवीससें येकाहत्तर गोले, आठ खंडी दारू व अडीच खंडी सिसें याप्रों रवाना केले. मिरजहून पुढें न्यावयाची तर्तूद करावी म्हणून लिहा तों केवल त्यास पहिले रवानगीचा सरंजाम मिरजेस आला तेथे भाड्याचे बैल पाठविले आहेत, लस्करांत घेऊन येतील. दुसरे रवानगीचा सरंजाम मिरजेस पोहचला म्हणजे लस्करांत आणविला जाईल. वसईस विसाजी केशव यांस दारूगोल्याविसी दोन च्यार पत्रें पाठविली; परंतु अद्यापि काहीं तर्तूद होऊन न आली म्हणोन लिहा. त्यास दारूगोल्याची तर्तूद जरूर जाली पाहिजे. येक कारकून या कामांत नेहेमी विसाजीपंताजवल ठेऊन दारूगोला जो येईल तो आणून रवानगी करीत जाणे. विसापुरची दारू पुण्यास आणिलीच असेल. नवी पुटे देऊन तयार करून रवाना करणें. सोरा मिलत नाहीं म्हणोन लिहा त्यास प्रेत्न करावा, मेलवावा; पुण्यांतील कारखाना नीट चालीस लाऊन, दारू नवी तयार करून वरचेवर पाठवीत जाणें. कापडाविसीं दोन च्यार वेला तुम्हास लिहिलेच आहे; तर अखेर भाद्रपद कापड येथे येऊन पोहचे असे रवाना करणें. रा छ ६ रोवल सुा खमस सितैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Haripant Phadke writes to Balaji Janardan to replenish the store of ammunition to meet the needs of the army.*



No. 38] [24-9-1764

पौ छ २६ रबिलावल सुा खमस

श्री

सेवेसी बापूजी हरि पाटणकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ १७ रबिलौवल मुकाम किल्ले गंभीरगड येथें फौजसुंधा सुखरूप असों विशेष. स्वामीचे आज्ञेप्रमाणें किला सरकारांत आला; परंतु स्वामींनीं पांच रुपये दिल्हे नाहीं. राउताची व पागाची बेगमी पुरती नाहीं. लढाईचा दंगा पुरवतो परंतु (उ)पासाचा पुरवत नाहीं. घोडीं व बैल बहुत मेली. लिहितां पुर्वत नाहीं. नाासिकांतून च्यार हजार रुपये कर्ज घेतलें ते उडालें. किल्यास तू(ती) हजार रुपये लागतील, तेव्हां किंचित बंदोबस्त होईल. जखमीयांस खर्च बहुत लागतो. तीराच्या जखमा कठिण, मुलुक वैराण ऐसे हाल कोठवर लिहावे? परंतु स्वामीचे पुण्यप्रतापें ठिकाण आलें येणेंकरून दबाव भारी बसला; परंतु पर्जन्यामुळें उपाय नाहीं. माणूस उघडें थंडीनें हात पाय सुजोन मरतें. स्वामीस माझे हाल जे आहेत ते परभारेंच कलतील. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Bapuji Hari Patankar reports the miseries of his men and requests provisions for his starving garrison.*

No. 39] [24-9-1764

नकल.

श्री

राजमान्य राजश्री हरि रंगनाथ
दिा राजश्री नीलकंठ माहादेव
गोसावी यांसी

सेवक रघुनाथ बाजीराव नमस्कार सुरू खमस सितैन मया व अलफ. रा जगजीवन पवार व जीवनराव केशव याणी किले देहर घेऊन खानदेशामधी धामधूम करितात, याजकरिता सरकारची फौज राजश्री अंबादास बलाल दिा रा नारो कृष्ण याजबरोबर देऊन उभयेताच्या पारपत्याकरिता रवाना केले आहेत, तरी तुम्ही आपलेकडील परगणियातील लोक व राऊत जमा करून माारनिले-कडे जाणे. ते सांगतील त्याप्रो वर्तणूक करून पर्वताचे पारपत्य करणे जाणिजे. छ २७ रोवल आज्ञा प्रमाण.

¶*Raghunathrao orders Nilkanth Mahadev to proceed with his contingents and help Ambadas Ballal in quelling the disturbance created by Jagjivanrao Pawar and Jivanrao Keshao.*

No. 40] *[16-10-1764*

श्री

राजश्री तान्हाजी खराडे व
रघोजी गाढवे व आनंदराव
फालके गोसावी यासीं

अंखडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो राजे सदासिवराव रामचंद्र आर्सी-र्वाद. उपर येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत जावे विशेष. तुम्हीं पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन वर्तमान विदित जाहालें. उमेदवारीचा मजकूर लिहिला, यैसियास सांप्रत फौजेची तयारी जाहाली. मजल दरमजल जाणार. पेशजी पत्र आले असते तर उतम होतें. पूर्वीपासून घरचाच मजकूर आहे दुसरा अर्थ न जाणावा. येथील पुरता मनोदयानरूप बंदोबस्त जालियास तुम्ही पहिलेपासून पदरचेच आहां विसर नाही. सदैव पत्री पाठऊन संतोषवीत जावे. रा छ २० राखर बहुत काय लिहिणे, लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Sadashiv Ramchandra asks Tanhaji Kharade, Raghuji Gadhwe and Anandrao Phalke to be ready to join the writer's force which is about to start on an expedition.*

No. 41] *[23-10-1764*

पो छ ३ रोखर

श्री

राजश्रीया विराजित राजमान्य
राजश्री अंबादास बलाल स्वामी
गोसावी यासी

सेवक नारो कृष्ण सां नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष. तुम्ही पूर्वी पत्र पाठविले त्यात किले देहरचे उपरालियाविसी गीर्दनवाईचे काादारास वगैरे पत्रे सरकारची पाठऊन द्यावी म्हणून लिहिले त्यावरून हुजूरची पत्रे येणे प्राा

१ सटवोजी जाधवराव यासी
१ गणोजी सितोले
१ त्रिंबकराव सदासिव काादार पाा फुलमरी व कनड

१ हरि रंगनाथ दिा निलकंठ माहादेव
१ मौजे सायेगांव पाा देहेर येथील अमलाविसी

—

५

येकून पाच पत्रें सरकारची घेऊन पाो आहेत. प्रसंगोपाद्य लागलियासी उपयोगी पडतील तसतसी देऊन सरकारचे कार्ये करून घ्यावे. तुम्हाकडील वर्तमान तपसीलवार लेहून पाठवावे. पेशजी तुम्हास वरचेवर लिहीत गेलो आहो, त्याजप्रो तुम्ही सर्व गोष्टीस खबरदार वर्तणूक करीतच असाल. तुम्हाकडील पत्रें आली त्यात गोविंद खंडेराव दिा ताकपीर व विनायेक दामोदर ऐसे रवाना केले आहेत, त्याचा मजकूर ध्यानास आणून बंदोबस्त करून द्यावा म्हणोन लिा त्याजप्रो ते आलियावर येथास्थित असेल तैसेच होईल. अद्याप आले नाहीत. तुम्ही लिहाल म्हणून पाा शेंदुरणीकरास येथूनहि पत्रें लिहून पाठविली आहेत. आणखी ताकीदपत्रे हुजूरची जी लागतील ती लिहून पाठवणे त्याजप्राा पाठवीत जाऊ. आसपासची कामे काजेहि मनास आणीत जाणे. रुजुवातीचे कारकून माहालोमाहाली सरकारचे भामेर वगैरे गेले आहेत, त्याचा उपराला वरचेवर उतम प्रकारे मुरवत माहालेवाल्याची न धरिता करीत जाणे. भामेरकरास पंचवीस माणूस पिसोलाहून आम्ही देविले आहे. तुम्हाकडे लिहीत जातील त्याजप्रो करणे. देहर चालीस गावचा मोगलाई अमल तुम्ही फौजेचे खर्चास व्यावा येविसी सनदाच पाहिजेत ऐसे नाही. रा छ २७ रोवल सुरु खमस सितैन मया व अलफ बहुत काय लिा लोभ असो दीजे हे विनंति.

¶*Naro Krishna informs Ambadas Ballal that as desired by him letters have been despatched to Satvoji Jadhav, Ganoji Shitole and other Kamavisdars to send help to the fort of Deher.*

No. 42] *[25-10-1764*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक माहादाजी त्रिंबक कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी विज्ञापना ऐसीजे : स्वामीनी आज्ञा केली की दिलीचे कारभारामधे अंताजी माणकेस्वर याने थोडीसी चौकसी केली. पुरती चौकसी केली नवती तोच सात लक्ष रुपये तुमचे बापाकडे लागू केले. ते पुढे चौकसी होणेच होती तो यैवज सरकारात दाखल

आजपरियेत न केला. तुम्हीं गरिबीचा तोर बाहेर दाखवितात, परंतु तुमच्या भावाभावाची वाटणी दाहा पंधरा लक्षाची कमपेस जाली हाहि लौकीक आहे. येका दोघा मातवराचे दाखलियानें हे गोस्ट विदित जाली आहे. यैसे आसतां डोलेझांक करून काळ हरण करितात, तर या गोस्टीने परिणाम बरा होणार नाहीं. जर करितां हा माार खराखुरा आसल तैसा जाहीर करणे म्हणऊन आज्ञा जाली. त्यास मी बापाबाा दिलीस गे(लो) नवतो; परंतु सात लक्ष रुपये बापाकडे अंताजी माणकेस्वर यानी तफावतीचे लाविले हे गोस्ट लटकी आहे. जर करतां कमपेस काही आमचे अंगी लागली तर सरकारचे कझेदार जालो खरे. आज्ञेप्रो वर्तणूक करू. सरकारचा कइया हारून देऊ. दुसरी आज्ञा जाली कीं तुमचा बाप मेलियावर तुम्ही घरीं भावाभावाच्या वाटण्या केल्या, त्याहि वेलेस लाखो रुपये वाटणीस आले, म्हणऊन यैकिलियांत आले आहे; तर येकंदर किती यैवज वाटून घेतला तो जाहीर करणे. दर भावांस वाटणी किती किती आली ते लेहून देणे. चौकसीमुले तफावत निघाल्यास मुलाहिजा होणार नाही म्हणऊन आज्ञा. त्यास येकंदर यैवजाची वाटण्या साडेपांच जाल्या. चौघा भावाच्या च्यार मातुश्रीचा येक व भावजयेचा निमे येकूण साडेपाच हिसे वाटणी जाली. दर वाटणीस रुपये व दर आसामीस आजमासे रूपये ४५००० पंचे-तालीस हजार प्राां कर्जवाम नगनगाटीसुधा वाटणी जाली. या गोस्टीस कमपेस जालिया सरकारचे गुन्हेगार; व तिसर कलम आज्ञा की वाटणीचे वेलेस सरकारच्या लांझ्याबरहुकूम काही रुपये समाहिक काढून ठेविलेत, हे खरे की लटके ते लेहून देणे म्हणऊन आज्ञा. त्यास सरकारचा कइया अथवा अंताजीपंताचा कइया आम्हाकडे आहे यैसे आपले तीर्थरूपांच्या बोलन्यांत आपण यैकिले नाही; व आम्हीहि माहित नाहीत; परंतु तीर्थरूप हिंदुस्तानात सन हिदेत+ बोलले होते की जर करता सरकारचा कइया अंताजीपंताकडे लागोन, त्यासमधें रुा सरकारात देणे पडले तर आपणासहि मदत करावी लागेल. तीस पसतीस हजार रुपये पावेतो देणे पडतील. हे वर्तमान आमचे बंधु यादवराव तीर्थरूपासमागमे होते त्यानी सांगितले होते, इतकी मात्र माहितगिरी आम्हास आहे. त्यावरून वाटणीचे समई करार भावाभावात ठरला आहे की जर करता तीर्थरूपाच्या बोलण्या-प्रां रुपये देणे पडले तर वाटणीप्रो साडे पाच आसामी यानी द्यावे. याखेरीज आनत्र प्राा नाही. चौथीया कलमाची आज्ञा जाली की भावाभावाचें वाटणीचा कागद जाला आसल तो आसल कागद आणून दाखवणे. त्यास ते वाटणीचे कागद बाबूजी नाा कुकडे नगरकर याचे हातचा व यादवराव आपला भाऊ त्याची

+ इहिदेंत,

फारखती आम्हापासी आहे. व तिवा बंधूचे हातची त्याजपासी आहे. यैसी परस्पर फारखत्या ठरल्या आहेत. त्यास येका महिण्यात आणून देऊ. लिहिल्या मजकुरात तफावत कमपेश पडला तर आपण सरकारचे कझेदार व गुन्हेनार जालो. आज्ञेप्रो वर्तणूक करू. छ २९ रोवल सुा सन खमस सितैन मयां अलफ; सेवेसीं श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mahadaji Trimbak being called upon by Raghoba to explain certain embezzlements of Government monies, replies that the affair belonged to his father's time and that so far as he is aware he knows nothing of any amounts owed to Government, but that he is fully prepared to make good any defalcations if such could be conclusively proved against him by documentary evidence.*

No. 43] [*8-11-1764*

पौ छ २ सवाल

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बालाजी जनार्दन स्वामी गोसांवी यासी

पो माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहित जाणें विशेष. त्रिंबक जगनाथ वकील राजश्री हैबतराऊ निंबालकर यांजकडे बिडास असतात. त्यास खर्चास रुपये ५०० पाचसें देविले असेत. सरकारचा ऐवज बीड प्रांती (कोणा)कडे येणे असेल तर त्या ऐवजीं देवणें; नाही तर दुसरे ऐवजीं पावते करणें. रा छ १३ जोवल सुा खमस सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa writes to Balaji Janardan to arrange for the payment of the sum of Rs. 500 to Trimbak Jagannath, a Vakil of Haibatrao Nimbalkar, to meet his personal expenses.*

No. 44] [*24-11-1764*

१ पो छ ९ रजब खमस पौष

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यासी

पो रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. रा राजाराम गोविंद यांस किले पुरंदरचे मोर्चेबंदीस

पाठविले आहेत तरी यांस दारू व सिसे लागेल ते पुण्याचे दास्तानपैकी देते जाणे. रा॥ छ २९ जमादिलौवल सुरू खमस सितैन मया व अलफ बहुत काय लिहिणे हे विनंति.

¶*Raghunathrao orders Nana Fadnis to supply ammunition to Rajaram Govind sent to Purandhar against the Kolis.*

No. 45] *[25-11-1764*

पो॥ छ ४ जाखर

मु॥ तलेगाव बरोबर (?)

श्री

पुरवणी राजश्री अंबादास बलाल स्वामीस

इतकियांत मुलकी सरंजाम येकवटोन तुम्ही जाऊन तेथे ठेपावें. जेण्हेकरून त्याचे उठावणीस कमती पडे ते ते तजवीज योजावी. मेहेनतीचे दिवस आहेत. तुम्ही कराल. तुमची जरब त्याजवर पडोन त्यांची अवसान खत्ता जाली, गुंज मोडत चालली हें वर्तमान ताबडतोब आम्हास येऊन श्रीमंत संतोषाते पावोन खूष होत ऐसे करावें. जो कोण्ही सरंजाम द्यावयास अनमान करील त्याचे माहालापासोन मसलत म्हणून घासदाणा घेऊन खर्चवेंच करावा. तुम्ही ताबडतोब सरंजाम येकवटून त्याजवर जाऊन गाठ घालावी इतकियात सरकारची फौज व काही तोफखान्यापैकी तोफा घेऊन येतो. या कार्यास्तव जसजसी तरतूद तूर्त तुम्हास पाहिजे तसी करून येविसी कोण्हाची भीड मुरवत न करावी. बेजरब कर्तव्य तें करून बंड वाढो न द्यावे. उंगाच तोतिया भाऊसाहेबाचे नावाचा म्हणून अंदेशा करीत राहाल तर भाऊसाहेबाची रीत ऐसी नव्हे. सारांश ताबडतोब कूच करून गेलेच असाल. वरचेवर पत्रें पाठवीत जाणे. फौजेचा भरणा हुजुरून होत आहे. लवकरच तिकडे फौज पुर्तीसुद्धा येत आहो. त्यापूर्वी तुम्ही काही तरी तर्तूद करून हरतऱ्हेने दाखवावी. गोसावियांची झुंड गोला होते म्हणोन ऐकिल्यात येत आहे, त्यास याजमुळे लबाडीचे पारपत्य जेथ जेथ गोसावियाची ठावठिकाणें असतील त्याचे पारपत्य करावे लागेल. सारांश सर्व येकत्र होऊन जमाव पोख्त करून शहावर जाऊन दाखल व्हावे आणि बंदोबस्त करावा. तूर्त पैकाच पाहिजेसा जाहाला तर हरयेक माहाली तहसील असेल तेथून घ्यावा. पुढे समजावीश होईल.

---

१ पैशस्ती नानांच्या हातची. + येथून वळण निराळें.

आपल्या बाबतीहि येणे सर्वत्र आहेत. रा छ १ जाखर सुरू खमस सितैन मया अलफ, बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंति[१]

¶*Naro Krishna asks Ambadas Ballal to exert himself to the utmost in quelling the rising of the Pretender of Sadashivrao.*

No. 46] *[30-11-1764*

पौ छ ९ जमादिलाखर
मुा तळेगांव.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
अंबादास पंत स्वामी गो

पोष्य त्र्यंबक हरि कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता मार्गसीर्ष शु ८ शुक्रवार मुकाम किले देहरे सानी जाणून स्वकीये लेखन केले पाहिजे विशेष. किला मजकूर सरकारांत सर जाहला, त्यास राजश्री नारो कृष्ण दरवे म्हणतात की किला आम्ही सर केला व लक्ष्मण कोन्हेर म्हणतात की आम्ही घेतला. राजश्री राजाराम गोविंद म्हणतात की आम्ही किला घेतला व जीवनराव केशव म्हणतात कीं किला आम्ही सरकारांत नजर केला. यास्तव याचे चौकशीस हुजुरून आम्हांस श्रीमंतानी पाठविले. काल येथें दाखल जाहलों, त्यास याची चौकशी आज्ञेप्रों करावी लागते. यास्तव तुम्ही किला कसकसा सर केला, दग्याने घेतले, किंवा हमखास लढोन जरब पोहचाऊन घेतला किंवा फितुराने घेतला याचे कचे वर्तमान कळले पाहिजे. याजकरितां आपण येथे येऊन राजश्री बाजीपंतही येथे आहेत, समक्ष निवाडा होऊन जाहले वर्तमान निवाड्याप्रमाणे श्रीमंत यजमान स्वामीस निवेदन करून किला कोणाचे विद्यमाने घेतला याचे दस्तेवज जो असेल तो घेऊन सत्वर आले पाहिजे. लस्करचे कूच होऊन दरकूच चालिले. आम्हास त्वरेने हुजूर गेले पाहिजे. विलंब न करावा. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असो द्यावा हे विनंती.

¶*Trimbak Hari Patwardhan writes to Ambadaspant, calling on him to come personally with documentary evidence to prove who captured the fort Dehersani and by what methods.*

---

१ पत्र नारो कृष्णाचें तोतयाचे दंग्यासंबंधीं.

No. 47] *[1764 ?*

श्री

यादी श्रीमंत रावसाहेबास व राजश्री सखारामपंत बापूस पत्रे जे, तालुके अमदाबादची मामलत आपाजी गणेशाकडून दूर करून राजश्री गोपालराव गणेश यासी सांगितली असे. कारण की सरकारातहि यैवजाचा दरकार व मशारनिलेचे आगत्य, यास्तव याचे राहाणे पदरी जाले पाहिजे म्हणोन हे काम यांस सांगितलें असें, येविसी घालमेल करावयासी कोण्ही माजी कमाविसदाराचा पक्ष धरून तुम्हापासी रद्दबदली करील तरी ते कदापि न ऐकावी. यांस आम्ही वचन देऊन मामलत सांगितली असे. तुम्ही यांचे घालमेलीविसी कोणाचे न ऐकणे. यांचे मामलतीचे निभावणीचा करार यासीं आम्ही केला असे. येणेप्रमाणे पत्रे :

१ श्रीमंत रावसाहेबास
१ राजश्री बापूस

२

+ आपाजी गणेश याजकडून कराराप्रो यैवजाचा भरणा सालमाारी जाला नाही सबब व सरकारातहि यैवजांची वोढ याजकार (णे) गोपालराव गणेश याजपासून यैवज घेऊन आपाजी गणेशकडून मामलत दूर करून माारनिलेस सांगितली आहे. आम्ही यासीं वचन दिल्हे आहे. आपणहि याचप्राा देऊन माजी कमाविसदाराची रद्दबदली न यैकता यांचे हाते मामलत द्यावी. याप्रेाा दोन पत्रे द्यावी. देणे.

लिहिणे.

¶*Draft letter addressed to the Peshwa and Sakharam Bapu recommending the transfer of the Subha of Ahmedabad from the hands of Appaji Ganesh to Gopalrao Ganesh.*

No. 48] *[11-1-1765*

पो छ १८ रजब सन
खमस पोष

श्री

विज्ञापना[1] राजश्री सखारामपंत बापू मजवल बोलिले की, ब्राह्मणास वर्षासने पावतात त्याची चौकसी होत नाहीं. येक दोवाचे धर्मादायाची वर्षासने आली असें

+Raghunathrao's handwriting.

१ पत्र हरिपंत फडक्याचें नाना फडनिसास.

माझे कानास आलें. तेव्हां मी बोलिलों की अशा गोष्टी कधी होणार नाही. तेव्हां बोलिले की असें नसावेंच, परंतु मजला कानी पडली गोष्ट तुम्हाजवल सांगितली. हें वर्तमान स्वामीस कलावे म्हणोन लिहिले असें. चौकसी चांगली करावी. तेथे चौकसी होतच असेल, गुंता नाही, परंतु ऐकिले वर्तमान सेवेसी लिहिलें असे. हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke reports to Nana Fadnis what he heard from Sakharam Bapu about defalcations occurring in the allowances granted to Brahmins and suggests an inquiry.*

No. 49] *[28-2-1765*

पौ छ १६ रमजान

सन खमस

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री

नाना स्वामीचे सेवेसी

विनंती विशेष. ताा छ ७ रमजान जाणून स्वकीये लिहीत जाणें विशेष. मालवण इंग्रेजानी घेतले ते त्याचे उपयोगी नाही, ऐसे दर्शऊन दोन लाख रुपये घेऊन द्यावे, ऐसे सूत्र लाविले आहे. त्यास वकील सरकारचा तेथे मुंबैस आहे, त्याणे लिहिले कीं दोन लाखास देत नाही. त्यावरून अधिकहि कबूल करून करून घ्यावे म्हणून पुन्हा वकिलास लिहिले आहे. होता होईल ते खरे. आपणास कलावे म्हणून लिा असे. बहुत काये लिहिणे लोभ करावा हे विनंती.

¶*Letter addressed to Nana Fadnis reporting the news of Malwan being captured by the English and their proposal to sell it back.*

No. 50] *[28-3-1765*

पो छ ९ सवाल चैत्र

खमस सितैन

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रामचंद्र नारायेण साा नाा विा ताा छ ६ माहे सवालपावेतो सेवकाचे व तालुके सिवनेरचे वर्तमान येथास्तित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र

× मुळांत दोनदां हा शब्द पडला आहे.

सादर जाले. तेथे आज्ञा की, रा॥ तुलाजी आंगरे याचे लेक किले विसापुरी कैदेत होते, ते तेथून पुलाले ; त्यास याजकडील भट पेशाजी किले सिवनेर येथे कैदेत ठेवावयासी [illegible] आहे, त्याचे पाई बेडी घातली नसिल्यास नवी बेडी पायात घालून बहुत बंदोबस्त करून ठेवणे. घरातून याजला बाहेर पडू न देणे. विसापुराप्रमाणे हैगै जालियास कार्यास येणार नाही म्हणून आज्ञा. आज्ञेप्रमाणे भट मजकुराचा बंदोबस्त केला. बेडी पेसजीच घातली आहे. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Ramchandra Narayan, keeper of Shivner fort, reports to the Peshwa that according to his instructions iron fetters have been put on the priest of Tulaji Angria's son who fled away from Visapur.*

No. 51] [*23-4-1766*


पो छ २ जिल्हेज

श्री

सेवेसी गणेश मल्हार विज्ञापना मुकाम किले आसेर येथील वर्तमान तागा चैत्र शुध १४ बुधवारपावेतो स्वामीसाहेबाच्या कृपावलोकनेकरून सुखरूप आसो. इकडील वर्तमान तर श्रीमंत रावसाहेब तो राक्षसभुवणावर आहेत. माणसे सोडून आली. जाणार नासिकाकडे. राजश्री सखाराम बापू तो सासवडास गेले. नवाब निजामआली तो हैदराबादेकडे दरमजल कूच करून गेले. तिकडे आरकाटचे सुभा भागानगराकडे येतो म्हणोन मोगलाणे दरकूच करोन गेला. रो बाबूजी नाईक तो सोलापुरात आहेत. त्याजकडे फौजा रवाणा केल्या आहेत. रा॥ केसो गोविंदपंताकडे पत्रे पाठऊन त्याचे प्रतिउतर साहेबाकडे पाठविले आहे त्यामधे सर्व मजकूर लिहा आसेल. दुसरे पत्रे पाठविली होती तीहि आनंदवलीस यैवजाचे पत्र रो केसोपंत तात्याचे नावे लाखोटा होता तो वरचेवर जोडी जासुदाची रवाणा केली त्याचे उतर आले म्हणजे सेवेसी पाठऊन देतो. श्रीमंत रावसाहेबाचा लाखोटा येक आहे. भोसल्याकडून पत्रें आली तेहि पाठविली आहेत. आणकीचा किलेदाराने फारसी धूम केली आहेत, येवलेकर यासी फार उपद्रव मांडला आहे, वाट चालू देत नाही. वरकड वर्तमान तर येथास्थित आसे. सेवेसी विज्ञापना.

¶*Ganesh Malhar writes news of the movements of the Peshwa, of Nizam Ali and other items.*

6694



No. 52]

पैवस्ति छ १८ जिल्काद

खमस

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

विज्ञापना येथील छ १६ जिलकाद मुकाम जुनर साष्टांग नमस्कार विज्ञापना. छ १३ रोजचें आज्ञापत्र सादर जालें तें छ १५ रोजीं पावलें. तेथें आज्ञा कीं महमुद अलमखान माजी किलेदार किले सिवनेर हे कांहीं सांप्रत खुलामध्यें होऊन लोक जागा जागा जमा करून सरकारचे स्थळास दंगा करणार म्हणून वर्तमान कळलियावरून तुम्हांस आज्ञापत्र सादर केलें असे. तर स्थळोस्थळाचा बारकाईनें शोध करून मुदा ठिकाणीं लाऊन धरून हुजूर व किलेदार मशारनिलेस पत्र सरकारचें पाठविलें आहे हें देऊन हुजूर रवाना करणें म्हणून आज्ञा. यैसियासी बारकाईनें शोध आम्ही सदैव सर्वाचा, जे आपल्यास संशई आहेत त्यांचा, वरचेवर शोध करीत आहो. तर आजी आठ वर्षें हालीमाजीत व धन्याचे जाग्यास संभाळीत आहों. कोठें अंतर पडलें नाहीं. आलीकडे सरकारांत कोणी वर्तमान सांगितले तो ध्यानांतच असेल. जेथें संशय नसेल तेथें संशये आणिला तो कोण गृहस्त, त्यास पुरते मायेत घेऊन वर्तमान पुसोन (फाटले) सेवकास कळावयाची आज्ञा केली पाहिजे (फाटले) आगत्य जरूर पाठवावा. त्या (फाटलेले) चा पुरता शोध निघेल. असा गोष्टी आजि आठरा वर्षें किला घेतल्यास जालीं, परंतु कोठें संशये आढलला नाहीं. आणि त्यास त्याचे येजमानाचें ठिकाण नाहीं. मागें येक दोन वेळां दंगे जाले. तेव्हां कुटुंबे सुधां किले हाये येथें श्रीमंताचे आज्ञेनें राहत गेले. गुदस्तां श्रीमंत रावसाहेबाचीं स्वारी गंगापुरीहून आली ते समईं आम्हींचि नेऊन भेटविले. बहुत अंतरपुरःसर बहुमान केला. असो, असें असतां त्याचे प्रारब्धानें धाव घेतली असली तर नकले. कालगत विचित्र आहे. आम्हांस कोणाचा निश्चये समजत नाहीं. या भले माणसास उगेच दुखवावें, त्याचा मनांतहि नसतां त्यास संशयांत घालावें, येणेंकरून सरकारची नुकसानी आहे. तो गृहस्त आम्हांपासून बारा कोसांवर मौजे बेल्हे येथें राहतो. कर्जदार खर्चामुलें दोन वर्षें जाला. चाळीस पनास हजार रुपये कर्ज आपले मंडलीतील गृहस्तांचे आहेत. अन्नास मोतात जाली आहे. लजेस्तव आपले घरीं बसला आहे. तो कोठें पलत नाहीं. त्याचें शरीर बसले ठिकाणीहून उठवत नाहीं, यैसे आहे. स्वामीचे चित्तांत येईल कीं सांगितले काम करावें

तेथे बयाज कां लिहितात ? तर त्याचे वर्तणुकेस आम्ही माहीत आहों. सेवटीं लटकी गोष्ट पडलीयासी स्वामी शब्द ठेवितील कीं हुजुरून लिहिलें तथापि चौकसी करून जें कणें तें करावें होते, यास्तव येक वेल सेवेसीं लिहिलें आहे. याउपरीहि आज्ञा आली तर सिरसा वंद्य मा (फाटले) नाहीं. क्षणामध्यें सेवेसीं पावलें किंवा नाहीं. त्याचा भाऊ बापाचा पालक त्यासी (फाटले) आहे तो हालीं पुणियांतून * * * * * * * * * * * * पाहातांच तेथून जुनरास पलोन आला आहे हेंहि कलावें. सरकारचा लाखोटा त्याचे नांवाचा दिल्हा नाहीं, ठेविला आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The Subha of Junnar who had been instructed to make inquiries about the treasonous activities of his predecessor Mahamud Alam, who had surrendered the fort of Shivner to Balajirao Peshwa explains that the report received by Madhavrao must have been concocted by some interested party and has no real basis whatsoever.*

No. 531 [*14-6-1765*

पौ छ ८ मोहरम आषाढ

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
सिवाजी बलाळ गोसावी यासी

सेवक रघुनाथ बाजीराव नमस्कार उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणे विशेष. राजश्री त्र्यंबक खंडेराव याजकडे बाणाचा कारखाना घालावयास आज्ञा केली आहे. त्यास बाणाच्या कारखान्यास जागा जाली पाहिजे. यास्तव नासिकात दोन हजार रुपयाचे घर तयार करून देणे. माारनिलेकडील कारीगीर सांगेल त्या डौलाने घर तयार करून देणे. रुपयाची चौकशी तुम्ही करून लिहिल्या प्रो घर तयार करून देणे. जलदीचें काम आहे. जलदीनें तयार करवणे. जाणिजे छ २४ जिल्हेज. सुा सीत सीतैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Raghunathrao asks Shivaji Ballal to build and hand over to Trimbak Khanderao a house suitable for establishing a factory of rockets which he had been asked to start.*

No. 54] *[17-6-1765*

पो छ २७ जिल्हेज
वैशाख मुा वरकुंटे
पा इंदापूर

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री त्रिंबक भास्कर गोसावी यासी

सेवक माधवराव बलांल प्रधान नमस्कार. सुरु सीत सितैन मया व अलफ. रा नारो कृष्ण यास हुजूर बोलाविले असता येत नाही. बदमामलीची नजर दिसते. याजकरितां त्याचे पारपत्य जरूर जाले पाहिजे. सबब हुजुरून राजश्री मल्हार जगजीवन फौज सुधा रवाना केले आहेत. तरी तुम्ही पत्रदर्शनी आपले सरंजामी राऊत सुधा जलदीने बऱ्हानपुरास मल्हार जगजीवन याजवल जाऊन पोहचणे. दिरंग न लावणे, लोकास सिरोप न देणे. लांब लांब मजलीने जाणे. जाणिजे छ २४ जिल्हेज आज्ञा प्रमाण.

¶*The Peshwa Madhavrao Ballal suspects disloyalty on the part of Naro Krishna and orders Trimbak Bhaskar to proceed and join Malhar Jagjivan who was sent against him (Naro Krishna).*

No. 55] *[2-8-1765*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

सेवक दिवाकर पुरुषोतम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता छ १४ माहे सफरपर्यंत सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष.- साहेबी कृपा करून सेवकास पत्री आज्ञा केली, त्यास श्रीमंत येजमान साहेबाचे आज्ञेखेरीज नाहींत. गुदस्ता वोढीमुळे येण न जाल. घर बसल्या फौजेस तलब देत लागली. निरर्थक लोकाचा रुपया आंगावर आला. लोक कामावर पडते तर चिंता नवती. सांप्रत आज्ञेप्रमान गंगातीरास येजमान येतात. फौजेचा जमावं होईल. पुढे निर्वाह सर्व साहेबानी केल्याने स्थित राहील. नव वरस बंगाला, मालवा बंद. प्रतिवरसी दक्षणेतच काम पडत. सर्व अर्थ ध्यानात असतील. गुदस्ता रा सखाराम-पंत बापूस पत्रे तिनि च्यार पाठविली की आलियावर पोटास मात्र द्यावे. ते लिहीत की साफ मिलनार नाही, लवकर येन. तर जाऊन फजिती दिसावी यात काये आहे!

तेथे बयाज कां लिहितात ? तर त्याचे वर्तणुकेस आम्ही माहीत आहों. सेवटीं लटकी गोष्ट पडलीयासी स्वामी शब्द ठेवितील कीं हुजुरून लिहिलें तथापि चौकसी करून जें कर्णें तें करावें होते, यास्तव येक वेल सेवेसीं लिहिलें आहे. याउपरीहि आज्ञा आली तर सिरसा वंद्य मा (फाटले) नाहीं. क्षणामध्यें सेवेसीं पावलें किंवा नाहीं. त्याचा भाऊ बापाचा पालक त्यासी (फाटले) आहे तो हालीं पुणियांतून * * * * * * * * * * * पाहातांच तेथून जुनरास पलोन आला आहे हेंहि कलावें. सरकारचा लाखोटा त्याचे नांवाचा दिल्हा नाहीं, ठेविला आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The Subha of Junnar who had been instructed to make inquiries about the treasonous activities of his predecessor Mahamud Alam, who had surrendered the fort of Shivner to Balajirao Peshwa explains that the report received by Madhavrao must have been concocted by some interested party and has no real basis whatsoever.*

No. 53] *[14-6-1765*

पौ छ ८ मोहरम आषाढ

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
सिवाजी बलाळ गोसावी यासी

सेवक रघुनाथ बाजीराव नमस्कार उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणे विशेष. राजश्री त्र्यंबक खंडेराव यांजकडे बाणाचा कारखाना घालावयास आज्ञा केली आहे. त्यास बाणाच्या कारखान्यास जागा जाली पाहिजे. यास्तव नासिकात दोन हजार रुपयाचे घर तयार करून देणें. माारनिलेकडील कारीगिर सांगेल त्या डौलाने घर तयार करून देणे. रुपयाची चौकशी तुम्ही करून लिहिल्या प्रो घर तयार करून देणे. जलदीचें काम आहे. जलदीनें तयार करवणे. जाणिजे छ २४ जिल्हेज. सुा सीत सीतैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Raghunathrao asks Shivaji Ballal to build and hand over to Trimbak Khanderao a house suitable for establishing a factory of rockets which he had been asked to start.*

6696

No. 54] *[17-6-1765*

पो छ २७ जिल्हेज
वैशाख मुा वरकुंटे
पा इंदापूर

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री त्रिंबक भास्कर गोसावी यासी

सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार. सुरु सीत सितैन मया व अलफ. रा नारो कृष्ण यास हुजूर बोलाविले असता येत नाही. बदमामलीची नजर दिसते. याजकरितां त्याचे पारपत्य जरूर जाले पाहिजे. सबब हुजुरून राजश्री मल्हार जगजीवन फौज सुधा रवाना केले आहेत. तरी तुम्ही पत्रदर्शनी आपले सरंजामी राऊत सुधा जलदीने बऱ्हानपुरास मल्हार जगजीवन याजवल जाऊन पोहचणे. दिरंग न लावणे, लोकास सिरोप न देणे. लांब लांब मजलीने जाणे. जाणिजे छ २४ जिल्हेज आज्ञा प्रमाण.

¶*The Peshwa Madhavrao Ballal suspects disloyalty on the part of Naro Krishna and orders Trimbak Bhaskar to proceed and join Malhar Jagjivan who was sent against him (Naro Krishna).*

No. 55] *[2-8-1765*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

सेवक दिवाकर पुरुषोतम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना: येथील कुशल तागा छ १४ माहे सफरपर्यंत सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. साहेबी कृपा करून सेवकास पत्री आज्ञा केली, त्यास श्रीमंत यजमान साहेबाचे आज्ञेखेरीज नाहीत. गुदस्ता वोढीमुळे येण न जाल. घर बसल्या फौजेस तलब देत लागली. निरर्थक लोकाचा रुपया आंगावर आला. लोक कामावर पडते तर चिंता नवती. सांप्रत आज्ञेप्रमान गंगातीरास येजमान येतात. फौजेचा जमावं होईल. पुढे निर्वाह सर्व साहेबानी केल्याने स्थित राहील. नव वरस बंगाला, मालवा बंद. प्रतिवरसी दक्षणेतच काम पडत. सर्व अर्थ ध्यानात असतील. गुदस्ता रा सखाराम-पंत बापूस पत्रे तीन च्यार पाठविली की आलियावर पोटास मात्र द्यावे. ते लिहीत की साफ मिलनार नाही, लवकर येन. तर जाऊन फजिती दिसावी यात काये आहे!

स्वामीजीचे येने इकडे जाल्यास अगदी नेट न पुरे. जर आपले येन न होत तर येते. वडील धनी, आपन सर्व सांभालून घेतले असते. पुढेहि याजला हिमत येक पोटास पाहिजे. फौज आज्ञेप्रमान ठेवतील. गंगथडीचा येक रुपया आनत नाहीत. उलटे पदरचे सरंजामी फौजेस दगा जाला, हे वर्त(मान) साद्येत माहाराजास श्रुत आहे. हे येकनिस्ठ्यात अंतर नाही. सेवकान पायापासी विनंती केली, निरोपसमई ते स्मरन आहे. मुख्य ममता अंतरबाह्य येक असावी, दिसावी आज्ञांकित आहेत. दुसरा अर्थ नाही, हे विज्ञापना.

¶*Divakar Purushottam writes to Raghunathrao Dada explaining why his master the Bhonsle could not come and join forces with those of the Peshwa. He pleads financial difficulties. The letter is wholly autograph.*

No. 56] *[14-9-1765*

श्री

अपत्ये समान माहादाजी नारायण दिवेकर सा॥ ना॥ वि॥ ता॥ भाद्रपद वद्य १४ मंदवासरेपर्यंत यथास्थित असे विशेष. आपण पत्र पा॥ तेथें आज्ञा की पुरंधर येथील कोल्याचे दंग्यातील दागिने सोने रुपेयाचे व जवाहिराचे वगैरे याचे ताळेबंद मखलासी व्हावयाकरिता राजश्री नारोपंत नानास परवानगी जाहाली आहे त्यास पाठऊन देणे म्हणोन, त्याजवरून जवाहिराचे वगैरे ताळेबंद रा॥ सदासिवपंत टिळक नि॥ जनोबा दादा याजबराबर पा॥ आहेत. त्याचे फेरिस्त अलाहिदा आहे तेणे प्रा॥ घेऊन पावलियाचे उतर पा॥ आज्ञा करावी. आमचे धर्मादायाविसी स्मरण असिले पाहिजे. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना. जासूद व खा॥ बारदार पाठवावे. येथे कामकाज पडते. तेव्हा माणूस हाताजवल असिल्याने उतम आहे. हे विज्ञाप्ति.

¶*Mahadaji Narayan Divekar sends to Naro Appaji lists of the ornaments and jewels, etc., secured in the rising of the Kolis of Purandar and asks receipts for the same.*

No. 57] *[Received 18-11-1765*

पो॥ छ ४ जमादिलाखर
सन सीत सीतैन.

श्री

विज्ञापना. स्वामीनी पत्रे पाठविली ती पावली. राजश्री बज्याबाचा मजकूर लिहिला तो कळला. श्रीमंतास पत्र लि॥ आहे हे शफतपूर्वक दाखवणे म्हणोन आज्ञा. आज्ञेप्रमाणे विनंती करून पत्र हाती दिल्हे, तो बोलिले कीं मजकूर

कळला. त्यावरून मी विनंती केली कीं, नानानी मजला शफत घातली आहे. कागद वाचून पाहिला पाहिजे. त्यावरून अक्षरशा पत्र पाहिले आणि राजश्री बापू व राजश्री नाना यास सासवडास लिहून पत्रे पाा की आपा सासवडास आहेत, तुम्ही तेथे आहां तो घराऊ वाद्याचा फडशा करणे. फडशा जाला नाही तो आपाने लस्करांत येऊ नये. तीन हजाराचे गाव तोडून द्यावयाकरितां कारकून नेमिला आहे तो जाऊन नेमून देईल. याप्रमाणे उभयताचे पत्रात लिा असे. आपल्यास पत्र लिा असे. स्वामी म्हणतील कीं आमचे समाधानार्थ कीं लिहिता तर तसे लिहीत नाहीं. निकड करून विनंती करितो आणि जाबसाल होतो तो स्वामीकडे लिहून पाठवितो. यातील मुख्यार्थ हाच की स्वामीनी येथे विनंती केली तेच लक्ष आहे. मनांत एक बाहेर एक असे नाहीं. घराऊ वाटा जाल्याखेरीज आपा लस्करास आले तर कामास येणार नाहीं असे स्पष्ट लिा असे. मातुश्री आजीबाईस आपण बहुत प्रकारे सांगोन उतावळी न करावी. आपले मनोदयानरूप घडोन येते. गुता नाहीं. हे विज्ञापना.

¶*The writer Haripant Phadke informs Nana Fadnis that according to his instructions the letter was read out to the Peshwa who wrote in reply to Sasvad asking Bapu and Nana Purandare to get the domestic tension removed.*

No. 58] *[19-11-1765*

पो छ ६ जंमादिलाखर सीत
मागसीर्ष हा जिवाजी

श्री

विज्ञापना, छ ५ जमादिलाखर मुा अडलगांव नजीक चांभारगोदे वर्तमान यथास्थित असे विशेष. राजश्री कृष्णराव पारसनीस यांस आपण पत्र लिहिले होते. त्याचा जाब घेऊन पाठविला असे. आज येथे मुक्काम आहे. उदैक कूच करून मांडवगणचे सुमारे जातील. कळावे हे विज्ञापना. फौजेच्या नाल-बंदीच्या यादी खमसांत तोडजोड जाली आहे, त्या व सीतांत देणी आली आहेत त्या निराळ्याच आहेत, पाठवाव्या. येथे काम पडते याजकरितां पाठवा-वयास आज्ञा करावी. हे विज्ञापना. शागीर्दपेशाचे लोक पाठवावयाविसी आज्ञा एकदोन वेळा आली त्यास हरिपंत बवें काल आला. आतां नेमणूक करून घेतों व राऊत नेमून घेऊन पाठवितों हे विज्ञापना.

¶*Haripant writes to Nana Fadnis that Krishnarao Parasnis will soon proceed to Mandavgan and requests him to supply him with the pay-sheets of the army.*

+ पत्र हरिपंताचें नानाफडणिसास असावें.

No. 59] *[1765*

अभयपत्र राजश्री सदाशिव चिमणाजी तालुके मोकदम मौजे निरगुडसर ताा अवसरी प्रांत जुनर सुाासीत सितेन मया व अलफ. दिल्हे अभयेपत्र यैसीजे. देशमुख देशपांडीये ताा मजकूर याणी सुभा येऊन विनंती केली कीं सन १११२ मध्यें मोंगलाचा दंगा जाहला त्यामुळें गांव खराब पडिला. जूजवस्ती राहिली, याजकरितां साहेबीं कृपाळु होऊन सन ११७२ मध्य मौजे मजकुरास कौल चौसाला इस्ताावियाचा देऊन आबादी केली त्या कौलाप्रमाणें सन १११३ व सन १११४ दुसाला उगवणी केली. सालमजकुरीं तिसरे साल याची कौलाप्रमाणें उगवणी करावी त्यास प्रज्यन्य कमी जाहला याजमुळें खरिफ दरोबस्त गेले. रबीची जमीन पेरली नाहीं. गांव खरिपाचे पिकांचा, याजकरितां सालमजकुरीं इस्तावीयाची वेरीज पडली आहे, त्यांत सोड देऊन गांवचे जीवनमाफीक खंडणी केलियानें सालमजकुरीं उगवणी होऊन पेस्तर लावणी होईल त्याजवरून.

* * *

¶*Remission of revenue on the ground of scarcity of rain is promised to the village Nirgudsar.*

No. 60] *[1765?*

श्रीमंत दादासाहेब

इकडील वर्तमान वरचेवरी विज्ञप्तिपत्री सेवेसी लिहिलेंच आहे. पुढें होईल ते सेवेसी लिहोन पाठऊ. जाटानें झासीस यावयास बाकी ठेविली नव्हती, परंतु खावंदाचा पुण्यप्रताप समर्थ. किल्याचा सरजाम व जमाव पोख्त जाणोन पर्जन्य काळांत स्थलास अटकोन सा च्यार महिने शाहास काये गुतावे यैसें चितांत आणून तूर्त टाला देऊन ग्वालेर प्रांताकडे गेला असे. इकडील उपराला जलदीने व्हावयाविसी सरदारास वरचेवर आज्ञापत्रे सादर असवी. खासा स्वारीच हिदुस्थानांत आल्यावरी सर्व राजेरजवाडे शासनाक्रांत होऊन खंडण्या सरकारचे मर्जीप्रो देऊन फौजासुधा चाकरीस हाजीर राहतील. जाट मदोनमत्त हस्तीसारिखा सिंव्हस्थलाचा ठाई प्रसर धरू पाहातो तोहि हतपराक्रम होऊन स्वस्थलचि राहे. माहाराज सर्वज्ञ आहेत. सेवक लोकाही विशेष काये लिहावे? कितेक हद्दतार्थ राजश्री गोविद रघुनाथ यास लिहिले असेत. सेवेसी निवेदन करितील. ध्यानारूढ करून आज्ञा करणार स्वामी धणी समर्थ आहेत. श्रुत होये हे विज्ञापना. सरदारास वरचे(वर?) जलदीने इकडे यावयाविसी आज्ञा असावी.

¶*The writer reports to Raghunathrao the measures that he took to check the advance of the Jats on Jhansi.*

No. 61] [*Later months of 1765*

श्री

पुा वो रा विठलभट स्वामीस

सा नमस्कार. श्रीमंत दादाकडील तुमचे ठाई ममता कसी आहे ते लिहिणे म्हणून लिा यैशास तुम्ही येविसीची कालजी कदापि न करणें. बहुत संतोषी आहेत. सर्व प्रकारे दौलत राखिली म्हणून बहुत स्तव करितात. आमचे त्याचे कागदपत्रहि पुरंधरामुले खलले. आपलें कांहीं कोठे जात नाहीं. मुलाची गोष्ट म्हटली तरी याची सर्व प्रकारे खातरजमा की यासारखा दुसरा कर्ता नाही. याजला सोडू नये आसे चितापासून आहें; परंतु दादाकडील कल आम्हास जरूर राखावा लागतो. यास्तव याजला वाटतें कीं माझे लक्ष आसेल तेच करावें. बोलून दाखवीत नाहीं; परंतु चितातील भाव आहे. दुसरें दादाकडील किले कोट सर्व आपले लगामी आसावे, दादाचे माणूस दूर धरावे, आपले जवल करावे, हा भाव फार. याजकरितां खोटेपण करितो. हा पेच मोठा आहे. तथापि चितात विचारहि करितों की हे गोष्टीकरितां नासू नये. दौलतेस अपाय आहे आसे चितात येते. दादा लगामी लागेना, गोविंद सिवराम व मामा दादाजवल आहेत ते बहुत खटपट करितात. परंतु तेथे काही होत नाही, पुरंधराचे राज-कारण बिघडते. आबा जाते तरी चिंता नवती. आमचे वस्तु जेथवरी राखवेल तेथवरी राखतो. परंतु आबा न जाय आणि दादा स्वारीस गेले तरी आबाचे सर्वस्व जाते, काही राहात नाही, हा मोठा पेच आहे. सेवट काय होईल न कले. सारांश सगली मर्जी दादाची आणि आर्धी याची, यांत संशय नाही. या मुलापासून आमच्या जिवास आवरूस भय होणार नाही इतकें तर वलकट आहे. वरकड आमचे थोडे बहुत चालवावे असेहि आहे. येद्यपि घरी राहिलों तरी काही राऊत ठेवितील. जातीस पोटास देतात ते चालवितील, आसें माझ बुधीने वाटते. येंदा छावणीची चाकरी केली यानें बहुत उपकरी आहों. दौलत राहिली हे पुतें समजले आहे. याप्रा वर्तमान आहे. वाचून फाडून टाकणें हे विनती.

¶In this wholly autograph letter Sakharam Bapu explains to his family priest, the delicate situation in which he often finds himself owing to the strained relations subsisting between Raghunathrao Dada and his nephew Madhaorao. Bapu asserts that in his conduct he looks only to the interests of the State, and does not care for the good or bad opinion of the two masters whom he has to serve. In view of the charge of double-dealing usually brought against Bapu, this letter will be read with special interest and enable a student to assess Sakharam Bapu's worth correctly. The letter refers to Aba Purandare proceeding with Raghunathrao into north India, a point which justifies the date of the letter.

6701

No. 62] *[8-3-1766*

छ २८ रमजान

श्री

यादी पत्र निा भारतशाहा सुा सीत सितैन.

१ माहासिंग राजे न्याहारराव संवस्थान सावलीगड यास पत्र की भारतशाहा राजे यांचे तर्फेचे सिपाई व रयेत तुमच्या गावांस गेली. त्याजवर तुम्ही बदनजर ठेविली आहे म्हणोन विदित जाहालें; तरी हे गोष्ट कार्याची नाही. यांची रयत व सिपाई मकडाईस पोहचाऊन देणे. त्यांचे सुतलीच्या तोड्यास उपसर्ग न देणें. भारतशाहा यांजवर कृपा करून सरकारची चाकरी त्यांस सांगितली. सरकारच्या तर्फेने त्यांस तेथें ठेविले आहे. याचे निसबतीच्या लोकास व रयतेस उपसर्ग केलिया कार्यास येणार नाही. येणेप्रा सदरहूप्रा माहासिंग राजे न्याहारराव यास पत्र देवावे. देणे.

छ २६ रमजान फालगुन सीत सितैन: लिहिणे.

¶Raghunathrao orders a warning being issued to Mahasing of Savligad against the latter's ill-treatment of the subjects of Bharat Shah.

No. 63] *[13-3-1766*

पौ छ ६ सवाल मंगलवार

अधिक सुा देवीपुरा

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब

स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक विस्त्रासराऊ लक्ष्मण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वृत ता आधिक चैत्र शुा ३ स्वामीचे कृपाकटाक्षेकरून येथास्थित आसे. यानंतर स्वामीनी आज्ञापत्र सादर केले तेथें आज्ञा जे, राजश्री मल्हाजी होळकर याणी झासी तालुका ठाणीयासमेत सोडऊन स्वाधीन केला. मामलतीचे वर्तमान काहीच न लिहिलें व साल मजकूरचा यैवज येणे त्याची तर्तूद करून न पाठविली म्हणोन त्यास तालुकियाचे वर्तमान तर आपली आज्ञा घेऊन या प्रांते आलिया ता पांच वर्षे होत आली. स्थल मात्र किला सरकारचा रक्षून राहिलें. परस्पर

स्वामीस विदितच आहे. सांप्रत साल मजकुरी राजश्री मल्हारजी होलकर याणी झासीचा किला व ठाणी मात्र घेऊन दिली. नऊ महिने या प्रांतात राहिले. गाव-खेडी घरें व रयेत आदीकरून राहिली नाहीं. कोठे वस्तीचा लेश नाहीं. राज्यावर दाडमात्र ठरविला त्यापौ नगदी यैवज जो त्याच्या प्रयत्ने करून जबर-दस्तीने निघाला तो घेतला. राहिला यैवज त्याजवर कारकून सरदाराकडील संस्थानिकाकडे येऊन बसले आहेत. वायदे दोन तीन साला केले आहेत. आम्हास आजताा पैशास दर्शन नाही. मागेहि कर्जदार होऊन बुडलो. पुढे पैसा प्राप्त होणे दिसत नाही. सरदारानी रोजमरास देखील यैवज दिल्हा नाहीं. आजताा कर्जवाम करून किल्यास व फौजेस निममाही मात्र देत आलो. निम-माही लोकांचे देणे राहिले. लोकाचे पेचात येऊन धरणीपारणी सुटत नाहीत. परस्पर स्वामीनी शोध मनास आणावा आणि ध्यानारूढहि आसेल. पुढे आमचा परिणाम कोणे रितीने लागेल. मामलतीचा बंदबस्त कोणे प्रकारे करावा? उजाड प्रांत, आस्था काही नाहीं. येविसी आज्ञापिले पाहिजे. सर्व प्रकारे आधार स्वामीचे चरणाचा आहे. तीर्थस्वरूप राजश्री नारोपंत यास राजश्री मल्हारजी होलकर यानी बोलाविले. त्यास यांजला स्वामीची आज्ञापत्रे आली की हुजूर येणे. त्यावरून आशीरवाडियातून वडिलाचा निश्चय माघारे स्वामीकड जावयाचा जाला. आम्हास सरदाराचे सैन्यात वर्तमान कळलीयावर पांच वर्षे भेटी नाही, याकरिता सरदारची आज्ञा घेऊन वडिलाचे दर्शनास आलो. दोन तीन रोज उभाउभी दरकुच्यात समागमे राहून तैसेंच झासी प्रांते बिदा जालो. वडिलास आपलेकड जावयाची तांतड जाली. आम्हाकडील प्रांतचा बंदबस्त काहीच नाहीं. आजताा प्रथम दिवस आहे. पुढं धणी आज्ञा करितील त्याप्रो वर्तणूक करूं. पूर्वी या प्रांते पांच हजार फौज राहात आली तेव्हा बंदबस्त होत गेला. त्याप्रो स्वामीनी फौज ठेऊन पूर्ववत प्राा बंदबस्ताची आज्ञा केलिया जे होणे ते होईल. रजवाडीयाच्या बुधी ठिकाणी नाहीत. मस्त जाले आहेत. आम्हा-जवल फौज दोन हजार आहे तिची भक्षावयाची आवस्था या रितीची आहे. खावंद आपण आहेत, विदित व्हावे यास्तव कचे वर्तमान सेवेसी लिहीले आसे. सरंदारासहि येथील आर्थ लोपला नाही. त्याच्याच हातचे कारस्तान सर्व आहे. तेहि सेवेसी लिहीतच असतील आणि लिहितील. खासा स्वारी स्वामीची या प्रांते आलियावर सेवेसी येऊन सकलार्थ विदित करूं. पालण करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Vishvasrao Lakshman writes to Raghunathrao describing the general condition of the province under him, and reports the difficulties that he had in collecting the revenue from the people.*

6703

No. 64] [पो *23-4-1766*

पो छ १३ जिलकाद सन
सीत सितैन बाा रामजी
प्यादा दिाा बहिरजी मोऱ्या.

श्री

विज्ञापना. स्वामीनी स्वहस्ताक्षरपत्र पाठविले ते पावलें. अक्षरशा वाचून पाहिलें. अंतस्ते प्रमाणिकाचे मुखें वर्तमान ऐकिलें की, श्रीमंतानीं येकांती उंदग्रेह[1] काढिले कीं, नानावर यख्तियार टाकिला त्यामुले गर्व फार जाला. चिठ्या माडीवरून खाली टाकाव्या, खालून वरत्या टाकाव्या, वाल्याचे पडदे करून मौजा करितात, अशा कितेक गोष्टी बोलिले हे काय? तुम्हाजवल तों अशा गोष्टी बोलणे नाही. तथापि शोध करावा, खुलासा पाहावा; अशा गोष्टी येकून फार श्रमी जाले, म्हणोन पत्रीं आज्ञा केली ते सर्व कलले. ऐसियास, गर्व जाला, चिठ्याचा हा प्रकार, वाल्याचे पडदे या गोष्टी मजदेखत कधी निवल्या नाही. मग येकांती कोणांजवल बोलिले असतील त्या प्रमाणिकानेच स्वामीजवल सांगितल्या हें श्रीहरि जाणें. परंतु प्रायशा बुद्धीनें पाहाता इतके वाईट मनापासून असतें तर कांही ना कांहीं उद्गार निघता. परंतु ती गोष्ट जाली नाही असे दिसते. वरकड गोष्टी निघत नाही म्हटलें तर रात्रीस निजतेसमई जवल फार करून असतो, ते समई आपली गोष्ट नित्य निघते. श्रीमंत म्हणतात की, नानाचें पुण्य अधिक. उव्हाला[2] ठाऊक नाही. स्नानसंध्या करितात. तेव्हां मी विनंती करितों कीं, प्रातःकाली स्नान करितात. प्रहर दिवसपर्यंत देवपूजा करितात. तदोतर दोन प्रहरपर्यंत कारभार. मग भोजन. मग घटका कारभार. मग चार घटका निद्रा., फिरोन संध्याकालपर्यंत उद्योग. तदोतर * * पुराण बारा घटका रात्र होते. मध्यरात्र नित्य निजावयास होते असे सांगतो. इतके नित्य सांगावें लागत नाहीं. परंतु येकदोन वेला सविस्तर विनंती केली. नित्य संतोष मर्जी. समई गोष्ट निघाली तर ये समई नाना काय करीत असतील? तेव्हां प्रातःकाल, दोन प्रहर, तिसरा प्रहर, संध्याकाल, रात्र, ज्या समई गोष्ट निघते तेव्हा मी अमकें करीत असतील असे सांगतो. कां की,

---

१ उद्गार? २ आळस.

मजला सर्व समय ठाऊक आहेत. परंतु वैपरीत्य गोष्ट मुखातून कधीहि ऐकंण्यांत आले नाही. असे असतां इतका इतिहास स्वामीजवल कोणे सांगितला, त्यास कशावरून कललें तें जगंनिवास जाणें. वरकड प्रकृतीचा मजकूर म्हटले तर विश्वास कोणाचाहि नाहीं. त्यात कांही आहे तो आपले ठाई मात्र असे, कोठेहि बोलण्यांत दिसतें. अंतर्याम ईश्वरास ठाऊक. आपण लिहिले की, तुमचे विचारें जाल्यास हेच पत्र श्रीमंतास दाखवणें. त्यास, हे पत्र दाखवणें ठीक नाही व पुसावयाचेहि नाही व मनांत असलें तर सांगणारहि नाही. मग लटके विरुधास कारण करणे गरज काय? जे दिसी आपल्यास स्पष्ट कलेल ते समई सुचेल बुध तेणें विनंती करावी. ती गोष्टच नाही, मग पत्र दाखवणें हे यथास्थित नव्हे. याजकरितां वाचून ठेविले, कोणास दाखविलें नाहीं. आपण ये गोष्टीचा संकल्पविकल्प कांही चितात न आणावा. भेटीनंतर सविस्तर विदित करीन. मर्जी फार कठिण, विश्वास नाहीं. जन्मपावेतों विश्वासें कारभार केला आणि येक दिवस अंतर पडेल तर मागे चांगले केले ते आठिवणार नाहीत, ही प्रकृत स्वामीचे ध्यानांत पुर्ती आहे. असो. धणी आहेत. येकनिष्ठेने चाकरी करावी. मग पार पाडिणार जगंनिवास आहे. यांस मी फार भितों. सारा दिवस मर्जी सांभालितों. परिणाम आपलें पुण्य लावील. दुसरा कांहीं आपल्या-जेवल ऐवज नाहीं. माझे शरीर अशक्त; चाकरी फार कठिण. येक दिवस सेवटास गेला म्हणजे कृतकृत्य होतों. सार्वकाल जगंनिवासाजवल चिंतन हेच करितो की, आबरू रक्ष. विशेष लाभाची इछा धरीत नाहीं. स्वामीनी काय उणे केले आहे? फडनिसाचे चाकर म्हणवितो याजकरितां फार जपावें लागतें. आपले नावास बटा न लागावा हीच कायावागमनसा इछा आहे. येजमान यंदा आले ते दोन महिने लस्करांत राहिले. त्यांत येक महिना दुखणें जाले. सेवटीं पुण्याला गेले. मजला येक मास दुखणें जालें, परंतु च्यार घटका कोणी चैन पडो दिल्हे नाहीं. न करावे कामकाज तर कोणी वोढावयास नाहीं. जीवाभ्य श्रम करून मर्जी मात्र रक्षिली व पुढें काही दिवस बाहेर आहेत तों असेच करितों. माझे शरीर यंदा फार तुटलें. परंतु लाइलाज, उपाय नाहीं. तसाच फिरतों. येक वेल स्वामीचे पाय पाहिले म्हणजे सर्व पावेल. श्रीकृपेकडून दर्शन लवकरच होईल हे विज्ञापना.

¶*Letter addressed to Nana by Haripant Phadke reporting for his information Peshwa Madhavrao's attitude towards him. The letter is interesting and reflects the character of the Peshwa.*

No. 65] *[23-5-1766*

पौं छ १३ जिल्हेज

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
विस्वासरावजी स्वामीचे सेवेसी

पो. गंगाधर गोविंद साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ छ ११ जिल्हेज मु॥ लाहेरी जाणून स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. राजश्री श्रीधर विठ्ठल याजबराबर आपण पत्र व राजश्री महादजीबावा सिंदे याचे ताकीदपत्र पाठविले ते पावले, व सविस्तर मशारनिल्हेनी वर्तमान सांगितले त्यावरून कलले. एशियांस आपणास पेसजी रा. केदारजी सिंदे याणी सनदा पाठविल्या. त्यास केदारजीबावाकडून डोल रा॥ महादजीबावाकडे जाले त्याउपरी मशारनिलेनी आम्हाकडे सनदा पाठविल्या. आपणास तहगिरीची पत्रे एक दोन आली ती बजिनस आपणाकडे पाठविलीच होती. एसे असोन हली ताकीदपत्र पाठविले त्यास ताकीदपत्राची रीत ऐसी असत नाही. वरकड लहान मोठे सर्व कारभार करीत आले. आपणहि पत्राचा अन्वयें जाणतच असेल. आम्ही ल्याहवेसे नाहीं. आपण सनदा आमच्या पाहिल्याच आहेत. सविस्तर काय लिहिणे. पत्राचा अर्थ सविस्तर पंत मशारनिले लिहितील. बहुत काय लिहिणे लोभ असो दिजे हे विनंती.

¶*Gangadhar Govind complains to Viswasrao Lakshman about the illegality of the letter of injunction issued by Mahadji Sindia against him.*

No. 66] *[9-6-1766*

श्री

आज्ञापत्र राजश्री रघुनाथ बाजीराव ता॥ चौधरी व कानगो प्रा॥ भदावर सु॥ सबा सीतैन मया व अलफ. प्रो मजकूर राजश्री केदारजी सिंदे व माहादजी सिंदे याजकडे फौजेचे सरंजामाबद्दल करार करून दिल्हा असे तरी तुम्ही माारनिलेसी रुजू होऊन पो मजकुरचा अमल वसूल सुरलित देत जाणे. जाणिजे छ १ मोहरम.

¶*Raghunathrao issues orders to all chaudharis and kanugas to pay the revenue of Bhadawar to Kedarji and Mahadji Sindias.*



No. 67] [*June 1766*

श्री

राजश्री केदारजी सिंदे व माहादजी सिंदे यांसी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो रघुनाथ बाजीराव आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणे विशेष. तुम्हास फौजेचे सरंजामाबदल माहाल बीतपसील:.

१ प्रात कछवाघार

१ प्रात भदावर

२



येकून दोन्ही माहाल फौजेचे सरंजामाबद्दल तुम्हांकडून करार करून दिल्हे असेत. तरी सदरहू माहालचा अमल करून फौजेस खर्च करीत जाणे आणि सरकारचाकरी येकनिष्ठपणे करीत जाणे. रा छ १ मोहरम सुा सबा सितैन मया व अलफ.

¶*Raghunathrao grants the two provinces—Kachhwa and Bhadawar—to Kedarji and Mahadaji Sindia for the maintenance of the army and asks them to render loyal services to the Peshwa in return.*

No. 68] [*11-8-1766*

पौ छ ११ साखर

सन सबा.

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब

स्वामीचे सेवेसी

विनंति सेवक आज्ञाधारक दादो उधव चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ ४ माहे रबिलावलपावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून शेवकाचे व तालुके हायचे वर्तमान येथास्थित असे विशेष. इकडील सविस्तर वर्तमान लेखन करून शेवेसी पूर्वी पत्रें पाठविलीं आहेत त्यांचीं उत्तरें पाठवावयाची आज्ञा करणार स्वामी खावंद आहेत. यानंतर इकडील वर्तमान सांप्रत :—

इतलाखें[1] यैवज नेमणुकेप्रमाणें बहुत करून ज्याचा त्याजकडेस पावता केला. किले सातारा येथील बहेडीयास नेहेमी ऐवज व वराता लाऊन दिल्या

---

१ नक्त.

मामलेदार आपलाले ठिकाणी बहुत सावध आहेत. चौकसीनें वर्तणूक करितात. कोणेविसीं गुता नाहीं.

कलम १

सोलापूरचा किला अद्यापि हस्तगत जाहला नाहीं. राजश्री विसाजी कृष्ण राजश्री बाबूराव सदासिव यांजकडील मध्यस्तीकरिता सोलापुराहून पुणियास आले आहेत. येक दोन आडी मशारनिलेनी मातबर घातल्या आहेत. मुख्यत्वें कदीम सरंजाम देखील इंदापूर देऊन पूर्ववतप्रमाणें चालवावें त्याचा जाबसाल ठरल्यानंतर किला लौकरच स्वाधीन होईल. पुरंदरचा किला राजश्री नारो आपाजी याचे स्वाधीन करून वस्त्रें दिल्हीं. कोंडाजी नाईक वगैरे मातबर सारे कोली पुणियास आले होते. श्रीमंतास मोत्यांचा तुरा व सोन्याचा चंबू वगैरे थोडेबहुत जवाहीर नजर केले. श्रीमंतांही बहुमान करून समाधानपूर्वक मागती किल्यास रवाना केले. राजश्री रामचंद्र त्रिंबक यास हवालदार व सरनोबत सुधां देखील लोक उतराने पुणियास आणवावे म्हणून विचार जाहला होता, हें वर्तमान रामचंद्र त्रिंबक याणी सेवकास लिहिलें होतें, त्याजवरून श्रीमंत राजश्री रावसाहेबांस येथून विनंतिपत्र लिहिलें होतें कीं सोलापूरचा किला हस्तगत होये तोपरियेंत मशारनिल्हेची चाकरी लोकसुधा देखील हवालदार सरनोबत यांची पुरंधरींच होत्या त्यापैकीं दाहा हजार रुपये अपाजी गणेश याजकडील वरातेपैकीं तूर्त गैरादा जाहला आहे, व मुलकी यैवजांत बंडीमुळें वगैरे कमी आली, सबब खर्चाचे अजमासाप्रमाणें यैवजाची नेमणूक किले मजकूर व पागा दिमत राणोजी सिंदे यांसुधा करोन दिल्ही होती त्यास तीस हजार रुपये यैवज पाहिजे म्हणोन किलेकरी यांहीं हिसेब लिहून सेवकाकडे पाठविला. त्याजवरून हिसेब पाहून राणोजी सिंदे यास देवआज्ञा जाहली, किल्याचा बंदोबस्त राहिला पाहिजे, सबब आनंदवलीहून राजश्री केसो गोविंद यांजकडून गैरसंदी तूर्त दाहा हजार रुपये किला व पागा मिळोन रोख पाठऊन दरकदारास व मशारनिलेचे पुत्र धोंडजी सिंदे यांसी पत्रें लिहून वाटणी लोकास अदा पावती पाहून करावयाविषईं लिहिलें आहे. किले मजकूरचा बंदोबस्त उत्तम प्रकारचा आहे. राणोजी सिंदे यांचा काळ जाहला, तेसमई श्रीमंत राजश्री रावसाहेबांकडून किले मजकूरचे खबरदारीकरितां कारकून गेले होते. परंतु किलेकरी याणी किल्यावर न घेतां युक्तीचे वाटेनें समजाऊन माघारे लाविले. राजश्री गणेश विठल व किलेकरी येकविचारें वर्तणूक करितात. कोणेविशईं गुंता नाहीं येणेंप्रमाणें

कलम १

आणकाईकर किलेदारानी प्रांतांत उपद्रव फार केला आहे. सांप्रत श्रीमंत

घ्यावी. सोलापूर हस्तगत जाहलियावर आज्ञेप्रमाणें सर्व लोक हवालदार सरनोबत व मशारनिलेसुधां उतरोन जातील यैसी हुजूरची मर्जी आहे म्हणून लिहिलें होतें. त्याजवरून लोक व हवालदार सरनोबत किल्यावरच श्रीमंतांहीं ठेवऊन राजश्री रामचंद्र त्रिंबक यांस हिसेबाकरितां बोलाऊन पुणियासी आणिलें आणि बहुत प्रकारें समाधान करून हिसेब करून लोकांचा यैवअज देऊन किल्यास मार्गस्त करितो म्हणून सांगून अद्यापि पुणियासच ठेविलें होतें. किला हस्तगत जालियावर लोक नामजादी व दरकदार व रामचंद्र त्रिंबक आज्ञेप्रमाणें रवाना करून सेवेसीं लिहून पाठवितों. कलम १

गंगापूरचे मुकामी श्रीमंत राजश्री रावसाहेब आले होते, ते समईं हुजूरआज्ञेप्रमाणें सेवकानें विनंती केली व श्रीमंतांहीं आज्ञा केली. त्याचा सविस्तर मजकूर छ १३ जिल्हेजीं मुजरद जासूदजोडी समागमें लिहून पाठविला आहे त्यास त्याचीं उत्तरें सेवकास सादर जालीं नाहींत. प्रस्तुत पुणियाहून पत्रें आलीं आहेत. मजला पुणियास जावें लागतें. तेथें गेलियाउपर कितेक कामकाजाचे फडशे करून घ्यावे लागतील, याजकरितां कृपाळु होऊन आज्ञापत्रीं.उत्तर सादर करावयासी आज्ञा करणार स्वामी खावंद आहेत. कलम १

राजश्री रावसाहेबीं मजला आज्ञा केली कीं पुणियाहून कांहीं लोक व साहित्य पाठऊन देऊं. तुम्हीं आपलाले तालुकियाचे लोक अणऊन अणकाईस वेढा घालून हस्तगत होय तें करणें म्हणोन आज्ञा केली आहे. येविसीची शेवकास हुजूरची आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करीन, येणेप्रमाणें कलम १

इतलाख यैवज आनंदवलीहून तूर्त घ्यावा आणि मुबदला यैवज श्रीमंत रावसाहेबाकडून द्यावा म्हणोन समक्ष सेवकास आज्ञा जाली होती, त्याप्रमाणें आनंदवलीहून थोडाबहुत यैवज सारे तालुकियास हिसेब समजोन तूर्त जरूर जरूर घ्यावयाचा नजरेस आला त्याप्रमाणें पावता करून बोभाट कोठील ठेविला नाहीं. श्रीमंत गंगापुरी आले ते समईं इतलाख यैवजाची नेमणूक जाली आहे, त्याप्रमाणें द्यावा म्हणून विनंति केली. ते समईं उत्तर जालें तें बयाजवार लिहून छ १३ जिल्हेजीं मुजरद जासूद जोडी समागमें पत्रें पाठविलीं आहेत, त्याचीं उत्तरें सादर जालीं नाहींत व सांप्रत श्रीमंतास यैवजाकरितां पत्र लेखन केलें होतें त्याची आज्ञा आली कीं परगणे अमोद व परगणे भागेर या हरदु माहालाचा यैवज साल मजकूर सन सबा सितैनची रसद व सालगुदस्तां राजश्री महिपतराव आवजी याजकडून महाल दूर करून बालाजी बाबूराव याजकडे जसी सांगितली, त्यास कुल अकार पो माजी

श्रीमंत राजश्री राऊसाहेबाचे आज्ञा-पत्र छ २१ सफरीं सेवकास आलें. तेथें आज्ञा कीं परगणें अमोद व परगणें भामेर येथील मामल्याविसीं कितेक लोक दरबारी बोलतात, तरी तुम्ही लौकर येणें म्हणून त्यास हरदु माहालची मामलत हुजुरून विठल हरि याजकडे करार जाली आहे. मशार-निल्हेनी मामल्याचा बंदोबस्त केला. रसद करार केल्याप्रमाणें पेशजीं विनंतिपत्रें हुजूर लिहिलीं आहेत, त्याचीं उत्तरें येतपरियेंत पनास हजार रुपये तकूब ठेऊन येक लक्ष रुपयाचा भरणा करून दिल्हा. यैसा प्रकार जाहाला असतां पुणियास फिरोन मामल्याची घालमेल होणार यैसा भाव पत्रावरून दिसतो. त्यास पुणि-यासी गेल्यानंतर विठल हरिनी मामलत कबूल केल्यपेक्षां सरकारकिफायतीची गोष्ट दुसरा बोलत असेल ते तो विठल हरीस वाजबी गुंजाईस[1] असल्यास कबूल करावी लागेल. सरकारनुकसानी होऊन येतां येत नाहीं यैसा प्रकार समजोन विठल हरिकडून मामलत कबूल करविली आणि श्रीमंताचे विचारें हरयेकाद्याचे भिडेमुळें दुसरेयास मामलत सांगावीसी जाली तरी खस-खसीत जाबसाल करून विठल हरि-कडेसच मामलत करार करावयाची विनंती करावी किंवा श्रीमंत आज्ञा करितील त्याप्रमाणें वर्तणूक कमाविसदाराकडे वसूल यैवज पडला असेल तो वजा करून बाकी राहील तो यैवज इतलाख यैवज तालुकियासी नेमिला आहे त्या यैवजी वजा करून बाकी हिसेबी यैवज देणे निघेल तो देविला जाईल म्हणून आज्ञा जाहली. त्याजरून हरदु माहालचा गुदस्ताचा हिसेब आणावयासी कारकून पाठविले आहेत ते आले म्हणजे श्रावणमासीं हिशेब घेऊन पुणियास आले. तीन हरदुमाहालचा यैवज सालमजकूरची रसद व गुदस्ताचे अकार पो बाळाजी बाबूराव याजकडेस वसूल आला असेल त्यासुधां गुदस्तां अनंदवलीहून इत-लाख यैवज तालुकियार्सा दिल्हा आहे त्या यैवजीं मजुरा देऊन बाकी इतलाख तालुकियासी दिल्हा आहे त्यायैवजीं मजुरा देऊन बाकी इतलाख यैवज राहील तोच श्रीमंताकडून घ्यावा कीं काये येविशीची आज्ञा करणार स्वामी खावंद आहेत. कलम १

हरदुमाहालचा यैवज अलाहिदा आनंदवलीस घेऊन इतलाख यैवज नेमणुकेप्रमाणें श्रीमंताकडून मागोन घ्यावा यैसी मर्जी असलियासी आज्ञा होईल त्या प्रमाणें पुणियासी श्रीमंतास विनंती करून निकाल होईल त्या-प्रमाणें करून घेईन. कलम १

किले देहर निसबत राजश्री राजाराम गोविंद येथील वाडी बहुत दिवस बेचिराख होती, त्यास किला सरकारांत

---

१ नफा. In fiscal language it is applied to the capabilities of a village, particularly with reference to a proposed increase of revenue. (Wilson)

करावी येविसीची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत, सदरहूविसी मर्जीस येईल त्याअन्वयें श्रीमंत रावसाहेबांस पत्र पाठविलें पाहिजे.

कलम १

शहर बऱ्हाणपुरास पुणेहून राजश्री मलबा पानसी यासी फौजसुवा श्रीमंत रावसाहेबीं रवाना केलें त्याणी मोर्चेबंदी केली होती, येविसीचे सविस्तर असे-रीहून सेवेसीं लिहिलेंच असेल त्यावरून विदित होईल. कलम १

राजमंडळ सातारा वगैरे तालुके येथील बेहडा हुजूर होऊन वराता इतलाख यैवज देणे निघाला त्या यैवजीं दिल्या आहेत, त्यापैकीं यैवज गैरादा जाहला आहे, त्याविसीं पुणियास तालुकदारानी लिहिलें; परंतु तिकडून यैवज पावता दिसत नाहीं. आम्ही आनंदवलीहून देवावा तरी आज्ञा नाहीं. येविसीची आज्ञा कर्तव्य ते करणार स्वामी समर्थ आहेत. आज्ञा होईल तदनरूप वर्तणूक करीन. कलम १

नेहमी सरंजाम तालुकियाकडेस आहे त्याचा यैवज सन खमसचे अजमासें व येका दो तालुकियासी चढ घालून यैवज खर्चास लाऊन दिल्हा आहे, त्यास सन सीत सालगुदस्तां परजि-न्याचे आपत्तीमुळें कमी थोडा बहुत कोठे कोठें आकार नेमणूकसे जाहाला, त्यास मुबदला यैवज दुसरा दिल्हा पाहिजे. सबब तूर्त खर्चाचे नेमणुकींत अर्ज बाब वगैरे कलमे तूर्त खर्च न आलियावर किलेकरी याणी कौल देऊन वाडीची लावणी करविली. तेथें जगनाथ धोंडाजी निसबत नवाब निजाम अलीखान याजकडील कमा-विसदार वाडींत अमल बसविणार, त्यास सरकारचे किल्याचे पायेनाक्याची वाडी तेथें मोगलाईकडील अमल बसला म्हणजे किल्याचा आब राहणार नाहीं, आणि रोज बखेडे किल्यास होतील, किला सरकारात आणि पेठ मोगला-कडे यैसे कोणे जहागिरींत नाही, तरी जगनाथ धोंडाजी याजकडून वाडी दूर करून किलेकरी याकडे द्यावयाविसीं सनद सादर जाली पाहिजे. जगनाथ धोंडाजी याजकडे प्रांत देहरे आहे त्या नात्यामुळें किल्याचे वाडीसहि अमल बसविणार, परंतु बसूं देत नाहीं. विदित होये. कलम १

किले मुल्हेर निसबत बालाजी बाबू-राव येथें शामलाकडील बंदिवान असामी ९ नव होत्या त्या किल्यावरून पळोन गेल्या म्हणून मशारनिल्हेनी पत्र पाठविलें, त्यावरून शोधास माणसें पाठविलीं आहेत, व मशारनिलेसहि अतःपर यैशी गाफिली न करणें. किल्याची जागा बहुत खबरदारी करणें, म्हणून बरे वजेनेच लिहिले आहे. सेवेसी श्रुत होये. कलम १

अवंदा पुणियासी दरबारी कोकण-पटीचे तालुकदार आले आहेत, त्यांचे हिशोब बहेडे पाहून अमीन हजरनीस जमेनीस वगैरे असाम्या परकी व

केल्यास बोभाट सिबंदीचा होणार नाहीं, यैसी वजा करोन बाकी साल मजकुरीं जरूर जरूर यैवज द्यावयाचा तो देऊन तालुकदाराची व सिबंदीची समजावीस पाडून बोभाट वारलेत.

कलम १

मामलेदारानी पुणियास यावें म्हणून सर्वांस पत्रें श्रीमंत स्वामीचीं परभारें गेलीं होतीं. परंतु कोण्हीहि गेले नाहींत. हलीं मी जाणारच होतों, परंतु फार जलदीनें येणें म्हणोन हुजरे आले आहेत त्याजवरून निघोन गेलों. श्रीमंताची मर्जी मामलेदारानी यावें यैसी असलियासी मजला हुजूर निरोपसमईं आज्ञा जाली आहे त्याप्रमाणें विनंती करीन यैसें असतां फारच मर्जी असलियासी तालुकदाराकडील फडनीस दफ्तरदार मात्र बोलाऊन घ्यावे लागतील, यैसा रंग यैकिल्यांत व श्रीमंताचे पत्राअन्वयें दिसतो येविसीची आज्ञा.

कलम १

किले पुरंधर येथील जव्हाहीर आनंदवलीस दाखल जालें. त्याचा मजकूर बयाजवार राजश्री केसो गोविंद याणी शेवेसी लिहिला आहे त्यावरून श्रृत होईल.

सिबंदीपैकीं कितेक कमी तैनाता यैसी छयाटणी आरंभिली आहे, म्हणून सेवकाकडील कारकून नेहेमी पुणियांत दरबारी ठेविला आहे त्याचे पत्र आले होतें. हाली मीही जाणार तेथें गेल्यिाउपर कोकणपटीप्रमाणें कारभार करावयाची मर्जी श्रीमंताची नजरेस आलिया रदबदल करून गुदस्तां हुजूर बेहेडे आले आहेत त्याप्रमाणेच साल मजकुरीं खर्चाचे बहेडे करून घ्यावे कीं श्रीमंताचे मर्जीप्रमाणें खर्च कमीजाजती करणें तो करून बेहडे करून घ्यावे, येविशींची आज्ञा.

कलमं १

छ २० मोहरमचें आज्ञपत्र छ ३० सफरीं सादर जालें तेथें आज्ञा कीं परगणे डबई येथील सालमजकूरचा यैवज येणें त्याची नेमणूक किले हायचे बेगमीस करून देऊन सालमजकूरचे रसदेचा व हतेबंदीचा यैवज आनंदवलीस केशो गोविंद याजकडे भरावयासी पत्र राजश्री नरोत्तम किशोरदास व त्रिंबक सूर्याजी व सदासिव हरि कमाविसदार परगणे मजकूर यांस इकडून परभारें पत्र पाठविलें आहे, ऐशास तुम्हीहि चिरंजीव राजाराम यास विनंति करून येविशीं त्याचें पत्र त्रिवर्गाचे नावे घेऊन त्याजकडे पाठऊन ऐवज सत्वर केशो गोविंद याजकडे भरीत ते करणें. किले हायेची बेगमीस गुदस्ताचा यैवज पुर्ता पावला नाहीं व सालमजकूरचाही द्यावयाचा त्यास देणें.

हा यैवज तर फार नाहीं, याजकरितां अधिं मग देणे तो समजोन देणें म्हणोन आज्ञा, त्यास आज्ञेप्रो श्रीमंत रावसाहेबास विनंती करून यैवज अनंदवलीस भरवितों व तालुकीयास इतलाख यैवज द्यावयाचा तो जरूर जरूर समजोनच ज्यास द्यावयाचा यास फार करून देऊन बोभाट कोठील ठेविला नाहीं. बाकी ऐवज किल्याचा देणें राहिला आहे तो तोड-जोड करून जसा द्यावयाचा त्याप्रमाणें समयाचे समयास समजोन देतों.

कलम १

येणेंप्रमाणें सतरा कलमाचा मजकूर सेवेसी श्रुत होऊन सेवकास आज्ञापत्राचीं उत्तरें पाठविणार स्वामी खावंद आहेत हे विज्ञापना.

¶*A lengthy communication to Raghunathrao giving information about various matters such as the seige of Sholapur, the rising of the Kolis at Purandar and other matters. The paper supplies a good review of the general situation.*

No. 69] [*24-10-1766 ?*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक दादाजी गंगाधर+ परगणे जुन्नर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागाईत छ १९ माहे जमादिलावलपावेतों सेवकाचें वर्तमान येथास्थित असें. यानंतर आपलें शरीरीं समाधान नव्हतें, वेथा भारी याजकरितां राजश्री उधो वीरेश्वर याजसमागमें राजश्री माहादाजी गणेश सेवेसीं श्रीपंढरपुरचे मुकामीं पाठविले होते, त्याणी सविस्तर वर्तमान सेवेसी निवेदन केलेंच आहे. मोगलाची समजावीस काढून किला सरकारांत घ्यावा, यैसा करार करून सरकारचें निशाण उधोपंतासमागमें देऊन रवाना केलें, तें छ ११ जमादिलौवलीं जुनरास

+ चंद्रचूड.

दाखल जाहालें. किलेयावरून मोगल कबिलेसुद्धां छ १७ रोज खाली उतरोन शहरांत आला. छ १८ रोजीं अभि(जि)त मुहूर्तीं सरकारचें निशाण व लोक घेऊन किलेयावर चढलों. सरकारचे आज्ञेप्रमाणें किले यांचा बंदोबस्त राजश्री उधोपंतीं केला. सेवकास आज्ञा जाहली आहे कीं निशाण चढऊन तुम्ही हुजूर येणें, त्यास आज्ञेप्रमाणें सेवेसी यावें, त्यास शरीरीं वेथा निर्मुक्त जाहाली नाहीं याजकरितां चिरंजीव राजश्री बाबाजीपंत सेवेसी रवाना करितों, सर्व वर्तमान निवेदन करतील. आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. शरीरीं समाधान जाहालेंयावरी राजश्री धोंडो अनंत व आम्ही सेवेसी येतों. सेवेसी श्रुत होये हें विज्ञापना.

¶*Dadaji Gangadhar reports occupation of the fort of Junnar surrendered by the Nizam.*

No. 70] [*6-9-1766*

पौ छ १ रबिलाखर

श्री

पुा सेवेसी विज्ञापना. सुतार ठेऊन तमाम तोफांचे गाडे तयार करणे म्हणोन आज्ञा येशास सुतार येथे कसबी नाहींत. याजकरितां दाहा पाच सुतार कारखान्यातील कसबी आले म्हणजे त्यांच्या हाताखाली इकडील सुतार देऊन तमाम गाडे तयार होतील व येथे लोहार कसबी नाहीं. आहेत ते कारागीर चांगले नाहींत. यास्तव दोनच्यार दुकाने तिकडील आल्याने सर्व कामाचा बंदोबस्त होईल. तोफाचे फर्मे पाठऊन देणे. त्याप्रो गोल्याची तरतूद केली जाईल म्हणोन आज्ञा, त्यावरून बतीस तोफांचे फर्मे पाठविले आहेत. गोल्याची तरतूद करणार स्वामी समर्थ आहेत. येथील किल्यातील गोल्याची मोजदाद करून तपसीलवार सेवेसी पाठविली आहे त्यावरून निवेदन होईल. थोरा तोफाचे गोले तूर्त येथे आहेत. लहान तोफाचे गोले येथे बेगमीचे नाहींत. याजकरितां दर तोफास निदान पांचपाचसे गोले असावे. यांत स्वामीच्या मर्जीस येईल त्याप्रो तरतूद करणार स्वामी समर्थ आहेत. वरकड किल्यातील कांहीं मोजदाद जाहली. थोडी बहुत व्हावयाची आहे. आजच्या रोजात सारी मोजदाद करून उदईक सेवेसी लिहून पाठवितो त्यावरून निवेदन होईल. थोर तोफाचे गोले आहेत, परंतु फारसे नाहींत. जाकिऱ्यास[1] असावेच याजकरितां त्याची तरतूद करणार स्वामी समर्थ आहेत. विदित जाले पाा हे विज्ञप्ति[2].

¶*The writer informs the Peshwa of the progress of the repair of guns and of the manufacture of ammunition.*

---

१ जड सामानसुमान. २ तोफखान्याविषयीचें पत्र.

No. 71] *[6-12-1766*

श्री

राजश्री नारो कृष्ण गोसावी यांसी

सुा सबा सितैन मया अलफ. तुम्हास स्वारी बाा येणे म्हणोन दोन तीन वेळा रूबरू आज्ञा केली, व पत्रेंहि पाठविलीं, ऐसे असतां अद्याप न आलां, हें उत्तम नाहीं. तुम्हांस येविसीं राजश्री बाळाजी जनार्दन सांगतील, तर तुम्ही हुजूर येणे. न आल्यास हुजुरून खिजमतगार पाठविले असत हे घेऊन येतील. पष्ट समजोन वर्तणूक करणे. जाणिजे छ ३ रजब बहुत काय लिहिणे.

¶*The Peshwa summons Naro Krishna to appear before him at once.*

No. 72] *[29-12-1766*

श्री

राजश्री बाळाजी जनार्दन
स्वामी गोसावी यासी

विनंति उपरी. राजश्री बाबूजी नाईक यांचा ऐवज आजमासे येक लक्ष तेरा हजार नख्ती सरकारात आला. त्यापैकी चाळीस हजार रुपयांची वरात आलाहिदा होईल. बाकी रुपये ८३००० त्र्यासी हजार रुपये देविले असेत. यासी ऐवज कर्ज घेऊन देणे म्हणोन पेशजी लिाच आहे. त्यास राजश्री गोंविंद सिवराम लिहितील त्याप्रो ऐवज पावता करणे. रा छ २६ रजब सुा सबा सितैन मया व अलफ. ऐवजाकरितां यांचा खोलंबा जाला असी गोष्ट न करणे. रा छ मजकूर हे विनंती.

¶*Nana Fadnis is asked to remit Rs. 83,000 according to instructions that would be received from Govind Shivaram.*

No. 73] *[Dec. 1766*

श्री

सेवेसी केसो गोविद चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ माहे रजबपावेंतो मुकाम किले अनंदवली येथे स्वामीचे कृपेकरून

सेवकाचे व किले मजकूरचे वर्तमान मजकुराची कलमें येणेप्रमाणे :—

साल मजकूर व साल गुदस्तचे तालेबंद येणेप्रमाणे—

२ खासगीकडील

१ साल गुदस्त सन सीत

१ साल मजकूर सन सबा

—

२

२ सरंकारी

१ साल गुदस्त

१ साल मजकूर

—

२

१ खासगी व सरकारी मिलोन येकंदर तालेबंद

—

५

येकून पाच तालेबंद आबाजी जासूद जथे भवानजी नाईक सेलके याजबराबर पाठविले आहेत. सेवेसी प्राा होऊन जमेचा व खर्चाचा आजमास ध्यानास येईल. पुढे अखेरसालपावेतो खर्चाचा आजमास करून पाठविला आहे त्याजवरून सर्व शृत होईल. पुढील बेगमी करणार साहेब समर्थ असेत. कलम १

किल्याच्या दरवाज्यापासून सात घरापासी भोजनशाला नवी करविली आहे तेथपर्यंत फर्ष च्यार हात रुंदीचा कर्णे म्हणून मोघम आज्ञापत्री येथास्थित असे विशेष. येथील बितपसील

तोफखानापो कारखाने जयवंतराव येशवत व त्रिंबक खंडेराव यांजकडील बाणाचे व गोल्याचे कारखाने आहेत. त्यास तूर्त खासा स्वारी मोहीमसीर याजमुळे बाणाचा व गरनालेच्या गोल्याचा उपयोग नाही. खासा स्वारी देसी आल्यावर मातबरच कारखाना लावावयाचा आहे. याजकरिता कारखाने महकूब कर्णे. कारण की खर्चाची वोढ. यास्तव कारेगार मात्र यास थोडेबहुत खर्चास देऊन ठेऊन घेणे. बाकी कारखाना बंद करणे. परंतु जोपर्यंत खर्चास आसल तोपर्यंत मना न करणे. खर्चाची वोढ आसल्यास बंद करणे. कारेगारमात्र यास खर्चास देत जाऊन बाकी बद करणे म्हणोन आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणे जोपरियेत पोतास यैवज आहे तोपरियेत कारखाना चालतच आहेत. यैवज सरल्यास कारेगारास मात्र ठेऊन बाकी कारखाना बंद करितो. कलम १

श्रीकडे निा सखाराम कृष्ण आगाशे हा आम्हांस नित्य हटकितो की नवा सिसवीचा देव्हारा आहे त्याजप्रो करून देणे यैसी आज्ञा आहे म्हणोन सखाराम म्हणतो. नवा देव्हारा केला तरी च्यार रुपये खर्च होईल. लाकूड, सुतार, रुपीयाच्या पट्या व खिले, कोईडे यैसे लागतील. गैरसनदी खर्च कसा

आज्ञा. त्यास आनंदवलीच्या दरवाज्यापासून * * त घरपावेतो काली जमीन पर्जन्यकाली चिखल भारी होतो, याजकरिता भुईत गज सवा गज पाया भरून भुईवर पाव गज खुला ठेवावा * * उपयोगी पडल. वरील पाठ थर चुनियात बसविला पाहिजे. नाही तरी पर्जन्यकाली पाऊसाने काली भोई फुगून दगड चिखलात * * ऊन जातील. तेव्हा खर्च करून सेवटी उपयोग नाही. येविसी पूर्वी दोन वेला सेवेसी विनंतीपत्री विनंती लिहिली होती की चुना लावावा की नुसतेच काले मातीत दगड बसवावे. चुन्यात दगड बसविल्यास च्यार रुपये आधिक लागतील परंतु काम पके, पर्जन्यकाली उपयोगी होईल. मातीत दगड बसविले, पाया न खटला तरी पुढे उपयोगी पडणार नाही. याउपर जैसी मर्जी आसल तैसी आज्ञा उगऊन आल्यास आज्ञेप्रमाणे होईल म्हणौन विनंती लिहिली होती. त्यांची उतरे आद्यापि आली नाहीत. हा काळपर्येत मार्गप्रतीक्षा केली. निदानी निर्उपाय. खासा स्वारी आली आणि फर्ष न जाला तरी सेवकावर बेमर्जी होईल याजकरिता फर्षास आरंभ केला आहे. भुईत व भुईवर मिळून सरासरी पाव गज उंच व तीन गज रुंद (आ)सा क़रावयास आरंभ (के)ला आहे. त्याचा आजमासहि इर्जमाहली[1] करून करावा? कदाश्चित त्याच्या सांगितल्यावर न केला तरी देवाकडील काम म्हणून खावंद रागास येतील. यैसे दोहीकडून संकट, याजकरिता विनंतीपत्री लिहिली आसे. तरी याची आज्ञा उगऊन ल्याहावी. त्याजप्राा वर्तणूक करीन कलम १

लक्ष्मण आपाजी व पाडुरंग कृष्ण गोडबोले याजकडील इमारतीस आजपर्येंत आजमासे सतर पंच्याहातर हाजार रुपयेपावेतो पावले. पुढेहि लक्ष्मण आपाजी मागतील ते देतच आहे. कलम १

श्रीमंत राजश्री रावसाहेबाची स्वारी सोलापूर प्रांती गेली. बाबूजी नाइकाची रफेदफे होऊन पुढे निजाम आलीखान याचा रोख व कर्नाटकचा रोख आहे. पाहावे कोणत्या रोखे जातील हे न कले कलम १

किले अणकई विठलराव सिवदेव याजकडे गणीबेगाने दिल्ही. पेशजी गणीबेग याणे विठलराव याजकडील कारकून धरून नेले व येवलेकर ठाकूर व विष्णुपंत म्हणून ग्रहस्त याजकडून यैवज घेतला वगैरे बदमामली करीत होता. मुरादखान याचा चाकर परतु मुरादखान याचे कबिले किल्यावर आहेत यैसे जाहीरानीयात मात्र करून स्वबुधीने कर्म करीत होता. सरदारखान मुरादखानाचा भाऊ व बाइकामुले माणसे आंतुरावर घातली होती. मुरादखानाची गत सरदारखानास

---

१ तात्पुरता.

पाठविला आहे. त्यास चौकसी करिता * * कमपेसा होईल. ते पाहो(न) आजमास करून पाठवावा. * प्रमाणे काम करीन. कलम १

आपाजी गणेश याजकडे यैवज येणे. त्याचा थोडथोडा तगादा कर्णे म्हणून आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणे येक कारकून समा(ग)मे राऊत देऊन पाठविला आहे. येक महिना जाला. दमाजी गाईकवाडाकडून व आपाजी गणेश या उभयताकडे तगादियास पाठविला आहे. कलम १

(जग)जीवनराव पवार याजकडून नजरेचा यैवज घेऊ * * याचा आमल मोकासी (या)चा व पाटीलक्या व (कु)रणे खासगी माहाल * * * * आहेत ती सरकार आज्ञेप्रमाणे चालती कर्णे, येविसी मामलेदारास * * परभारे आज्ञा पत्रे (आ)हेत म्हणून सेवकास आज्ञा-पत्र सादर जाले. त्याप्रमाणे त्याचे मोकासे व पाटीलक्या चालत्या जाल्या. परंतु चाटोरीस कुरण माारनिलेचे आहे. येविसी कमावीशदारास व विठलराव तात्यासहि ताकीद की माारनिलेचे कुरणास उपद्रव न देणे. यैसे आसता विठलराव तात्याकडील कारभारी कुरणासी खटखट करितात. बलेच गवतास गाडे आणून जबर-दस्तीने भरून नेणार म्हणून पवार माार याजकडील कारभारी याणी करावी हेच नवाबाचे मानस, परंतु खावंदानी त्यास जीवदान देऊन सोडविले. तेथून सुटून शहरात गेले. तेथे त्यास नाना प्रकारचे उपद्रव होऊ लागले, तेव्हा माहा प्रयासेकरून निघोन नगरास आले. परंतु आन्नवस्त्र आदीकरून तसदीच आहे ते लिहिता येत नाही. परंतु खावदांची वस्ती सुखाचे पाणी निर्वेधपणे तेथे आहेत. गणिबेगास सरदारखानानी पाच सात वेळा सागोन पाठविले की तू बेकैदी करितोस हे कामाची नाही. आमचे निसबतीस किला तेव्हा आम्हास संकट. आम्हास श्रीमंताच्या पाया-वेगळी गत नाही. तू करितोस हे कार्याचे नाही. ते न मानीत तेव्हा सरदारखान उठोन आनंदवलीस आला की किला हरकसा हस्तगत करावा. गणीबेगाचे पारपत्य करावे. भाई मुरादखानाची वस्तभाव वर आहे व कितेक जाबसाल मुरादखानांचे मिर्जाकडे आहेत. त्याजपौ थोडे बहुत आम्हास द्याल म्हणजे आमचे माध्यानकालाचे चालेल. यैश्या मारावर आले. हे वर्तमान मिर्जा गणिबेगास कलताच विठलराव याजकडील लोकासी सूत्र लाविले की मजकडे मुरादखानाची झटे वगैरे झटे फार आहेत. तुम्ही मला नरमदापार करून द्याल तरी मी किला तुमचे स्वाधीन करीन. यैसे येका दिवसात सूत्र लाऊन संध्याकाली लागलाच खाले उतरला आणि

सरदार दप्तर संग्रहालय
स्थळ प्रत
क्र. ६ नं.

(बो) भाट सांगितला. त्याजवरून आम्ही विठलराव तात्याच्या कारभारी-यास पत्र पाठविलें की तुम्ही कुरणासी खटखट न करावी. गवत कुरणा(त) (गं)ज घालून ठेवावे. नवी * * जी सनद येईल त्याचप्रो उभयेतानीं वर्तावें यैसे पाठविले. त्याजमुळे त्यास फारच विशम वाटले. यैसी कितेक बारीक मोठी कामे जाबसाली पड (ली) (आ)हेत. येविसी पत्रे ल्याहावी लागतात. त्यास तर विशम वाटते. याजमुळे सेवकाचे नावे गैरवाके राजश्री विठलराव तात्यास लिहितील त्याजवरून (हु)जूर विनंती करतील * * * प मर्जीस कसे येईल. यास्तव पूर्व सूचना विनंतीपत्री लिहिली आहे. पेशजी सेवकाचे नावे येक ता(की)दपत्र आले आहे की राजश्री विठलराव याची * * * * पुरियात विकत घेतले ते जागा तुम्ही (जब)रदस्ती करून घर बांधिता ते न कर्णें यैसे आले, परंतु ते पत्र काही सेवकास पावले नाही. दुस-ऱ्याची जागा याजवर जबरदस्ती करून घर बाधणे हेच गोष्ट आनुचित. त्याहीमध्ये विठलराव तात्याची जागा त्या जागियावर मी बलेच घर बांधितो याचा परि(णाम) (काय) होईल! तात्या [यापुढील बराच मजकूर फाटण्यात गेला आहे.]

(बाल)कृष्ण गोविंद व बलवंतराव (गो)पाल याजकडे पचेवीस हजार विठलराव तात्याचे लोक किल्यावर घेतले. यास हरएक होये यैसे जालेच होते. किल्यावर भ्रम फार सांगतात व सरदारखानाच्याहि सांगितल्यात येते. परंतु सरदारखान गैरमाहीत. पहिल्यापासून कारभारात नव्हता. बारगिराप्रो जेऊन होता हे साहेबास विदितच आहे. गणीबेग उतरला. दुसरे दिवसी त्याजबा भारबारदारी देऊन त्यास काहाडून द्यावे या उदेगात विठलराव. तात्याचे लोकाचे मते, हे सरदारखानाने आम्हास सांगितले की मीर्जा गणिबेग हातचा गेला म्हणजे सर्व माग बुडतो. याजकरिता त्यास जाऊ न द्यावे. किल्याची तहकिकात करावी. जे किल्यावर आसेल ते खाबदानी सरकारात घ्यावे. उचले हाते जे आम्हास द्याल ते घेऊ. आम [यापुढील बराच मजकूर फाटण्यांत गेला आहे.] सोडवतो यैसे नाही. मग त्याची बंदोबस्ती करून ठेविला आहे. त्यास काहाडून द्यावे हेच त्याचे मानस. परंतु परस्परे लोकानी त्यास च्यार गोस्टी साफ सांगितल्या की मीरजास तुम्ही काढून दिधल्याने त्याचे निसबतीचे झटाचा जाबसाल तुम्हास पुरवावा लागल. यैसे पुरते कलल्यावर त्याचा बंदोबस्त करून ठेविला आहे. किल्यावर बंदोबस्त विठलरायाकडील आहे. थोडीसी नामजादी व हावलदार आनंदवलीहून किल्यास गेल्यास उपयोगी पडेल

(दरबार) खर्चाबदल येणे येविसी * * * करावे म्हणोन आज्ञा. त्या * * * प्राा ंकारकून व स्वार पाठविलेच * * त निकट करून यैवज वसूल (करि) तो. परंतु श्रीमंत रावसाहेबा(पा)वेतो फिर्यादी करितात. वसूल जाल्यास सेवेसी लिाा कलम १

(इ)मारत निाा लक्ष्मण आपाजी व पा * * * गोडबोले मिलून आजमासे आज * * * कमपेस रुो यैसी हजारपावेतो (जा) ले. पुढे जैसी आज्ञा येईल त्यास * * * वर्तणूक करीन कलम १

(रा।) चिमणराव देशमुख (निाा) बागलान याणी विनंतीप(त्र) लिहिले आहे ते सेवेसी प्राा * * * कलम १

किले हायेचे बेगमीस विाा * * दादो उधव यास रुा पोता * * * हुजूर आज्ञेप्राा दिधला * * श्रीमंत रायसाहेब लौकर * * * यैवज देतील म्हणोन आज्ञा. त्यास रावसाहेबाकडून यैवज लौकर हातास (ये)तो यैसा आर्थ वडत नाही. येक लाख रुा म्हणतात. त्याही वराताकडील देऊ यैसे दादो उधव याणी सेवकास लिाा * * * हे वर्तमान हजूर लेहून * * * साहेबास पत्र आणवावे * * * म्हणून दादो उधव याणी सूचना सेवकास लिहिली होती परंतु खावंदाची मर्जी कसी होईल. दुसर विठलराया-कडील लोकाच्या नजरा बिलंद[1] उच स्थानी चढविल्यावर जाल्या. हा रोख पाहून मोघमातच राहिलो. राव-साहेबाकडील खिजमतगार दोघे आले होते. त्यास किल्यावर मोजदाद काही दिल्ही काही न दिधली यैसी लोकवार्ता यैकिली. सेवकाने गणि-बेगास न सोडावे म्हणून विठलराव तात्याकडील कारभारी यास पत्र पाठ-विले याजमुले विशमता फारच वाटली आहे. याजमुळे कितेक प्रकारचे गैरवाके हुजूर समजाविताल हे न.कले. आणकईच्या मजकुराचा विस्तारे-करून विनंती पत्रे पेशजी रवाना केली ते येऊन पोहचलीच आसतील. हाली जाले वर्तमान लिहिले आसे. सर-दारखानाची हालाखी आहे. माध्यान-कालाची फारच तंगच्याई आहे. हुजूर यावे हे त्याचे मानस परंतु बाइकामुले माणसे घरात, त्याची आन्नवस्त्राची तसदी, येणेकरून फारच हैराणगत आहे.

१ बिलंद = उंच.

* सदरहू यैवज लौकर पावते *
* * यैसे पत्र जरूर आणवणे यैसे लिा होते. त्याजवरून सेवेसी विनती लिहिली आहे. मर्जी *
* ल्यास राऊसाहेवास यैव(जा)-विसी लिहिल्यास उपयो(गो) पडल

कलम १

सदरहूप्रा कलमे सेवेसी प्रविष्ट होतील. कलमाकलमाची उतराची आज्ञा करणार साहेव समर्थ (आ)सत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Keso Govind submits an account of the revenue collected, and expenditure incurred for the repair of the forts. Madhavrao Peshwa—continues the writer—reached Sholapur and is to proceed on his march into the Karnatak.*

No. 74] *[1766?*

श्री

पुा श्रीमंत राजश्री दादा
साहेबाचे स्वामीचे सेवेसी

विज्ञापना ऐसीजे :

अणकईकर किलेदार यानी मुलकात दंगा फार केला, त्याचा बंदोबस्त करणे म्हणून श्रीमंतास पत्र सादर जाले होते ते देऊन विनंती केली, ते समई सरंजाम देतो, तुम्ही जाऊन मोर्चे लाऊन किला घेणे म्हणून आज्ञा जाली. मागाहून मनसबा काये समजोन राहविला ते न कले. गणपतराव सिवाजी, विठल सिवदेव याचे नातू, त्याजकडील कारकून किलेदारानी धरोन नेले होते. सबब त्यानी उपद्व्याप करून, कारकून सोडऊन किले पालणा घेतला, त्याजवरून अणकई प्रगणे आमोद व भामेर येथील रसद विठल हर्री पासोन लाख रुपये घेतली आहे. हाली आम्हास ऐवजाची जरूर यास्तव दुसरे मामलेदार दीड लाख रुपये रसद देत ऐसे ठीक केले आहेत. याप्रमाणे माारनिलेनी कबूल केले तर उतम; नाही तरी यादवराव भागवत यासी मामलत सांगोन दीड लाख रुपये रसद घेतो. सनदेची डौले हुजूरची पाठविली पाहिजेत. भामेर किला पहिल्यापासून मामलेदाराकडेस असतो; त्याजमुले माहालची सिबंदी व किल्याची येक जागा सबब

जेर जाली. थोडकेच दिवसात हस्तगत होईल, येविशाईचे वर्तमान माारनिलेनी सेवेसी लिहिलेच असेल.

कलम १

किले न्हावा व किले पिसोला नजीक किले मोल्हेर नारो कृष्ण याचे निसबतीस होते. ते किले माारनिलेपासून फार निकडीने घेऊन हवालदार मामलेदार लोक नेमून पाठविणार; सबब किले आम्हाकडेस द्यावेत म्हणून बहुत प्रकारे विनंती केली; परंतु इतबार सेवकाचा न पडे. तेव्हां निरुपाये जाणून किले आपलेकडेस द्यावे; परंतु लोक सरकारचे पाठवावे ऐसा जाबसाल जाला. निरउपाये जाणून तूर्त लोक आपलेकडे नेमणुकीप्रमाणे घेऊन कारभार आपले पेटी लाऊन मात्र अगत्यास घेऊन सविस्तर मजकूर सेवेसी लिहिला आहे, त्याचे उतर लौकर पाठविले पाहिजे. लोक नेमून घेतले ते अद्याप रवाना केले नाहीत. उतराची मार्गप्रतीक्षा करावी यैसे मानस सेवकाचे आहे; परंतु इकडील निकड फार, लौकर लोक पाठऊन किले हस्तगत करणे म्हणून जाली आहे. मासपक्ष उतराची मार्गप्रतीक्षा सोईस आलिया करीतच आहे. नाहीं तेव्हां लोक पाठवीन. सविस्तर मजकूर येविशाईचा पूर्वी लिहिला आहे. श्रुत जालाच असेल. १

सालगुदस्ता मुलकी ऐवज लाऊन तालुकियास दिल्हा आहे. त्यापैकी खर्च कमी लागतो. यास्तव मर्जीस आलिया किला मामलेदाराचे स्वाधीन करावा. लोक नामजाद व हवालदार सरकारचे ठेवावेत. कारभार मामलेदारानी करावा याप्रो आज्ञा असावी. यांत किफायेत सिबंदीची पडेल येविशाईची आज्ञा काये ती करणार स्वामी खावंद आहेत. सदरहू अन्वये किला मामलेदाराकडेस लाऊन द्यावा. याप्रमाणे मर्जी असिल्यास बालाजी बाबूराव यासी पत्रे सादर जाली पाहिजेत. हा कालपावेतो विठल हरिकडेस किला द्यावा यैसी आज्ञा असता बालाजी बाबूराव यानी किला दिल्हा नाही. पुढेहि उजूर करितील. माारनिलेकडेस किला असलियासी वीस हजार रुपये याची नेमणूक करून द्यावी लागते. ते मागतात, कमी करू नये म्हणोन म्हणतात, मामलेदाराकडेस किला असल्यास, सदरहू ऐवजात कसर पडोन सारे माहालाची सिबंदी देखील किल्याची बेगमी होते ऐसा प्रकार आहे, येविशाईची आज्ञा. १

सोलापूर अद्यापि हस्तगत होत नाही. बाबूजी नाईक याचे कुटुंब मंगलवेढ्यास नरसिंगराव धायगुडे याजबराबर पाठविले आहे. रामचंद्र त्रिंबक पूर्वीच फौज घेऊन गेले आहेत; परंतु नायेकावर शह मातबर नाही याजमुळे किला लौकर येईल न येई यैसा संशय दिसतो. हाली हारजी

आफ्तीमुळे कमी आकार जाहाला, त्याचा तपसील येकंदर तालेबंदी तालुेकवार लिहिला आहे, त्यावरून ध्यानास येईल. त्यास सदरहू आफ्तीमुले कमी आली ते मजुरा द्यावयाची आज्ञा काये ती जाली पाहिजे. १

वागमारे हवालदार व सबनीस, फडनीस, सरनोबत येथे रिकामे होते. त्यास च्यारशे रुपये खर्चास देऊन रामचंद्र त्रिंबक याजकडेस उपयोगी जाणून पाठविले आहेत. सेवेसी श्रुत होये. १

येणेप्रमाणे पांच कलमे सेवेसी लिहिली आहेत. यासिवाये किले ताथवडा येथे कदीम सेतसनदी[1] गडकरी व बेरड देखील कारकून आसामी १२५ सवासे आहेत. त्याजकडेस सरंजामी जमीन पहिलेपासून चालत आली आहे. त्याची पाहणी करोन सिरस्तेप्राा आकार लेहून आलाहिदा तेरीज सेवेसी पाठविली आहे, त्याजवरून श्रुत होईल. सदरहू लोकाची चाकरी किल्यावर घेता येत नाही व सरंजाम जफ्त करावा तर तोहि प्रकार प्रशस्त नाही, यास्तव थोडीबहुत इतलाख[2] नेमणूक करून हे विज्ञापना.

¶*News-letter addressed to Dadasaheb by some one of his party reporting the capture and condition of several forts.*

No. 75] *[1766?*

श्री

राजश्री सखाराम भगवंत यानी विदित केले, कीं आम्ही आपल्या दोघा बंधूस घरचे घरांत समजावे, बाहेर फजिती न व्हावी, म्हणून धर्मशास्त्राचे मतापेक्षा अधिक अगळा वाटा दिल्हा असता शंकराजी निंबाजी लबाडी करून नाना प्रकारे वलगना करितात, मन मानेसे बोलतात म्हणौन. त्याजवरून हे पत्र तुम्हास लिहिले असे. तर तुम्हास सखाराम भगवंत याणी ज्याजतीच विभाग दिल्हा असतां वलगना करावयाचे प्रयोजन काये? तर यानी जो विभाग दिल्हा तो आगदी व तुम्हापासी जो कुणगा असेल तो शफतपूर्वक सरकारांतून अंताजी मल्हार कारकून पाठविला आहे त्याचे गुजारतीने सखाराम भगवंत यांचे हवाली करणे व तुमचे कचे वर्तमान मनास आणावे लागते यास्तव हुजूर येणे. सर्व बारीक मोठे मनास आणून धर्मशास्त्राचे मते जो तुमचा विभाग होईल तो तुम्हास माारनिलेपासून देविला जाईल. यास्तव पत्र पावतांच जो विभाग यानी तुम्हास दिल्हा तो व तुमचा

---

१ सेतसनदी = One holding a sanad or grant of lands for military service, applied especially to a local militia acting also as police and as garrisons of forts.

२ इतलाख नेमणूक = A fixed annual payment from public treasury.

कुणगा असेल तो शफतपूर्वक सरकारचे कारकुनाचे गुजारतीने सखाराम भगवंत याचे हवाली करून तुम्ही हुजूर येणे म्हणून बाजी भगवंत व शंकराजी निंबाजी यास पत्र देणे.

¶*The Peshwa asks Shankaraji Nimbaji to hand over to his uncle Sakharam Bhagwant a part of the joint property which he had unjustly appropriated.*

No. 76] *[1766*

श्रीशंकर

विनंती उपरी. राजश्री प्रतापजी राजे माहाडिक आज्ञाप्राा वर्तणूक करितात. राश्रजी साकरोजी माहाडिक श्रीमंतापासोन पळून आले, व राजश्री दुर्गोजी माहाडिकास हैदरनाइकाकडे चाकरीस पाठविला. श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामी याणी व श्रीमंत रा दादासाहेब याणी रो भोसले याचे शेहेस गुंतले होते तेव्हा हैदरनाइकास आणौन, स्वराज्यात धामधूम करावी, राजा बाहीर काडावा, रो भवानराव यास कुल कारभार सोपावा, यैसे नाना प्रकारे क्षुलक कर्म योजिले होते; परंतु श्रीमंताचे पुणेप्रतापेकरून सर्वहि वारापाणी होऊन परभारे तोंडघसी पडले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*This appears to be a report from the Court of Satara, describing the conduct of the Mahadiks. Pratapji Mahadik was reported to be obedient and loyal ; Sakroji and Durgoji Mahadik were however planning to supplant the influence of the Peshwa by liberating the Chhatrapati from confinement.*

No. 77] *[1766 ?*

श्री

राजाश्रिया विराजित राजमान्य
राजश्री मोरोबादादा स्वामीचे सेवेसी

पोष्य गोविंद सिवराम सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहवीत आसिले पाहिजे विशेष. राजश्री उधव वीरेश्वर चितळे यांचे सिवनेरचे राजकारणानिमित्य खर्चवेच सरकारचे रो व माारनिलेनी कर्ज घेऊन नाजूक कामास वगैरे खर्च केला त्याची मखलासी गुदस्तां उभयेतां यजमानापासीं रदवदल करून मखलासी करून घेऊन देणे करून घेतले. ते समई व्याजाचा हिशेब करून मखलासी करून घेतली नाहीं. सदरहू नाजुक कामाकडे खर्च जाला त्यामधें एकुणीससे अडतीस रुपये मुदल व व्याज व चवदासे रो पैकीं नवसे

देणे जाले. त्याचे व्याज राहिले त्यामुळे व्याजाचा हिसेब पुढें समजोन देऊं ऐसें सांगितले. त्याजवरून माारनिलेनी आपला कारकून व देण्याची यादी राजश्री बाबू रावजीकडे पुणियासी घेऊन आले; परंतु रावजीनी रुपया दिल्हा नाहीं. माारनिले आज ताा दौलताबादेस राहिले त्याजमुळें रुो तैसेच राहिले. माारनिले गरीब, सालस माणूस, सरकारची कार्ये माारनिलेचे हातून काय काय जाली, हेहि तुम्हा आम्हा सर्वांचे स्नेही सर्व प्रकारे अगत्य यांचे आहे. यास्तव हर कसे कळेल त्या रीतीनें साध्य होऊन दोनी रकमाचे व्याज व ऐन रुपया कर्जाचे वगैरे बक्षीस मिळोन होतात ते उगऊन द्यावे. अनमान करू नये. गुदस्तां फार खटपट केली. बक्षिसें द्यावी ऐसा करार होता. परंतु हिंदुस्थानचे स्वारीमुळें राहिलें, असो. याउपरी व्याज सुधां रुो हरएक तजविजेनें उगऊन द्यावे, व माारनिलेचे तस(ल)मातीस सरकारी ऐवज, त्याचा जमाखर्च उगऊन तसलमात दूर करावी. आम्हीच केवळ तुम्हांस लिहावें ऐसे नाहीं. तुम्ही आम्हापेक्षां स्नेही आहा; परंतु गुदस्ता आम्ही या कामास माहीत होतो म्हणून तपसीलवार लिहिले असे. कार्य खामखा करून कर्जापासून मुक्त होत ते करावे. वर्तमान समजोन कार्य करावें. बहुत काय लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Govind Shivaram writes to Moroba Dada, saying that Udhav Vireshwar Chitale has incurred expenses for occupying Shivaner and for some purpose of secret diplomacy. It is requested to free him from the debt incurred on that account.*

No. 78] [*1766-67 (?)*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
हरिपंत तात्या स्वामीचे सेवेसी

पोष्य बाळाजी जनार्दन साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागाईत छ १ साबानपर्यंत जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणें विशेष. शागीर्दपेशाचे हिशेब व तेरजे वगैरे कागदपत्र लस्करांत पाठवावे म्हणोन श्रीमंतांचें व तुमचें पत्र आलें होतें, त्याजवरून फत्ते आली सांडणीस्वार दिमत पागा हुजूर याजबरोबर कागद पाठविले बीतपशील:

शागीर्दपेशाचे हिशेब होऊन सन खमसचे नेबाद[1] सर्वांचे पावलेच आहे. त्याचें नांवनिशीवार तेरीज धरून व सीतचे हिशेब होऊन पैका पावला आहे. त्याचे तेरीज धरून व ढलाईत कारकून शिलेदार व मुछदी व शिलेदार यांस रोजमरा येकमाही व दीडमाही सन खमसांत स्वारींत पावत होता, त्याचा पट नांवनिशीवार आकारून पाठविला आहे.

---

१ नेबाद = पगारांचे हिशोब.

व खास जिलबीचे लोकाचे हिशेब होणें होते तेहि करऊन पाठविले आहेत; याचें फेरिस्त आलाहिदा तपशिलवार आहे.

निळकंठ माहादेव याजकडील फौजेचे सरंजामाचे माहाल आहेत त्यांपैकीं खानदेश गुजराथचे माहालचे कमज्याजती निवडले आहे त्याचा पट पाठविला आहे. यास राजश्री गुरुजी बावा माहीत आहेत.

सन इसनेंत कर्नाटकांत स्वारी जाहाली, राजश्री त्रिंबकराव मामा गेले ते समयींचें कागदपत्र असल्यास खंडण्याच्या बेरजा व तेथील संस्थानिकांचा खर्च पडला असेल तो व बसालतजंग याजकडे आदवानीचा पैका येणें त्याचे कागद शिक्यानशीं घेतले आहेत; पाहून पाठवावयास आज्ञा करावी म्हणोन तुम्ही लिहिलें; त्यास त्या सालचे कागदपत्र तों सर्व गेलेच; परंतु खंडण्याचें पुडकें व वसूलबाकीचे तेरीज व देण्याच्या यादी असें प्रकर्ण सांपडलें त्याच्या नकला करून पाठविल्या आहेत, त्याजवरून कलेल. बसालतजंग याचें पत्राचा शोध केला, परंतु सांपडत नाहीं.

पुणियांत सन खमसांत प्यादे हशम वगैरे लोक किती होते व सालमजकुरीं किती आहेत त्याच्या नकला व नकलाच्या यादी व सरतेरीज ऐसें पाठविलें आहे. घेणें.

राजश्री सखारामपंत यांचा सरंजामाचा पट फौजेचा खानदेश व गुजराथ प्रांताचे माहालचा कमज्याजतीचा येथें निवडला होता तो पाठविला आहे. यास राजश्री गुरुजी बावा माहीत आहेत.

पुण्याचे मुक्कामीं सन खमसांत माणूस किती होतें व सालमजकुरीं किती हें लिहून पाठवावें म्हणोन श्रीमंतांनीं लिहिलें होतें; त्यावरून तपशिलवार यादी व सरतेरीज पाठविलें आहे. यांत सरासरी पांहातां नवद माणूस सालमजकुरीं ज्याजती आहे. श्रीमंत कैलासवासीचे वेळेस च्यार हजार पांच हजार माणूस सहजांत असे. प्रस्तुत आहे इतक्या माणसांनीं बंदोबस्त चांगला, व लस्करांतून येकादें काम शें दोनशें माणसांचें अकस्मात येतें, ते वेळेस शोधीन म्हटल्यास ताळ पडत नाहीं. सविस्तर समजवावे. स्वारी गेली ते समयीं माणसांचा भरणा कमी होता. बंदोबस्त जाला पाहिजे यास्तव सवासे मात्र माणूस जदीद ठेविलें तें तों जात आलें आहे. कदाचित सोलापूर बारामतीचें माणूस आलें तर पाहाणी करून दूर करूं, गुंता नाहीं. या मजकुराविशी

6726

निराळें पत्र श्रीमंतास लिहिलें आहे हें तुमचें मतें प्रयोजन लागल्यास द्यावे; आणि कलमवार कागद लिहिला आहे तोच पाहून कांहीं प्रयोजन नसल्यास कशास पाहिजे? विचारास येईल तें करावें

सालव्याची चिठ्ठी अद्याप आली नाहीं. ते घेऊन लौकर पाठवणें. सालमजकुरीं त्याच्या कमाविसदारांनीं वसूल घेतला असेल तो झाडियानसी माघारां सरकारचे कमाविसदारास देणें असें चिठ्ठी मध्यें लेहून घेणें.

येणेंप्रमाणें कागदपत्र येक रुमाल पाठविला आहे, पावलियावर उत्तर पाठवणें. बहुत† काय लिहिण लोभ असो दीजें हें विनंती.

¶*Nana Fadnis submits the returns showing the number of attendants in service and their wages for the Peshwa's perusal in the camp. The papers include lists of tributes due from the Nizam agreed upon in the Karnatak campaign. The letter is addressed to Haripant Tatya, and is meant for the information of the young Peshwa whose minute attention to all details is evident throughout.*

No. 791 *11-1-1767*

श्रीरामचंद्र

सकलगुणालंकर्ण आखंडितलक्षुमी-
आलंकृत राजमान्य राजश्री रघुनाथ
पंडित स्वामी गोसावी यासी

पो सदासिव चिमणाजी कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ पौष सु॥ १ प्रतिपदापर्यंत संनिध श्रीत्रिंबकेश्वर येथें जाणून स्वकीये कुशल लेखन करीत गेले पाहिजे विशेष. गतवर्षी आपली स्वारी पुणियाहून गंगातीरास जाली, ते समई आमच्या कामाकाजास्तव राजश्री आपाजी महादेव (याणी वि) नंती केली व मी स्वता येऊन वारंवार कळविले, परंतु आपण मनावर गोष्ट धरून करार करून दिल्ही नाही. आबाजी महादेव पुरंदरच्या कामाबदल ठेविले. त्यास मात्र आज्ञा केली जे, यांजविसी तुम्ही राजश्री माधवरावजीस सांगोन यांचे कार्य करून देवणे, त्यावरून ते पाठीमागे पुणियात आठ दहा दिवस होते; तेव्हां दोनच्यार वेळ समय पाहोन आम्हास बरोबर घेऊन जाऊन रावजीस बहुता

† येथून पुढील मजकूर नाना फडणविसाचे हातचा.

प्रकारे विनंती केली. परंतु त्याणी त्याजपासी एकच उत्तर केलें जे, हे काम आमच्यानें करार करवत नाहीं. दादासाहेब वडील तेथे निश्चय करून ज्यास सांगतील त्याजपासून आम्ही काम मात्र घेऊं. मग वारंवार विनंती कौसियास करावी? आबाजी महादेव पुरंदरास गेले. पुणियाहून सदासिव रघुनाथ यास साहित्यपत्रे राजश्री सखारामपंत बापूनी देऊन आपल्याकडे पाठविले, तेव्हां आपण कृपा करून त्याजकडे आमचा कारभार करार करून वस्त्रे देऊन करार केले, व पाठीमागून रावजीच्या लस्करासमागमे आमचे बंधु आनंदराव व कारकून वराड प्रांतात आपल्या दर्शनास आले. त्याणी आपल्याविसी काय विनंती केली असेल ते स्वामीस विदित असेल. परंतु सदासिवपंत व यांणी एके विचारांत चालून कारभार सर्व करावा ऐसा सिधांत आपण व रावजीचे लस्कर एकत्र जाले ते समई करार करून दिल्हे. मग आनंदराव निवोन माघारे मंडळीसुधां आले, त्यास हे वर्तमान आम्हास कळविल्यावर मनांत बरे म्हणून राहिलो, कां जे स्वामीच्या मर्जीस ही गोष्ट या समई करावी ऐसी आलियावरी आम्ही वारंवार विनंती करावी; याने मात्र बेमर्जी करून घ्यावी हे गोष्टी उपयोगी नाहीं. जे समई कृपावंत आपण होतील तेव्हा सर्व प्रकारें आमचा अभिमान धरून आमचे उर्जित करतील, हा भरवसा जाणोन आम्ही पुणियांतच राहिलो. त्यास आपली स्वारी वराड प्रांतातील कामकाज होऊन हिंदुस्थानच्या मसलतीस गेली, ऐसे वर्तमान कळले, त्यास बरे स्वस्त राहावे, राजश्री माधवरावजी मुलुकगिरीहून आलियावरी काय जाबसाल करार करून देतात हा सिधांत पाहून तदनंतर सर्व वर्तमान आमचे होईल तेहि (विस्तारे) त्याहावे, यास्तव वारंवार वर्तमान आपणांस लेहून पाठविले नाहीं; त्यास वैशाखमासीं राजश्री माधवरावजीची स्वारी माघारे पुणियास आली. त्यांचे दर्शन जाले. आठा चौ दिवसीं दर्शनास जात होतों. सखारामपंत बापू सासवडास कन्येच्या लग्नाकरितां राहिले होते. त्यास दोन मासपर्यंत लागले, यामुळे आम्ही काहीं हाललो नाहीं, ते पुणियास आलियावर त्यांची भेट जाली. दोन चार वेळा त्याजकडे गेलो. सर्व प्रकारें बोललो. त्याणी उतर दिल्हे, रावजी व आम्ही याचा विचार करून मग तुम्हास काय सांगणे ते सांगू, तुम्हीं वारंवार उतावळी न करावी. ऐसे उतर त्याणी केलियाउपर आम्ही बरें म्हणून राहिलो, वारंवार पुसिले नाहीं. मार्ग-प्रतीक्षा करीत बसलों. मधें काही एक दिवस सखारामपंत याणी श्रावण भाद्रपदा-पर्यंत औषध उपाय केला. याकरितां वारंवार त्यांजकडे जातां नये. त्यांचे औषध समाप्त होय तो अश्विन मास प्राप्त जाला. दरबारास जाऊं लागले. त्यास आमच्या बंधूनी व फडणीस आम्हाकडील या उभयतांनी अगोधर दोन महिने नाना फडणीस व बापू यांजकडे बहुतच बळकटी करून त्यास गोऊन

घेतले. नवरात्रामधें बापूकडे एकदोन वेळां गेलों. बरे म्हणत त्यास दसरियास तीन दिवसांचा अवकाश होता. ते दिवसी सरकारचा चोवदार बोलाऊ आला. आम्ही दरबारास गेलो, दरशन जाले. मग आम्हासी बोलावयासी नाना फडणिसास सांगितले. दिवाणखानियांत नाना फडणीस सांगो लागले जे, श्रीमंताची आज्ञा ऐसी आहे जे, येथील सिधांत ऐसा जाला आहे जे तुमचे बंधु सर्व कारभार करतील. तुम्ही कागदापत्रावर सिके मात्र करून द्यावे. त्यासी मेळून असावे. आणि याप्रमाणें करावे हे पुरवत नाही तर वडिलांचे कारकीर्दीची सिकेकटार आहे ती यांच्या हवाला करावी लागती. तरी काय ते उतर सांगणे. त्याजवरून आम्ही उतर दिले जे, आपण खावंद कामकाज सांगतील ते करीन; परंतु आम्हास काही त्याच्या हाताखाली वर्तणूक होणार नाहीं. यापेक्षां एका पोरग्यानसी आपल्यावराबर राहूं, त्यांत शोभा आमची आहे याविषई मात्र आमचा उपहास न करावा, ऐसे साफ उत्तर दिल्हियावर, मग त्यासमई घरास जा म्हणाले, मात्र मग दसरा जाला. चतुर्दशीच्या मुहूर्तें रावजीचे डेरे बाहेर होऊन डेऱ्यादाखल जाले. तदनंतरी सरकारातून आज्ञा आमच्या मंडळीस दिल्ही जे, तुम्ही नवी सिकेकटार केली आहे, तिणेच कामकाज कागदपत्र करा, सर्व कारभार करणे, त्यावरून आम्हाकडील कार्यभाग चालता जाला. मग आम्ही व्यर्थ काय सबब पुणियात राहावे, या अर्थावरून मागती सखारामपंताकडे जाऊन बोललो जे, इतके दिवस आपली वाट पाहिली, या उपरी आम्हास आज्ञा देवावी म्हणजे श्रीत्रिंबकेश्वराची यात्रा करून कृष्णातीरास जाऊन राहूं. त्यावरून त्याणीं निरोप देविला. मग आम्ही यात्रेस आलो. देवसांनिध्य दोन महिने राहिलो. या उपरी माघारे कृष्णातीरास जाऊं. ऐसे आमचे कचे वर्तमान जाले ते आपणास कळावे यास्तव विस्तारे लेख केला. कृपा करून ध्यानात असो द्यावे. आमचा सर्व प्रकारे अभिमान आपल्यास आहे. त्याचा शेवटहि लावणे आपल्याकडे. आमचा सर्व अर्थ आहे तो आपलाच आहे, आपले दर्शन होईल तो सुदिन होईल. रा छ १४ साबान बहुत काय लिहिणे, कृपा असो दिजे हे विनंती[+].

¶*Sadashiv Chimnaji Sachiv reminds Raghunathrao of his promise to help him in the settlement of his affairs by the Peshwa. The writer also describes to him what had happened in the meanwhile, especially how he had approached Sakharam Bapu, Nana Fadnis and the Peshwa and how they all had asked him to hand over the insignia of the Sachiv's office to his brother. The writer therefore requests Raghunathrao to use his influence and save him from humiliation.*

+ सचिव सदाशिव चिमणाजीचें रघुनाथरावास पत्र. यानें सचिवपदाचा उपभोग सन १७५८-१७८७ पावेतों केला. याचा धाकटा भाऊ आनंदराव याचा उल्लेख पत्रांत आहे. तिसरा भाऊ रघुनाथ चिमणाजी हा सखाराम बापू बोकील याचा जावई. या पत्रावरून जुन्या सरदारांची आबाळ व्यक्त होते.

No. 80] *[14-1-1767*

पैवस्ति छ १३ साबान

सन सबा.

श्री

विज्ञापना. भिकाजी नाईक कोलटकर यांजबरावर श्रीमंतांनीं आपणांस निरोप पाठविला कीं तुमचे कारकून कारकुनी फार घेतात हें ठीक नाहीं. ताकीद करावी. तें समयीं आम्ही सांगोन पाठविलें कीं येथील कारकुनास ताकीद केली व लस्करांत ताकीद करावयाविशी हरिपंतास लिहिलें आहे. थोडें बहुत पहिल्यापासून घेत आले आहेत, ते मात्र घेतील. जाजती होणार नाही. त्यास येविशीचा अर्थ गारपिरावर आपण सविस्तर सांगितला. दुसरें पत्र भिकाजी नाइकाबराबर पाठविलें. तिसरें पत्र येविशीचेंच आलें. त्यास आमचे मतें आम्ही वर्तणूक करितों याचा बोभाट खावंदाजवळ जावा असें दिसत नाहीं. मग कोणामुळें बोभाट आला असेल तो असोत. चाकरी करावी पोटासाठीं. त्यांत रिझाले आहेत ते मनस्वी करितात. ज्यास अबरूचा दरकार आहे तो पैक्याकडे पाहात नाहीं. सहजांत मेळविलें तर विचाराचे वाटेने मेळवितात असे रीतीची वर्तणूक करितों. तथापि खावंदाचे कानास बोभाटाची गोष्ट गेली, येविशी स्वामींनीं आज्ञा केली ती गोष्ट आम्हास शिरसा आहे. येथें सर्वांस ताकीद केली. आपण ताकीद केल्यास शब्द येऊं देणार नाहीं असेंच श्रीकृपेनें घडेल. स्वामीचें अन्न भक्षितों. वावगी बुद्धि कधीं होणार नाहीं; व दरबारचाहि रंग समजतो. नित्य गांठ. पहिला प्रकार नाही. येथें चिवडणारे शंभर आहेत, परंतु सारा दिवस जपोन खावंदांनी वाईट न म्हणावें असेंच रीतीनें वर्ततों. इतकेंहि करून खावंदाचे चित्तांतील संशय न जाई तेव्हां मग शब्द कोणास लावावा? परंतु खरें वर्तल्यास असें होणार नाहीं असेंहि आहे. आज्ञेचें लक्ष धरून वर्तत असों. दरबारीं लाहान माणूस आमच्या उण्यापुऱ्या गोष्टी सांगणारे बहुत आहेत. परंतु आपली सिक्षा अशी नाहीं, कीं दुसरियाची जरब आपल्यावर चढावी. जे बोलतील तेच फजित पडतील. परंतु फार संभाळावें लागतें. येथेहि या गोष्टी दोनच्यार रोज गेल्यावर श्रीमंत बोलत असतात. येक दिवस लक्ष्मणपंत आपटे यांजबरोबर सांगोन पाठविलें कीं तुम्ही जसा यैवज सरकारांतून पावेता तशी कारकुनी घ्यावी. होन पावल्यास होन घ्यावे. नख्त पावल्यास नख्त घ्यावें. तेव्हां आम्ही सांगोन पाठविलें कीं ये गोष्टीचा बोभाट कोणाचा आहे! आमचें घेणेंहि फार नाहीं. जो देतो तो संतोषानें देतो. परंतु मर्जी जसें सरकारांतून पावेल तसें घ्यावें अशीच आहे. जशी मर्जी तसें करावी लागेल. फौजेच्या

गणत्यांच्या वगैरे चौकशा असाव्या असें म्हणत होते. ते वेळेस खातरजमेचेच जाबसाल केले, व गणतीचा बंदोबस्त चांगला केला आहे. आळस करीत नाहीं. स्वामीचे कृपेकडून पार पडूं असें दिसतें, मग ईश्वरी इच्छा न कळे. सेवेसी कळावें हें विज्ञापना.

¶*Haripant Phadke assures Nana Fadnis of his strict observance of the instructions of the Peshwa as regards fees exacted by the clerks. The paper is important as it proves how minute and strict the Peshwa was in his administrative matters.*

No. 81] [*17-1-1767*

पौ छ १९ शाबान

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक त्रिंबकराव विस्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता॥ छ १६ साबान मुा झासी स्वामीचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. शरीरी अद्यापिहि अनारोग्य आहे; परंतु आपले कृपेकरून आरोग्यहि होऊन योजिले कार्याची कार्यसिधि स्वामीचेच पुण्यप्रतापे होईल. पौष कृष्ण द्वितीयेस झांसीहून स्वार होऊन कालपीस गेलो. संक्रमणप्रयुक्त तीलशर्करा थैली सेवेसी पाठविली असे. कृपा करून स्वीकारून पावलियाचे उतर पाठवावयास आज्ञा करावी. कालपीस गेल्यानंतर तिकडील नवल विशेष सरकार उपयोगी मजकूर असल्यास सेवेसी पत्र लिहून पाठवीन. त्या उपर दूर लांबणें तर लांबावे. मनसब्यास कल बसल्यास फिरोन तसा घाट उतरीन म्हटल्यास उतरत नाहीं. सेवकलोकीं विनंती मात्र ल्याहावी यास्तव आमचे पत्राची प्रतीक्षा असावी. सेवेसी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Trimbakrao Vishvanath reports to Raghoba Dada his arrival at Kalpi.*

No. 82] *[21-1-1767*

पौ छ २ रमजान सबा
माघ वा जासुद जेथे
मुंकुदजी नाईक.

श्री

सेवेसी विज्ञापना ता छ २० साबान वर्तमान यथास्तित असे विशेष. स्वामीनी छ (१) साबानचे पत्र पाठविले ते छ ११ मिा पावोन लिहिलें वर्तमान सविस्तर कललें. कागदपत्र आणविले होते ते आपण पाठविले ते :

शागिर्दपेशाचे हिसेब होऊन सन खमसचे नेबाद[1] पावले. त्याचे तेरीज व सितात नेबाद पावले ते तेरीज व सीतचे हिसेब करावयाचे होते ते करून पाा ते तेरजेसुधा.

कारकून सिलेदार वगैरे दीडमाहीचा पट.

सन इसनेत कर्नाटकांत स्वारी जाली ते समईचे खंडण्याचे झाड्याचे पुडके सापडले त्याच्या नकला करून पाठविल्या त्या.

पुण्यातील माणसाचा तपसील सवासे जाजती माणूस ठेविले येविसीचा तपसील लिहिला व श्रीमंतास पत्र लिा ते दाखविले. फारसा तपसील सांगणे पडलाच नाही. त्याणीच आज्ञा केली कीं सवासे नवे ठेविले बरे केले.

राजश्री सखारामपंत बापू व नीलकंठ माहादेव यांजकडील सरंजाम खानदेश गुजराथ प्रांती आहे, त्याचा जाजतीचा पट निवडला तो.

पुण्यांत हशाम प्यादे सन खमसात होते किती व सालमजकुरी किती आहेत त्याची तेरजें पाा ती पावली.

सालव्यांचे चिठीकरितां बापूस नित्य पुसतो. श्रीमंताचे कानावर घालितो; परंतु चिठी येत नाही. होईल ते लिहून पाठऊ.

येणेप्रमाणे कागदपत्र सर्व पावले. श्रीमंतास समजाऊ. उभयताचे जाजती सरंजामात बेरजा होतात त्या यादी समजेल म्हणजे उतर होईल ते लिहून पाठऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. पुण्याचे नेमणुकेचे राऊत लस्करात आले त्यांस पाठऊन देतो हे विज्ञापना.

¶*Hari Ballal in a letter to Nana Fadnis acknowledges the receipt of the various files of papers sent by him.*

१ पगाराचे हिशेब.

No. 83] *[27-1-1767*

श्रीशंकर

सेवेसी केसो गोविंद चरणावरी मस्तक ठेऊन साा नमस्कार विज्ञापना तागाईत छ २६ माहे साबानपावेतो सेवकाचे व किले मजकूरचे वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान कलम बिताा :—

राजश्री भिवराव पानसी याजकडील यैवज रुो ३०००० तीस हाजार निकड करून वसूल करून घेणे म्हणून पाच सात पत्री सेवकास आज्ञा. त्यास यैवजाविसी तगादा करीत होतो. त्याच यैवजावर कापडकरी सावकारास तीस हाजाराची वरात दिल्ही, त्याजवरून पंत माारनिलेनी सावकाराची निषा जेस्ट शुध्ध प्रतिपदेची केली. त्याचे बजिनस पत्र सेवकास आले की वायदेप्रमाणे रुपये अम्हाकडे आले. मागाहून आज्ञापत्र छ १६ जमादिलावलचे राा जाले ते छ २० जमादिलाखरी सेवकास सादर जाले. तेथे अज्ञा की चिरंजीव राजश्री राव याजकडील तोफखानियास यैवज खर्च जाला येविसी चिरंजिवाचे पत्र हुजूर आले. तुम्हीं माारनिलेपासी यैवज न मागणे म्हणून आज्ञा. त्यास यैवजाचा जाबसाल तो अगोधरच अस्विन वद्य त्रितीयेस कापडकरी सावकार राजश्री अबाजी नाा काबरस व रामचंद्र नाईक परांजपे यांची निशा होऊन साहेबाचे नावाचे पत्र दिल्हे त्याची नकल आलाहिदा पाठविली आहे. सेवकास आज्ञा की रुपये न मागावे. किल्यापासून भोजनशाळापर्यंत फर्षा रुद हात सुमार च्यार प्रमाणे बांधणे. स्वारी वैशाख मासी येई तोपर्यंत तयार करून ठेवणें म्हणून सेवकास आज्ञा. त्यास पाच सात पत्री सेवेसी विनती लेहून पाठविले होते की किती रुपयामध्ये बाधावा व आजमासहि पाठविला होता, परंतु किती रुपयामध्ये बाधावयाचे आज्ञापत्र सादर न जाले. वैशाख मासपर्यंत नेमली कामे तयार कर्णे म्हणून वारंवार सेवकास आज्ञा. खासा स्वारी आलियावरी फर्षाचे काम न जालियास मर्जी बेमर्जी होईल याजकरितां फर्षास पाया खाणून किल्याचे दरवाजापासून भोजनशालेच्या नजिक नाल्यापावेतो पाया दगडाने भरून जमिनीबरोबर आणिला. तो लक्षुमण अपाजी यास पत्र सादर जाले तेथे कलम की फर्श्यास रुपये बहुत लागतात तरी न करावा त्याजवरून काम महकूब केले. काम तयार जाले याचा हिसेब तयार करून येका दो दिवसात सेवेसी रवाना करितो. त्याजवरून जाल्या कामाचा व पुढे बाकीस राहिले त्याचा आजमास ध्यानास येईल. कलम १

त्यास येका महिनीयाने अगोधरच यैवज सावकारी पडला. सेवेसी कलावे.

कलम १

दमाजी गाईकवाड व आपाजी गणेश याजकडे रुपयाच्या तगादियास कारकून दोन महिने पाठविले आहे. तगादा करितात. यैवज हतास येईल तेव्हा खरे. कलम १

किले पुरंधर वगैरे पौ सोन रुपे वगैरे जे आसल ते केवल यैवजाची वोढ पडल्यास खर्च करणे म्हणोन पेसजी आज्ञा, त्यास आज्ञेप्रो सरकार नुकसानी न होता जेथवर खर्च करणे ते करीतच आहे. सेवेसी कलावे.

कलम १

रा गोपालराव गणेश आमदाबाजेहून निघोन नासकास येतात. समागमे से दोनसे राऊत आहेत. खासगत लग्न करणार आहेत कलावे.

खंडेराव गाईकवाड दमाजी गाईकवाड याजसी तूट खाऊ(न) मुलेलेकरे सुधा निघोन इकडे येत होते. मागाहून दमाजीबावाकडून समजुतीस ग्रहस्त आलेच आहेत. समजुती करून घेऊन जातील. कलम १

खासा स्वारीवर्तमान परस्परे लोकवार्तेन कलते. सरकारी पत्री सेवकास आज्ञा बहुत दिवस सादर नाही. येणेकडून सर्वत्र च्यातकन्याये-

श्रीमंत रावसाहेबाची स्वारी कर्नाटक प्राती गेली. कृष्णा सुरापूरच्या मुाची पत्रे बातमीची आली. सुरापूरची वगैरे किरकोल स्वस्तानेचा जाबसाल उरकले. हेदर नाइकाकडील वकील आलाच आहे त्याचा जाबसाल लागलाच आहे. तोहि लौकर उरकून पंचमाहलाकडे रोख होणार. हेदर नाइकाचा जाबसाल जाला म्हणजे दरोबस्त करनाटकचा जाबसाल जाल्यात आहेत. नवाब निजामआलीखानाकडे कृष्णराव बलाल गेले आहेत. तेथील जाबसाल उरकल्यातच आहे. साल माारी त्याजकडून बिघाड होतो यैसा प्रकार नाही. रा दादो उधव किलेहायेचे हिसेब घेऊन बराबरच आहेत. किलेहायचा यैवज हातास लौकर येसे दिसत नाहीत. किलेहायेचे बेगमीस यैवज दिधला. येणेकडून येथ खर्चास वोढ पडली आहे. त्याहीमधे कोन्हाचा बोभाटा न पडता आज्ञेप्रा नेमणूकाचा दरमाहाचा यैवज व आजपावेतो हजूरच्या वराता जितक्या आल्या त्याचा यैवज झाडून पावता केला. इमारतीच्या कामाकडे लक्ष्मण आपाजी व पांडुरंग गोडबोले मिळून कमपेस त्र्यासी चवऱ्यासी हजारपावेतो पावले. यैवजाची वोढ याजकरिता दोन दिवस आगमागे पावत आहे. हा कालपरियेत कोन्हाचा बोभाटा पडू दिधला नाही. इतके आसोन हुजूर कोन्ही बोभाटा लिा त्यास उपाये नाहीं. कलम १

करून आज्ञापत्री मार्गप्रतीक्ष्या करीत आसे. कृपा करणार साहेब समर्थ आसत. कलम १

रविशत्रुमणाचे तीलशत्रायुक्त सेवेसी पाठविले ते प्राा होऊन सेवकास सनाथ करून उतराची आज्ञा करणार स्वामी समर्थ आसत. कलम १

सदरहूप्रो कलमे आक्षरशा सेवेसी प्रविष्ट होतील. उतराची आज्ञा करणार साहेब समर्थ आसत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Keso Govind reports probably to Dadasaheb several items of news and of the progress of the works entrusted to him. The fort referred to appears to be Trimbak.

No. 84] *[12-5-1767*

पौ छ १२ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री रावजी

स्वामीचे शेवेसी

पो गणेश शंकर साा नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १३ जिल्हेज मुाा गोपालपूर पाा देवालपूर सुखरूप आसो विशेष. आपण कृपा करून पत्रोंतर पाठविले ते पावले. समाधान जाले. यैसेच कृपा करून सांभाल करीत आसिले पाहिजे. यानंतर इकडील वर्तमान तरी श्रीमंत इकडे आले. तुकोजी होलकर यास सरदारीची वस्त्रें दिल्ही. नजर पंधरा लाख घेतले. नवा व जुना सरंजाम त्याजकडे करार जाला. सिरोज खारगोण देपूर तीन पाा सरकारात घेतले. सिंद्याची सरदारीमध्यें चिवडा फार जाहाला. केदारजी सिंदे, माहादजी सिंदे यास घरी बसवावे; आपण कारभार करावा याप्रो घरफूट करून बोद्दू लागले. त्याजवरून व बाजी नरसी व राघोबा पाग्या याणी माहादजी सिंद्यासी बखेडा केला, त्याजमुळे राजश्री अवचितराव यास दिवाणगिरी देऊन केदारजी सिंदे याचे विचारे चालावे याप्रो जाले. बाजी नरसी राघोबा यांस हुजूर आणून महिपतराव पानसे याचे हवाले केले. ते मागील हिसेब पाहोन लोकाचे देणे वारावे म्हणून बोलत आहेत; व नजर कबूल करून दिवाणगिरीचा कारभार आपणास सांगावा म्हणून रदबदल करीत आहेत. त्यास कसे कसे ठरेल हे पाहावें. सिंदे होलकर यास निरोप लौकरच होणार. खासा स्वारी माघारे हिंदुस्थानास फिरली होती; परंतु सिंदे होलकर याणी कबूल केले की छावणीस आम्ही गोहद प्रांते जातो, याप्रो कबूल केले. साा खासा स्वारी गुजराथचे सुमार

फिरल्ही आहे. मग पाहावें, कोणहीकडे जाईल. वरकड आपणास सरकारातून येकाद्येने पत्रे मामलत इजाऱ्याने करार करणे, अथवा कमाविसीने ठेवणे, यासाठीं आपणाकडील मातबर माणूस पाठवणे; आणि रसदेची ऐवजाची तर्तूद करणे, येविसी गेली आहेत. त्यास आपले मर्जीस येईल त्याप्रो कबूल करावी लागेल. येथील मर्जी यैवजाची आहे. यैवज आपण लाख पनास हजार लौकर पाठवावे, म्हणजे मर्जी ठीक करून आपणास पत्र पाठऊ. रा॥ आपाजीपंत सपरे आपणापासी आहेत. सांभाल करावा. पेशजी रो॥ देविले ते दिल्हे, तरी यात्रा आपण करविलीसी होईल. आम्ही पदरचे जाणोन, वेडेवाकडे लिहितो, रागे न भरावे. बहुत काये लिहिणे? कृपा लोभ असो दिल्हा पा॥ हे विनंती.

¶*Ganesh Shankar writes to Vishwasrao Lakshman giving a detailed account of Raghoba's doings in the North, particularly the investiture of Tukoji Holkar and the adjustment of the domestic differences in the Sindia family.*

No. 85] [*22-5-1767*

श्री

विज्ञापना. काल गुरुवारी रा॥ माहादजी सिंदे व केदारजी सिंदे व बाजी नरसिंह व राघोबा पागे व पोतेनीस त्यांची मंडलीस वस्त्रे द्यावयासी चार घटिका रात्री गेल्यावरी आणिले. कचेरीस येऊन बसले. श्रीमंतानी हती घोडे वस्त्रे सर्व आणिविली. मुख्यानी कचेरीस येऊन त्याजला द्यावी, त्यासी त्रिवर्ग मुत्छदी व विष्णु माहादेव व अवचितराव यैसे येकचित. वरकड सर्व मंडली त्याजकडे. रा॥ चिंतो विठल दिवाण यानी श्रीमंतापासी जाऊन काय सांगितले न कले. सवा प्रहर रात्र जाहल्यावरी श्रीमंती सांगून पाठविले कीं, तुम्ही डेऱ्यास जाणे. मग सर्व मंडली उठोन आपले डेरेयासी गेली. वस्त्रे जामदारखानियात माघारी पाठविली. घोडे हती जेथील तेथे गेले. कालचे वर्तमान यैसे जाहले. अजी सुक्रवारी श्रीमंत होलकराचे घरास गेले आहेत. नजर काय काय करितील ते पाहावे. मागाहून लिहू. रा॥ तुकोजी होलकर याचे नावे श्रीमंती सिके खोदून ठेविले. अजी देणार. किताब सुभेदारीचा देणार. मागाहून लिहू. अजी रावजी वडिलाकडे प्रातःकाली अले होते. त्याजवरी बहुत राग केला. तुम्ही आमचे होऊन अमचीच नुकसानी करिता. माझाच घरावरी उठला. बहुत संताप केला. हे प्रहरभर बसोन चार गोस्टी बोलावयाच्या त्या बोलोन मग विऱ्हाडास आले. दरबारचे वर्तमान या रीतीचे आहे. कालचो गोष्टी तर राहिली. रावजी तर पूर्वप्रा॥ कारभार त्याचा करितात. श्री यासी कल्याण करो.

मराठी संशोधन मंडळ
स्थळ प्रत
पं. दू. नं.

याजला राजी सर्व अहेत. पाहावे काय ठरेल. मिती वैशाख वद्य ९ सुक्रवार मागला प्रहर दिवस. सर्व मंडली बहुत शरमिंदी होऊ मा[illegible] गेली. [illegible] चबेहडा तुम्ही परभारा पाठविला म्हणूनहि बहुत बोलिले. अम्ही रावजीस विनंती केली होती कीं नानासाहेबास दाखऊन मग पाठवणे. चितास त्यांचे न अले. अम्ही सांगावयासी चुकलो नाही. बेहडा परभारा गेला. बहुत कुत्य आहेत. बहुत विषम बोलिले. कोठवर ल्याहावे? हे विनंती.

¶A news-letter narrating how Raghoba first having made arrangements for presenting Mahadji Sindia, Kedarji Sindia, Baji Narsi and others with dresses of investiture, at the eleventh hour cancelled the ceremony causing great disappointment thereby.

No. 86] *[26-6-1767*

श्री

यादी महमद इसफ जमातदार यासी मदत खर्चास सुा
समान सितैन मया व अलफ छ २२ मोहरम रुा ४०००
च्यार हजार रुो घोडो महादेव दौलताबाद याजवर
वरात देणे

¶A sum of Rs. 4,000 has been advanced to Muhammad Isaf to enable him to meet his expenses.

No. 87] *[August 1767(?)*

पुणें जमाव नं. १६८६.

नकल.

श्री

तीर्थरूप राजश्री दादासा
वडिलांचे सेवेसी

आपत्ये माधवराव सां ना विा उपरी. येथील कुशल ता छ २१ राखर-पर्यंत वडिलांच्या आसीर्वादेकरून येथास्थित असो विशेष. सिवनेर किला मोगलाईत होता, महमुद अलमखान यांचे निसबतीस किला जुनर प्रांतात; मातबर किला सरकारांत असावा, येविसी तीर्थरूप कैलासवासी रावसा व आपा-साहेबी बहुत प्रयत्न केला. तथापि किला हस्तगत न जाहला. किला बहुत उतम किल्याप्रां वडील जाणतात. त्यास किला जबरदस्तीने येणे नाहीं

याजकरिता राजकारण करून किला वस्य करावयाचा प्रकार तीर्थरूप कैलासवासी नानासाहेबी व भाऊसाहेबी चितांत आणून महत्सायासें महमुद अलमखान यासी अनकूल करून घेतले. देणे ते त्यास द्यावे, वतने इनामे मागे मोगलाईतून असतील ती चालवावी या प्रा इमान प्रमाण यादी करार करून दिल्या. त्या मशारनिलेजवळ आहेत. सनदापत्रहि करून दिल्या असतां गांव चालत नाहीं. माारनिलेचा वतनी गाव पाटिलकीचा व इनामहि मोगलाईतून याकडेच आहे. यैसे असतां गांव माारनिलेकडे न चालावा यैसे नाहीं. बहुधा हें सर्व वर्तमान वडिलांचे सेवेसी विदित जाले नसेल यास्तव विस्तारे विनंती लिा आहे. कृपा करून यांचा गाव याजकडे चालवावा. वडिली यास वचन प्रमाण दिल्हे होतें ते प्रमाणात ये, येविसीचा अभिमान वडिलासच आहे. शफतपूर्वक यासी करार जाहाला आहे, यास्तव विनंती लिहिली असे. सेवेसी श्रुा होये हे विज्ञापना.

¶*The Peshwa Madhavrao requests Raghunathrao to remove at once the impediments in the way of Mahammud Alamkhan enjoying the Inam granted to him by the late Peshwa. He recounts the history about the fort of Shivner, how Bajirao, Chimaji Appa and Nanasaheb tried hard to secure the fort. But on finding they could not do it by fighting, they thought it expedient to secure it by persuasion which they did by the grant of an Inam to the keeper.*

No. 88] *[2-9-1767*

पौ छ ८ राखर
समान भाद्रपद

अस्सल बमोजिब नकल

श्री

यादी राजश्री पंत प्रतिनिधि सूरसन समान सितैन मया व आलफ. साल-गुदस्तां राजश्री बाळाजी माहादेव मांडवगणे यांणीं सन सबांत प्रांत कराड वगैरे येथील कलमांची याद लिहून दिल्ही आहे, त्यापैकी लढे यांचीं कलमें आहेत त्याचा फडशा करून घ्यावा.

सन सितांत भवानराव यांचा दंगा जाहला. त्याणी वसूल घेतला, तो हिशोरसीदप्रमाणें द्यावा म्हणोन यादींत लिहिलें आहे. व रयतेकडे दंग्यामुळें सरकारची बाकी राहिली ती दुतर्फी पाहाणी दरसाल करावी म्हणोन लिहिले. ऐशियास मुलकची पाहणी केलिया आगोधर दंग्यामुळें मुलुक खराब जाहला आहे. पाहणी करूं नयें, गरगशा यादींत पडेल.

मजुरा द्यावी येणेंप्रमाणें यादींत लिहिलें आहे. त्यास भवानराव यांच्या वडिलाची आम्ही हिसेरशीद कैशी द्यांवी ? व रयेतेपासून भवानराव यांणी ऐवज घेतला, यामुळें सरकारचा ऐवज बाकी राहिला, त्यास हिशेरसीदीचा ऐवज मागूं नये, व सरकारची बाकी दंग्यामुळें रयतेस सोडावी.

उभयतांच्या दंग्यामुळें उभयतांकडे वसूल सीत अखेरपावेतों जाहला असेल तो रयतेचे रुजवातमुळें रयतेस मजुरा देऊन दंगा करून उभयतांनीं वसूल नेला तो नेला. यानीं गावगंना पाहून ज्याजती वसूल जाहला असेल तो जाहला. पेस्तर रयतेस मजुरा देऊं नये. उभयतांकडील वसूल मजुरा पडून ज्या गांवीं बाकी राहिली असेल ते दार नादार पाहून द्यावयाची असेल ते सरकारांत द्यावी. प्रतिनिधीस. देऊं नये. दंग्यामुळें उभयतांकडे वसूल पडला तो सरकारांत घेऊं नये. येणेंप्रमाणें करार.

दरसाल पाहाणी करूं नये. दुतर्फा पाहाणदार इतबारी पाठऊन येकदां मात्र पाहाणी करावी. लागवड व पड सर्व जमीन मनास आणून इस्तावे शिरस्तेप्रमाणें बांधून द्यावे. हिसेरशीद कराराप्रमाणें वसूल घ्यावा ; येणें प्रमाणें करार.

रामाजी माहादेव याणीं किल्ले घेतले त्याचे शिंबंदी बाबद दाहा हजार रुपये घ्यावें म्हणोन यादींत लिहिलें आहे, त्यास आमच्या माहालचा ऐवज त्यांणीं घेतला आहे व आमच्या लोकांनीं चाकरी केली आहे, ऐवज आम्हास द्यावयासी ठीक पडत नाहीं. रुपये मागों नयेत.

रामाजी माहादेव याकडील हिशेब हुजूर येतील ते पाहून प्रतिनिधीकडे ऐवज घ्यावयाचा निवेल त्याप्रमाणें सरकारांत घ्यावा. येणेंप्रमाणें करार.

¶*The paper discusses the question of recovering revenue from places which suffered in the quarrel of the Pratinidhis.*

No. 89] *[21-9-1767*

पौ छ २ जोवल

समान आश्विन

श्री

राजश्री बालाजी जनार्दन

स्वामी गोसावी यासीं

विनंती उपरी. समस्त सावकारास सन सितात तीन लक्ष रुपये हैदर नाईक याजकडील खंडणीपैकी द्यावयाचा करार जाहला होता. ते रुपये हैदर नाईक

याजकडील खंडणीपैकी साल गुा सन सबात यैवज दिल्हा. त्यात राजश्री रामकृष्ण गंगाधर याचा यैवज रुपये ७००० सात हजार नेमिलेले आहेत, ते देऊ नयेत. अमानत ठेवावयाची आज्ञा केली होती त्यास हाली नेमणुकेप्रमाणे माारनिलेचा ऐवज देविला असे; तरी रा आबाजी नाईक काबरस व रामचंद्र माहादेव यास सांगोन अमानत यैवज ज्याचे घरी असेल त्याजकडून देवणे. रा छ २७ राखर सुा समान सितैन मया व अलफ हे विनंती.

¶Balaji Janardan is ordered by the Peshwa to pay back the deposited amount of Rs. 7,000 to Ramkrishna Gangadhar.

No. 90] *[Recd. 2-10-1767?*

पौ छ १ जोवल

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री दादा यासी बालाजी जनार्दन आसीवार्द उपरी. पा उमरखेड येथिल मामलतीवर नवा येक ग्रहस्त दरसाल वीस हजार रुपये चढ बेालत आहे. त्यास जुने मामलेदारास साधतो न साधतो, येविसीचा मजकूर लेहून पाठवणे म्हणोन श्रीमंतानी लिहिले. त्यास पेशजी पा मजकुरची मामलत राजश्री अंबाजीपंत याजकडे होती. त्यास त्यानी तोटा आणिला; व पुढे तोटा मागू लागले. याजकारिता व माारनिलेकडे मागील तफावत आठ्यासी हजार निघाली, सा मारनिलेची मामलत दूर करून राजश्री कृष्णाजी अनंत तांबे याजकडे गुदस्ता भर माख्तियाची बेरीज घालून सांगितली. त्याजप्रो माारनिलेनी कसो-कसी करून मख्ता साधून, ज्याजती सतावीस हजार रुपये साधले. त्याचा खर्च गुदस्ता येकसाला दरोबस्त घालमेलीमुले जाहला. येविसीचा मजकूर माारनिलेनी आम्हास पूर्वी समजाविला होता; व श्रीमंतास मुखजबानी समजाविले. त्याचे स्मरण नसेल ऐसे वाटते. साल मजकुरी ज्याजती ऐवज गुदस्ताप्रा साधतील यापैा दरबारखर्च वगैर दाहा हजार रुपये जाऊन बाकी सत्रा हजार रुपये राहतील, त्यापौा सिबंदीचा बाहेरील पेच न पडल्यास कसोसी करून पंधरा हजार रुपये पावेतो दरसाल सरकारात हेच देत जातील. कृष्णाजीपंताचे अगत्य सर्व प्रकारे आपल्यास आहेच. त्यास श्रीमंताचे पत्र व अजमास श्रीमंतास पुर्ते समजाऊन तोटा नफा ध्यानात आणून देऊन मामलत करार राखावयाजोगेच आहे. करार राखून उतर पाठवावे. याविशी विस्तारे लिहावे नलगे. बहुत

+ येथून पुढें हस्ताक्षर नाना फडणीस यांचें असे.

काय लिहिणें, लोभ असों दीजे हे आसीर्वाद. वीस हजार दुसरा देतो, त्यापौ पंधरा तर हेच साधून देणार व नफेहि मागलि फार केले, तेव्हा हेच उतम आहे. समजाऊन उतर पाठवावें हे आसीर्वाद.

¶*Nana Fadnis writes to Moroba Dada explaining why the mamlat of Peta Umarkhed was entrusted to Krishnajipant Tambe, and how it is in the interest of Government to continue it to him hereafter. The addressee is requested to represent the matter properly to the Peshwa.*

No. 91] *[13-10-1767*

पौ छ २१ जमादिलवल
समान आश्विन पाहटेची
च्यार घटका रात्र
बा डांक

श्री

राजश्री बालाजी जनार्दन
स्वामी गोसावी यांसी

विनंती उपरी. तुम्हीं पत्रे पाठविली ती पावली त्याचे उतर.

लोक सातारा नगर ताथवडा चंदन सिवनेर तालुका येथे लोक रवाना करावयाविसी तुम्हास लिहिले होते. लोक रवाना केले, त्याचा तपसील-वार पट पाठविला त्यावरून कलल. त्यास नगर सिवनेर येथे तीर्थस्वरूपा-कडील लोक खाली उतरोन आपले लोक चढले. वरकडहि किल्यावर लवकरच लोक चढतील. गुंता पडावा यैसे नाही.

तीर्थस्वरूपापासून नगरचा किला घेतला. त्यास पेडगांव सुधा घेतले कीं पेडगाव खा करून घेतले हे ल्याहावयासी आज्ञा करावी म्हणोन लिहिले. ऐशास पेडगांव सरकारांत घ्यावे असें ठरले आहे.

रा छ १७ जमादिलोवल सु समान सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa acknowledges receipt of reports communicated by Balaji Janardan that the forts of Satara, Nagar, Shivner etc. were taken back from Raghoba Dada and placed in charge of new garrisons for each.*

No. 92] *[19-10-1767*

१/३

पो छ २४ जाखर साईकाल

श्रीराम

श्रीमंत राजश्री रावसाहेब
स्वामीचे शेवेसी

पो मल्हार रघुनाथ सां नाा विनंती येथील क्षेम ताा अस्विन वद्ये द्वादसी मुकाम नासिक स्वामीचे कृपेकरून सुखरूप असो विशष. स्वामीचे आज्ञापत्र येका संवछरानी अले ते बहुत अनंद जाहला तो पत्री कोठपरियेंत लेव्हावे? सेवकाचे वर्तमान तरी स्वामीची आज्ञा घेऊन घरास अलो ते घरीच होतो. स्वामीच्या अज्ञापत्राची वाट पाहिली, परंतु सेवकाचे स्मर्ण जाहले नाही. अता कृपा करून बोलाविले. तयार आहो. सोबत पाहून सत्वर स्वामीदरसेनास येतो. माझी कालजी स्वामीखेरीज कोणास आहे? इतके दिवस राहिलो त्यासी वतनाचा कजिया. आठ महिने घरी कोणासी खटखट केली नाही. लोक म्हणतील जे मुलालेकरासी खटखट केली, यास्तव उगाच होतो. जेस्टमासी श्रीमंत नाना[1] अले त्याजबरोबर आमचे बंधु अले. मालेगावीं दोन महिने मुकाम केला तेव्हा गारदीपणास पाठविले ते उगेच होते. मग श्रीमंत नाना जेनस्थानास अले. अम्हास म्हणो लागले जे गाव सोडून देणे. मग श्रीमंत दादापासी गेलो. कजिया फार जाहला. मग श्रीमंत नानानी अड श्रीमंत दादाजवल घातली जे मल्हार-पंताचा कजिया ध्यानात न आणावा. त्यानी माने केले. याची भीड मोठी. पुडे श्रीमंत रावसाहेब पुणियाहून येणार यास्तव कबूल केले. मग आम्ही उगेच राहिलो. भाद्रपद मासी श्रीमंत रावसाहेब अले. श्रीमंत दादाची त्याची भेटी जाहाल्या. श्रीमंत दादासाहेब घरी बसले. दाहा लक्षाची जाहागीर दिल्ही. श्नानसंध्या अनंदवलीस करावी, कारभार सर्व सोडिला, किले दादाकडे होते ते दिल्हे. सातारा जुनर नगर असेर चेंदन यैसे दिल्हे. याजकडे किले रावसाहेबानी ठेवले, श्रीत्रिबकेश्वर कावनवी धोडप सुभा केले. सोला पटा यैसे याजला दिल्हे. याजला जाहगीर पाचा लक्षांची दिल्ही. पंधरा लक्षांची जाहागीर तीस लक्ष कर्ज दादाचे रावसाहेबानी वारिले. श्नानसंध्या करावी याप्रमाणे ठराव जाहला. दिपवाली जाहली म्हणजे पुणियासी जावे बरोबर सरदारानी जावे मग हिंदुस्थानात रवाना करावे. दरोबस्त कारभार श्रीमंत रावसाहेबाकडे पडला. अपले मामल-

---

१ नारो शंकर

तीचा जाबसाल रावसाहेबाकडे. येथे श्रीमंत नानानी अड घातली जे झासी अम्हाकडे सांगावी. गोपालराव गोविंद मधे घातले. श्रीमंत रावसाहेब यानी उतर दिल्हे की तुम्हास सांगत नाही. रदबदली करू नका. झासी रावजीकडे ठेवऊ. दोन लक्ष रुपये राजश्री गोविंद रावजी व नारोपंत याजपासी मागितले. श्रीमंत रावसाहेबाचा कारभार लबाडीचा नाही. येकवचनी प्रमाण. त्यानी जे मागितले ते द्यावे. या उभयेतानी बहुत प्रेत्न केला दरबार चांगले अरजीविले. रुपये देणे लागले. राजश्री बापूची ममता; फडणीस मोरोबा सर्व अपल्यावर ममता करितात. रुपयाची तजवीज लवकर करून पाठवावी. तुम्हास सेतू तुमचे वडील. घडिघडी घडिघडी निजध्यास झासीचा. दुसरे तुमचा वसिला रुपया तरी रुपयाची तजवीज करून पाठवावी. येक दिवस निश्चित न राहावे. हुंडी करून पत्र उभयेताचे पावताच तजवीज करून पाठवावी. येथे तुमचे वडील पाच लक्ष देऊ म्हणतात. तरी हुंडी जलदीने पाठवावी म्हणजे तुम्ही पार पडला. श्रीमंत रावसाहेबाची मर्जी बहुत नाजूक आहे. श्रीमंत दादासाहेब केवल सांब ! महिण्याच्या जागा दोन महिने कामात पडत होते. येथे कांठियाच्या अनिवार यैसे आहे. कारभारी याच प्रमाण. उभयेता कारभारी आपले. यानी बहुत श्रम केले. श्रीमंत नाना सारिया रुपये जे मागतील ते देतील. यैसे असता यानी जडावा करून अपले स्थापिलेयाचे सार्थक हेच की रुपये हुंडी लवकर पाठवावी म्हणजे सार्थक जाहले. स्वामी सर्वजाण आहेत. यैवज लवकर येकघडीचा विलंब न करावा. सर्व वर्तमान उभयेतानी लिहिले आहे त्याजवरून कलो येईल. स्वामी दरसेनास सत्वर येतो. भेट होईल तो सुदिन असे. बहुत काय लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Malhar Raghunath reports to Vishvasrao Lakshman the terms of agreement between the Peshwa and his uncle Raghunathrao.*

No. 93] [*Nov. 1767 ?*

श्री

३

[पहिले दोन बंद गहाल.]

विज्ञापना राजकी वर्तमान श्रीमंत राा माहादाजी सिंदे पुण्यास दाखल जाहले. राा अवचितरावहि समागमेच आले. श्रीमताची भेटी जाहाल्या. अवचितराव

येक दिवस पुढें आले. ते श्रीमत नानाचेच घरी राहिले. वरकड त्याजबराबरील मंड(ळी) स्वार बाहेर राहुट्या देऊन राहिले. नानाची ममता साधावी म्हणून राहिले. परंतु त्याची चितातून ममता नाही. पूर्वी रा॥ बाजी नरसिंह यानी दिवाणगिरीची वस्त्रे घेतली, महादजी बावाची सरदारकी त्याचीहि वस्त्रें घेतलींच होतीं. बाजी नरसिंह व बावा येकच आहेत. रा॥ गंगाधरपंत तात्या बाजी नरसिंह याचे पक्षी आहेत. रा॥ चिंतो विठल त्याचा अभिमान रावजीकडे. त्यासी ते श्रीमंत दादासाहेबापासी. नाना तर दामुषायण. तूर्त रावजीकडे दिवाणगिरीचा कारभार ठरेल यैसे दिसत नाही, तथापि न कले. अद्यापि मोवमच आहे बाजी नरसिंह व बावाचे येक चित आहे. निश्चय ठरायासी पौष मास लागेल. माघ मासी सर्वाची रवानगी होईल. रावजीहि येत्नात आहेत. मागीं माहादजी सिंदे यानी रावजीसी कराग्शपत केली होती की, बाजी नरसिंह यासी दिवाणगिरी देणार नाही, तुमची तुम्हांसच देईन, यैसे शपतपूर्वक भाषणे जाहाली होती. येथे आल्यावरी आणिखीच बुधी जाहली, येसे वर्तमान आहे. वडिलाचा दोही दरडी हात आहे. माहादजी सिंदे हे येथे आले म्हणून रा॥ तुकोजी होलकर याजला बोलाऊ पाठविले. ते येका दो रोजानी येतील. त्याचे सिंदेचे येक चित करून उभयेतास वस्त्रे देऊ रवाणा करावे याजकरिता होलकरास बलाविले. होलकर जेजुरीस आहे, होलकरानी व तात्यानी कातराबाद मांडोगण येथे राहून फौज धरून चालावे. यासी येथून चालावयासी त्या प्रांतास दोन मास लागतील. आम्ही श्रीमंत रावसाहेबास विनंती केली आहे. त्याजकडून रा॥ तात्यासी व सरदारास आपल्याविशई निक्षूण ताकीद की याचा बदोबस्त करून देणे. चिंता न करावी. श्रीमंत रावसाहेबास विनंती करून खासा पोश्याक सनगे उतम घेतली. उतम सोबत पाहून पाठऊ. वस्त्रे घेतसमई बोलिले कीं, तुम्ही आल्यावरी हती देऊ. बहुत कृपावंत आहेत. मुख्य सतोटी दरबारची राखावी. करारापो यैवज व दरबार खर्चाचा यैसे पाठऊन द्यावा. मग दरबारची कालजी न करावी. वडिलाचा पेच तीन लाख रुाची वरात दिल्ही. ते म्हणतात कीं मजला येक रुा पावला नाही. त्यासाठी कजिया करीन. त्यासी पावतीचा हिसेब न पाठविला. आता तरी सर्व पाठऊन द्यावा. रा॥ बाबाजी प्रल्हाद आपल्या बहुत ममतेत आहे. त्याचे उभयेताचा रड (?) नित्य येतो. त्यासी त्या हिसेबाची मखलासी करून देऊन यैवज कोठे देवावा. नाही तर हिसेब रुजू करून बाकी काढून द्यावी. ते वडिलापासी घेतील, परंतु वडिलास परम दुःख होईल. परंतु त्याचा रुा येक देसी लावावा म्हणजे बाबाजीपंताचे समाधान. चिमणाजीपंत मर्द माणूस त्याजला रिकामे ठेवावे यैसे नव्हते. जे आपल्या विचारास आले ते खरे.

ज्यामधे आपली सालसी वाढे ते करावे. यैवजाची रवाणगी सत्वर करावी. आम्ही आपल्या कल्याणासाठी शतचंडीचा संकल्प केला होता. श्रीने मनोदयानुरूप सिधीस नेला. याजकरिता शतचंडी करावा. कळावे म्हणून लिहिले. राां त्र्यंबकराव नारायेण येथे आले. रा कृष्णराव बलाल यांचे हाते श्रीमंतास भेटले. दोन वस्त्रे दिल्ही. वोंकारापासी राहिले आहेत, वडिलाचे त्याचे दर्शण नाही. श्रीमंतापासी दोनच्यार महिने राहून अर्जव करावे. पुढे काही सोय करून घ्यावी यैसे मानस आहे. नित्य दर्शणास येक वेळ जात असतात. रा अनंदराव यादव होलकर याचे ममतेस आहेत. याजकडून बोलणे दरबारी तर अनदराव बोलतात. रा अंताजी विश्वनाथहि मायेत आहेत. दुसरे रा अताजी विश्वनाथ याची ममता आपल्याकडे बहुत वोढती. म्हणतात की रावजी आम्हांस बोलावितील, आमचे हाते काम घेतील तर आम्ही जाऊ. पत्र आले तर जाऊ यैसे मानस आहे. शाहाणा माणूस कर्ता आहे. आपल्याहि ध्यानातच आहे. सूचनार्थ लिहिले आसे. हुंड्याचा जाबसाल काय होतो तो मागाहून लिहू. जाटाचे वर्तमान तर आपल्यास तिकडून कललेच आसेल. श्रीनें मोठे अरिस्ट निरशन केले. आता आपला बंदोबस्त उतमप्रा करणे. कछवाधार, भदावराविशई रावजीस विचारले. त्यानी उतर केले कीं, याजला येथून दोन महिने आधिकच पाहिजेत त्या प्रांतास यावयासी. तो पावेतो तुम्ही धोपटून वसूल घेणे. उस्तवारी करणे. मामलत सांगतील न सागतील. विश्वास नाही. बहुनाइकी आहे. कलावे म्हणून लिहिले. स्वार प्यादे ठेऊन अगास नये यैसे करणे. आपल्या तालुकियात सिबंदी न वाढवणे. जमा थोडी खर्च फार. दरबारी हिसेबाचे समई खटपट पडेल. याजकरिता मागे पुढे शब्द न ये यैसे करणे. फडनिसाचे हाते सर्व कामकाज घेणे. अजमाज त्याचे बाचा व त्याचा कारकून पाठवंणे. त्याचे पत्र आपल्याविशई सालसीचे ये यैसे करणे. रा हरिपंत तात्यासहि उतम प्रा ममतेचे लिहिणे. आपाभट खरे याचे वरातेचे रुा देऊन कबज सत्वर पाठवणे. सर्व पत्राचा जाबसाल घेऊन पाठविला त्यावरून कलेल. हे विज्ञापंना.

¶*This is the third sheet of a full letter addressed from Poona to Vishvasrao Lakshman at Jhanshi, communicating news from the Poona Court where the Peshwa was trying to befriend Mahadji Sindia.*

+ पत्र पुणें दरबारांतून विश्वासराव लक्ष्मण याचा कारकून उत्तरेंत आपल्या यजमानास लिहितो.

श्री

श्रीमंत राजश्री बापू
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक विसाजी नारायेण लिमये सां नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तो वैशाख शुद्ध १२ मुा चिंचोली सरकार मलिखेड स्वामीचें कृपेकरून सेवकाचे वर्तमान प्राण रक्षूण मात्र आहे. विशेष सालमजकुरी खासा स्वारी बेदराहून सरकार मजकु(रा)वरून कृष्णापार जाहाले. घासदाणे काहीं जाहाले. मुलुक पायमली जाली. येक चितापूर माहाल, तेथे तिगस्ताची बाकी गुदस्ता रुजू करून घेतली. गुदस्ताबाबती सरदेशमुखी व सालमजकुरबाबती सरदेशमुखीचा यैवज आमचे रुो पंचवीस हजार, त्याचा ठराव काडल्हर संगमचे मुकामी रा बाजीपंत व रा नागोराम याचे विद्यमाने जमीदंाराचे व जाहागीरदाराचे कमाविसदाराचे विद्यमाने कागदपत्र जाले, तो मागे भोसले येक महिना राहोन तमाम चारणी केली. तदनंतर नवाब फौजसुधा येऊन गेले, याजमुलें तमाम मामलत बुडाली. येक पैसा वसूल यैवज नाही. त्याउपरी राज्याची गडबड जाली. याप्रमाणे तमाम मुलुक खराबी जाहला. सालगुदस्ता खाबाची मामलत केली ते तकूब जाली. यामुले सिबंदीचे पेचात च्यालीस पनास हजाराचे आलो व बाबतीपौा बाकी फार राहिली. साल मजकुरी पुणेयास येऊन चरणदर्शन जाले. राज्याचे गडबडीमुले माझे काम काहीच जाहाले नाही. यंदा मामलत न करावी तरी बाकीचा यैवज कसा उगवतो म्हणोन रसद दिली. यैवज मामलतीचा झाडून रा नागोराम याजकडे नेमून दिल्हा. मामलत तो बुडाली. त्याजकडून कारकून व रा राऊत येऊन फारच निकड केली आहे. तरी कृपालु होऊन नागोपंतास सरकारचे पत्र की उभयतां पुणेयास आलियावरी आज्ञा होईल त्याप्रा वर्तणूक करणे. दोन वाटेपावेतो मामलतीचा यैवज विसाजीपंताकडून पावला असेल. राहिले यैवजास तगादा तूर्त न करणे म्हणोन पत्र आलिया प्राण वाचतो. मज गरिबावर कृपावंत होऊन उतर आले पाहिजे. आज्ञा होईल त्याप्रा पुणेयास येईन. सर्व प्रकारे मी बुडालों आहे. सावकाराचे हाते पार करणार आपण समर्थ आहेत. श्रृत होय हे विज्ञापना.

¶*Visaji Narayan writes to Sakharam Bapu explaining the difficulties of his situation and asking relief in his Kamavisi business.*

6746

राष्ट्रीय ग्रंथ संग्रहालय
स्वरूप पत्र
सं. ६ - नं.
ता. [1767]
डा सं.

No. 95]

श्रीरामचंद्रवरद

विनंती सेवक राघो अनंत कृतानेक सां नमस्कार विज्ञापनो. पो

पहिली जासूदजोडी सेवेसी पाठविली त्याची उतराज्ञा तिसरे मासांती पावली. त्यांत आज्ञा कीं, कमाना न घेणे व मोत्ये घेऊन ठेविली आसतील ते पाठवणे. ऐसियासी कमाना तो आज्ञे-प्रो घेतल्या नाहींत. मोत्ये मोल्हेरीस पाठवावी म्हणून पहिली आज्ञा होती. त्यावरी हुजूर पाठवावयाची आज्ञा आली. त्यास मार्ग बहुत कठिण. जासुदासमागमे निर्वाह होणार नाही ऐसे जाणून (न) पाठविली. तैसीच आज्ञा आली तरी जासुदाबाा पाठऊन देईन. कासीद जोड्या दोन हुजूर आल्या, त्याजला बहुत दिवस जाले. येकहि माघारी फिरली नाहीं. येथे जासूद होते त्याचे शरीरास दुखण्याचे उपद्रव जाले. आज्ञांकिताचेहि शरीरास स्वास्त नवते. येदाचा प्रज्यन्य काल भारी; जासुदाचा निर्वाह नाही, याज-करिता दोन पत्रे वारीदार कासिदाबाा रवाना केली ते हुजूर पावली किंवा नाही हे न कले. प्रजन्य उघडलिया-वर जोडी रवाना करावी. त्यास अम्ही खरिदीचे कार्यावर ऐसे ज्यघन्य आणि बहुत दिवस शहरात राहिलो. खरिदी तों कांहीच केली नाही. येक मोत्याचा कारभार, तो तरी गुप्त, याजकरिता कितीक क्षुद्र माणसाचे सांगितल्यावर आमची विनंतीपत्रे हुजूर रवानगीची

बंदर सुरत येथील मजकूर तरी प्रस्तुत इंग्रेजाची जबरदस्ती व उदीम व्यापारहि सर्व त्याचेच घरी खरीदी फरोखत होते. मातबर मातबर व्यापारी सर्व कष्टी आहेत. आविंधासहि स्थिर-तेची आशा नाही, ऐसे जाणून आहिर्निसी अन्याये द्रव्य मेलवावयात कमरबंदी केली आहे. परस्परे कार-भारियांत विरूध चालते. तैसेच प्रजेत काहीं आविंधाचे पक्षी, कांहीं इंग्रज ऐसा डामाडोल आहे. प्रस्तुत काली नवा इंग्रेज मिस्त्र परहेज आलियावर फारसखान नामे आविंध मातबर याजकडे फुरजा बंदरची मामलत होती; तो पहिलेपासोन इंग्रेजाचे पक्षात याजकरिता मुख्य नवाबासी विरुध, व त्याचा पक्षी सिधी जाफर तोहि मातबर धनाधीश त्याजकडे खुशकीची मामलत, यासी विरुध, याजकरिता इंग्रेजाजवल दर्शविले जे फारसखान मामलतीत गुंजायेश ठेवितो. त्याज-वरून इंग्रजाने मुंबईस लेहून त्याजवर आमीन टोपीवाला आणिला. तेव्हा माारनिले त्याचे विद्यमाने काम करून आपला जिमासा खत करून पुन्हा दर्शविले कीं सिदी जाफरवर टोपीवाला खुशकीचे मामलतीवर आणावा. हा निश्चये माारनिलेस कलोन इंग्रेजासी पैगाम केला जे आठ हजार रुपये

धरावी याजकरितां तीन मांस परियंत विनंतीपत्र सेवेसी न लिहिले. सेवटी कार्तिक वद्य पक्षी यात्रेचे मिसे बाहेर निघोन मौजे इभ्रामे प्राा गल्हे आमल राजश्री दमाजी गायेकवाड हें गांव रंजेश्री रामचंद्र बसवंत याचे मोकासियांत आहे. नजीक सुरत पाच कोस तापी उतर तीरी स्थल करून राहिलो. आतां बेफिकीरी जालो जे इकडून बातमी लिहिल्याची व तिकडून आज्ञोतराची चिंता नाही. आम्ही आठवे रोजी शहरात फेरी करीत जाऊ. हुजुरून आज्ञापत्र येईल ते इभरामियास पावेल. सेवेसी श्रृत होये.

कलम १

बंदर सुरत येथील मजकुरी आलमपन्हा पुरे जात कोट मजबुत म्हणावा तरी पुरुषाचे मस्तकपरियत उंच वर सफील[1] हात दीड; तो जीर्ण जागा, सफील पडली आहे. दरवाजे बारा; तेथे मात्र चौकी पंधरा वीस माणसे, मधे क्वचित दोन दोन च्यार च्यार माणसे बेफिकीर निःकालजी. तोफ तो कोठेहि ज्यारी होयेसे नाही. नवसरी दरवाजा पश्चमचा, तेथील मातबर बुरूज धसोन पडला आहे, त्याची देखील मरमत कोणी करीत नाही; मग कोटाची कोण करितो. खंदकहि खोल नाही. सहजात घ्यावेसे आहे. तोफा लावल्या सहजात कोटपडे ऐसा विचारे, पुरेजात घेतल्यावर प्रतिवर्षी नेमणुकसिवाये घेत जावे, परंतु टोपीवाला न आणावा ऐसे होता. गुंजायेशसी कलो न आली. हे वर्तमान मुंबईस लिहिले ते आज्ञा आली जे, आठ वर्से आमची मामलत जाली आहे, त्या दिवसापासून आजपरियंत सासष्ट हजार रुपयांची निशा करून घेणे; मग दुसरा विचार. याजवरून सिदी जाफर याजला तगादा केला. हा कालवर फडचा जाला नाहीं; परंतु सिदी जाफर याचा मनोभंग पुरता जाला कीं हरयेक प्रकारे इंग्रेजाचा उछेद करावा. याजकरितां राजश्री दमाजी गायेकवाड याजकडील चवथाईचा कमाविसदार रुद्राजी गिरमाजी नामे या प्रांतीचे सकल कमाविसदार महाला निहाय दिमत गायेकवाड मामलतीचे फडसे करावयासी पटणास जाणार. त्याजसमागमे उद्वेगात जाणून त्यासीं सिदी जाफर याणे मुख्य नवाबासी गुप्त मसलहत करून केवल येकोपा भासऊन राजश्री दमाजीबावासी पैगाम करविला आहे कीं तुम्ही फौजसह वर्तमान शहरावरी येणे. तुम्ही आम्ही येकत्र होऊन इंग्रेजास काढून आर्धोआर्ध मामलत वाटून घेऊ. इतके वर्तमान पत्रद्वारी तो त्याजपरियंत प्रविष्ट जाले. परंतु कमाविसदार समुदाये मंडली राजश्री रामचंद्र बसवंत राजश्री आपाजी गणेश व गोपालराव गणेश

१ तटाची भिंत.

शहरपन्हा तो सुरत वस्ती जाली तईचा+. केवल जीर्ण, तोहि येईल. येक किला मात्र सत्वर यावयाचा नाही. तो शहर घेतल्यास विचारे येईल, चिंता नाही ऐसा प्रकार आहे. जर करितां खासा स्वारी माघारी देशाकडे फिरली, तरी मालव्यातून पावागडावरून बडोदियास आल्यास राजेश्री दमाजी गायेकवाड याचेहि समाधान होईल, वगैरे कितीक कामे खंबायत व भाडोच इत्यादिक संपादोन शहर सुरतेवर यावे. हस्तगत व्हावयाचे संदर्भ श्वल्पात व्हावयाचे बहुतेक हुजूर येऊन पावतील. कदाचित मर्जी घ्यावयाची नसली तरी चालते स्वारीत दाहापाच लक्ष रुपये येतील; व या प्रांती प्रतापवृद्धि होईल. केवल आफ्तर विचार दिसतो. तथापि मर्जीस येईल कीं खासा स्वारी महत्कार्याविना येणे कठिण. हा आपले ऊर्जिताशेने लिहितो. ऐसियासी माझे प्रारब्ध. सर्व गुण असोन आज तेरा वर्षे स्वामीचरणी कुच रोटी कुच लंगोटी याजवरच निश्चल जाले. पुढे ऊर्जित हेच कीं स्वामीचा म्हणविलो. करून दिल्हे आभये आसामी स्थापन केल्यास येखादे क्षेत्री श्नानसंध्या करून आभीष्ट चिंतन करीन. नाही तरी स्वामीप्रतापवृधीनेच ब्राम्हणाची उपजीविका ते 'ब्रम्हं ज्यानाती ब्राम्हण:' हे स्वामीचरणसंयोगे सिध जाले आहे, तेव्हा तीर्थे च गोचरी भिक्षा पवित्राणि यांचे मामलतीचे फडशानिमित्य आमदाबाजेस आटकले आहेत. थोडा-बहुत दखल शहरांत जाला. पुरता बंदोबस्त करून पटणास जातील तेव्हां झाडून मामलती विल्हेस लागतील. त्याउपरी गायकवाड सुरतसंमधी वगैरे कोणीकडे जावयाचा उद्योग करितील ते पाहावे. त्याचे मनासहि पूर्ण आहे काये म्हणून जाणावे; तरी रुद्राजी गिरमाजी केवल त्याचे दरबारी लाहानाचा थोर जाला, त्याजकडे आपले दरबारची चौकीयात तापी दक्षणतीरची मामलत च्यार पांच वर्षे आहे, ते गायेकवाडाचे मते आपलीच आहे; व यंदा त्याजला मुख्यानी बोध केला की ज्याप्रो चौकियात मामलत आपणाकडे करून घेतली आहे, त्याप्रो शहरची मामलत आपणाकडे करून घ्यावी म्हणजे कार्य बहुत साधेल. त्याजवरून माारनिलेने हुजूर श्रीमंत रावसाहेबाचे सेवेत आपला ग्रहस्त मामलत अरून घ्यावयानिमित्य पाठविला होता; परंतु श्रीमंत साहेबी त्याजला न देता नरोतमदास याजकडेसच बहाल ठेविली. प्राा डभई मात्र हे व विठल हरि व त्रिंबक सूर्याजी या तिघांची शराकत१ होती ते दूर करून दुसरा मामलेदार पाा व किलदारहि दुसरा पाा. ते डभईस जाऊन बसले आहेत; परंतु त्रिंबक

+ त्या वेळेचा.

१ वाटेदारी, हिस्सा.

कलौयुगे ॥ कालक्षेप चालेल; परंतु खासा स्वारी त्या प्रांती आल्यानेच उतम आहे. यावरी मर्जी.

कलम १

राजश्री दमाजी गायेकवाड याणी बाबीचा पराभव करून कांहींयेक स्थल त्यांजला राहावयास दिल्हे व काहीयेक स्वार चाकरीस नेमणूक करून बाकी सर्व जागा हस्तगत केली. प्राा पटण प्राचीन मातबर स्थल व माहाल इमारत देखोन मन प्रसन्नतेने तेथेच वास केला आहे. तमाम मामलत तेथेच बसले करावी, या योगे तमाम कमाठीदारास तेथे बोलाविले आहे. मामलती विल्हे लागल्यावर काये करितील हे न कले. खासा स्वारी हिंदुस्थानात गेली ते समईपासोन कारकून बोलाऊ आले; व आज्ञापत्रे बहुतेक आली. सेवटी राजश्री रामचंद्र बसवंतहि आले आहेत; परंतु दमाजी-बावा हुजूर येतील हा भरंवसा आज्ञांकितास तो पहिलेपासोनच नाही, मग आता कोठून यावा. यावर ए कले. पहिले याणी राजपिंपले येथील राज्य आधोंआर्ध वाटणी केली. नवे स्थल राहावयाचे आपलेकडे ठेविले. जुना किला राज्यास दिल्हा. त्याउपरी प्रस्तुत काली गोविंदराव गायेकवाड मुख्याचे चिरंजीव बडोदियाहून जाऊन कोणीयेक माहितगारचा विद्यमाने जुने स्थल घेतले. राजा पलोन पलीकडे डोंगरात गेला. तो तमाम सूर्याजी याचे तर्फेने किले मजकुरी कारकून आहे तो म्हणतो कीं श्रीमंत दादासाहेबाची सनद आल्यास किला देईन कीं पुन्हा हुजूर विनंतीपत्र माारनिलेन लिाा आसेल ते पुणियात होते. हुजूर आहेत. तेथे श्रीमंत साहेबाचे आज्ञेप्राो कारकून माारास ताकीद लिहितो; परंतु स्वामी हुजूर सनदेचे आपेक्षेने मानीत नाहीत. सेवेसी शृत होये. आज्ञांकित सुतेंत येऊन बसला आहे याजवरून नरोत्तम-दास याचा हेत कीं परभारे इकडे न येता हुजूर हिंदुस्थानात यावे. मग सुरत साध्यविषई वगैर मामलत सेवा करून आपले ऊर्जित करून घ्यावे.

कलम १

राजश्री आपाजी गणेश हुजुरून आल्यादारभ्य राजश्री दमाजी गायेकवाड याजसमागमे कालक्षेप बहुत संकटे केला. राजश्री रामचंद्र बसवंत आता आमदाबादेस गेले आणि राा गोपालराव गणेश याचा यैवजाचा हवाला घेऊन मामलतीस आपले विद्यमाने कमाविस-दार करून यैवजाची निशा घेतात. आद्याप पुरता बंदोबस्त जाला नाही; परंतु थोडक्याच दिवसांत होईल. त्यावर गोपालराव याचा उद्योग कोणी-कडे होईल हे न कले. दैवयोगे उभयेथा खराबा होऊन मुलकाची खराबी केली. उभयताचेहि परिनाम लागतील तो सुदिन. कलम १

राज्याचे गांव मारितो; व सोनगडा-कडेहि उपद्रव किंचित आहे. याज-वरून गोविंदरायानी भाट राज्याकडे पाा कीं पनास हजाराचे राज्य देतो व राजपिंपले वेतल्यापूर्वीच बहुत दिवस नादोद प्राा याजला राज्याने दिल्हा होता तो देतो. ऐसियासी त्याणे न मानिले. राज्य झाडून बेचिराग करीन म्हणून बोलतो. राा दमाजीबावाकड राज्याची पत्रे गेली आहेत, त्याचे काये होईल ते पाहावे. येकूण राज-पिंपले व खेडे व बाबीची मातबर स्थले याचे हाती चांगलीच बेफिकीर बसोन कालनिर्वाह कराविसी आली आहेत. त्याजवरहि दबाव खासा स्वारी या प्रांती आलियाविना होत नाहीं. कलम १

श्रीमंत रावसाहेबाचे सेवेसी मोगलाचे वकील बहुत दिवस येऊन बसले होते. त्याजवरून छावणी संमधी कामकाज विल्हे लाऊन श्रीपंढरपूर परियंत स्वारी दाखल जाली. पुढे जिकडे कार्य उपस्थित होईल तिकडे जातील, तेव्हा कलेल. वरकड चहूकडे पीक पाणी खरीप रबी देश स्वत क्षेम आहेत. कलम १

याप्रांती खासा स्वारी यावयाचा निश्चये जाला तरी आज्ञा आलिया बंदर सुरत येथील सर्व नक्ष हुजूर विनंती पत्रासमागमें दोनच्यार कागद कोरी पाने जोडून यथास्थित लेहून पाठवीन. अज्ञा आली पाहिजे. कलम १

सदरहू सात कलमे अक्षरशाहा अवलोकन करून मर्जीस येईल त्याप्रो उतराज्ञा सदर करणार धणी समर्थ आहेत. हे विज्ञापना.

¶*Ragho Anant in his letter to Raghoba reports how the English power at Surat was growing and implores him to occupy Surat in the Peshwa's name as the present situation of the country offered the best opportunity for it.*

No. 96] *[1767?*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण
स्वामी गोसांवी यांसी

पो माधवराव बल्लाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें विशेष. बिनीस ढमढेरे व जासूद नाईक चालत असतात, त्यास ते गांवगंना मनस्वी रुपये घेतात. रयतीस तसदी फार बसते याजकरितां

उभयतानी कांही घेऊ नये; याप्रो करार करून तुम्हास पत्र लिहिले असे. तर ढमढरे व जासूद नाइकास ताकीद करून मना करणें. सरकारचे बिनीवाल्यानी मात्र दर गावास दोन रुा सरकारांत घेत जावे. आणखी तसदी देऊ नये. याप्रों ताकीद करून करवणे.

¶*This is the Peshwa's order to Ramachandra Ganesh and Visaji Krishna asking them to stop Dhamdhere and the head-Jasood exacting money from ryots and thus harassing them.*

No. 97] *[1767*

श्री

यादी पत्रे संस्थान उंदेपूर :

१ गोविंद कृष्ण याचे नावे पत्र की तुम्ही तुकोजी होलकर याजला फौजसुधा घेऊन जाऊन, मेवाडचा मुलुक मारविता, नाना प्रकारचे उपद्रव लाविले आहेत. त्यास संस्थानाकडे खंडणीचा यैवज करार केला तो वसूल जाला पाहिजे. त्यात खलेल पडल्यास तुमचा मुलाजा होणार नाही ऐसे समजोन फौज मेवाडातून काढून देवण.

२ होलकर यास पत्रे की तुम्हास दोन च्यार पत्रे पाठविली की तुम्ही परभारे राणाजीचे मुलकास उपद्रव न लावणे. तुमचा यैवज येणे पाचसा लाखहि बांधून यैवज घेणे ते तुम्ही तुकोजी होलकर यास फौजसुधा रामपुरियाकडे पाठविले. त्याणी तमाम मेवाडात उपद्रव मांडिला आहे. गाव मारितात. कमाविसदारास बोलाऊ पाठविले त्यास रोजीना दाहा रुपये लाविले आहेत. नाना प्रकारचे उपद्रव मांडिले म्हणून हुजूर विदित जाले. यैशास संस्थानाकडे खंडणीचा ऐवज करार केला आहे; त्यापौ तुमचे वाटणी बमोजीब रुपये तुम्ही गुदस्ताच वसूल घेतला. हाली संस्थानाकडे यैवज राहिला तो सरकारचा, ऐसे असोन सरकारचे वसुलास तुम्ही खलेल करिता हे गोष्ट परिछिन्न कार्याची नसे. याजउपर पत्रदर्शन फौज आपली मुलकातून आणावी. सरकारचे यैवजास दिकत पडल्यास मर्जी राहणार नाही यैसे समजोन वर्तणूक करावी. तुमचा यैवज येणे असेल त्याचा तह पाचसाला सरकारातून करून दिल्हा जाईल त्याप्रो साल मजकुरी जो यैवज ठरेल तो

श्रावणपावेतो तुम्हास कमाविसदार पावता करितील. तुम्ही परभारा उपद्रव न लावणे म्हणोन पत्रे :

१ मालजी होलकर+

१ गंगाधर येशंवत

१ तुकोजी होलकर यास तुम्ही पत्रदर्शनी मुलकातून फौज घेऊन येणे.

—

३ तीन पत्रे येक मजकुराची.

—

४

¶*The Peshwa issues orders to Govind Krishna, Tukoji Holkar and Gangadhar Yeshwant to stop ravaging the territory of the Rana of Udaipur and to march out with their forces from Mewar as the Rana was paying tribute to the Peshwa regularly.*

No. 98] *[26-6-1768*

पाा छ. १० सफर

आषाढ

श्री

श्रीमंत राजश्री राऊ

साहेब स्वामीचे सेवेसी

विनंती शेवक नारो बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञाति. येथील वर्तमान ताा छ ९ सफर पंरियेत स्वामीचे कृपावलोकने करून सेवकाचें वर्तमान येथास्थित आसे विशेष. स्वामीनी आज्ञापत्र सादर केले तेथे आज्ञा की सातारियाचे जामदारखानापैकी सोन्यारुप्याचे दागिने भांडी वगैर किले पुरंधर येथे होती त्याचा जाबता तुम्हाजवल आहे तो पाठवणें म्हणून. त्यावरून जाबता सिकेयानसी होता तो सुबाजी इखे व खंडोजी धोत्रे जासूद दिाा आबाजी साठ्या याजबरोबर सा बंदी जोडगिरीचे बंद सेवेसी रवाना केला आहे. आवलोकन करून, माघारी पाठवावयाची आज्ञा जाली आणि फिरोन आल्यास पूर्ववतप्रो दतरी विल्हे लाऊन ठेऊ. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

हे विज्ञाति.

¶*Naro Ballal forwards to the Peshwa the list of jewellery and other valuable articles belonging to the Chhatrapati of Satara.*

+ Died on 27-3-1767.

No. 99] *[Before 18-8-1768*

श्री

यादी येणेप्रो सरकारची पत्रे :

श्रीमंत रावसाहेबास पत्र की आपाजी गणेश यासी उतम प्रकारे लिहून शहर अमदाबाद व ठाणी गोपाळराव याचे हवाला करून तुम्ही हुजूर येणे म्हणून.

राजश्री सखारामपंत बापू यासीं पत्र की तुम्ही आपाजी गणेश यास पत्र रावसाहेबाचे व आपले यैसी दोन पत्रे पाा की शहर अमदाबाद व ठाणी गोपालराव याचे हवाला करून हिसेब घेऊन तुम्ही लौकर येणे.

आलाहिदा-मसुदाप्रो

रा दमाजी गाईकवाड यास पत्र की तुम्ही गोपालराव याचे सर्व-प्रकारे अगत्यवाद धरून साहित्य करून शहर आमदाबाद येथे अमल बसऊन देणे, येविसी पूर्वी तुम्हास दोन च्यार पत्रे पाा परंतु अद्यापवर कार्य केले नाही. येकवाक्यता आज्ञा पाहिजे म्हणून खाली उतर पाा तर आपाजी गणेश याचे पाारपत्य उतमप्राा करून गोपालराव याचा अमल शहर व ठाणीसुधा बसऊन देणे म्हणून पत्र.

सदरहूप्रो

भगवानजी ताकपीर याचे (पत्रा)चे उतर की तुम्ही * * * * यासी सामील जाला. उतम * * * * * कार चाकरी उतम प्रकारे करणे. गोपालराव याचा अमल शहर व ठाणीसुधा सुरू जाला म्हणजे तुमचे चालवितील म्हणून तुम्ही सरकारकाम येकनिष्टेने करणे म्हणोन.

भडोचकर नवाबासी पत्र की तुम्ही गोपाळराव याचे साहित्य.

गोपालरायाचे पत्राचा जाब की पत्र पावले ; माार कलला. त्यास रा दमाजी गाास निक्षूण पत्र लिा आहे ते त्यास पावते करणे, येविसी सरकारचे कारकून बलवंत बाबूराव यांसीहि आज्ञा करून गााडाकडे पाठविले आहे. त्याजसमागमे पत्रेहि

दिल्ही आहेत; तेहि येऊन पोहचतील. गायकवाडास सांगतील. भगवान ताकपिरास व भडोचकरास पत्रे पाा. आसेत; वेणे.

—

३

तिन्ही पत्रांचे जाब सदरहुप्रो दिल्हे पाहिजेत.

¶*The letter gives drafts of the Peshwa's letters to several officers intimating them of the transfer of Gujarat from Appaji Ganesh to Gopalrao Barve and asking them to help the latter.*

———

No. 100] [*16-12-1768*

पो छ १४ साबान सन तिसा

श्री

विज्ञापना आपण छ २९ रजबची पत्रें जासुदाबराबर पाठविली तीं छ ६ साबानी तुलजापूरचे मुकामी पावली. पत्रें आली ते समई श्रीमंत रा दादा व मी श्रीमंताचे डेऱ्यात बसलो होतो ते समई लाखोटे आणून दिल्हे. त्यास सरकारचे लाखोटे निवडिले. माझे मी निवडून घेतले. माझे हातचे दादानी घेऊन वाचून पाहिले ते समई काय म्हणावे? उपाय नाही. त्यांची मर्जी तर असी. त्या पत्रांत प्रतिनिधि व सचिवाचा मजकूर लिहिला होता व श्रीमंतास प्रतिनिधीचे मजकुराची येक पुरवणी होती. त्यास वाईट वाटावे असा मजकूर प्रतिनिधि व सचिवाचा होता. परंतु त्यांचे काही नाव नवतेंच. कागद वाचून मजजवल दिल्हे. मी सहजाखालीच घेतलें. चाकरमाणूस धण्यानी लाखोटे फोडिल्यावर काय करावे? श्रीमंतास लाखोटा दिला व पत्र माझे लाखोट्यांत होते तें श्रीमंतास दाखविले. उतरे होतील ती मागाहून पुण्याहून जासूद आले आहेत त्याजबाा लेहून पाठवितों. सचिवाविसी विनंति येताच केली. जाबसाल लाखाचा जाला तो मागे लिहून पाठविलाच आहे. आता स्वामीनी लिाा त्यास येकांती गाठ पडत नाही काय करावे? श्रीमंत व दादा बसले असताच करितो. होता होईल ते खरे. असेहि करिता येकांती येकाधे दिवसी गांठ घातली आणि विनंति केली तर सकाली याजवल सांगतात त्यापक्षी सांगोन फल काय? श्रीमंत दादांजवल नेहेमी असतों. परंतु दरबारचे वर्तमान काडीभर कलत नाही. मग आपणास काय लिहावे? सारांश गोष्ट कागद स्वामीचे येतील ते याची गांठ पडोन याणी फोडून पाहिल्यास चिंता नाही असे असावे. यंदा कांहीं नाजूक लिहावयाचे नाही. असे करिता लिहिणे जाले तर

परभारे पत्र श्रीमंतास लिहावे म्हणजे गुंता वारला. असे करिता मजलाच काही लिहिणें लागले तरं तसीच रवानगी मजवल दुसरे कोणी नसता कागद पावला तर चिंता नाही. रोज लाखोटे यांचे दृष्टीस पडतात असे नाही. परंतु न जाणो यांची गाठ कोणे समई पडेल त्या पत्रात काय लिहिले असेल ते कलेना. जीव भितो याजकरिता विनंति लिहिली असे. सर्व स्वामीस समजलेंच आहे. त्याहून विशेष कांहीं नाहीं. या पत्राचे जाब इतकाच स्वामीनी पाठवा(वा) की तुलजापुरचें मुकामचें पत्र पो तें पावलें. म्हणजे हें पत्र पावलें असें मजला समजेल. श्रीमंत रा दादास न कलावे असे आता काय लिहावयाचे आहे! तथापि लिहिणे जाले तर मजवल कोणास न कलता पत्र पावे असें आल्यास चिंता नाही. कलले पाहिजे. बापू सचिव व सदासिवपंत काल निरोप घेऊन पुण्यास गेले. तेथे आल्यावर कागदपत्र सर्व आपणास दाखवितील त्याजवरून कलेल. येथे कारभार करून गेले. आपणाकडे येतील भेटतील, त्यास आपल्याकडून वाकडेपण त्यासी काही करू नये. ही माझी विनंति आहे. कां म्हणाल तर याचे कारण हेच की हा प्रकार पुण्यापासून घाटतो. न करावयाचे तें केलें. धणी आहेत. मग आपण उगेच वाकडे कशास दाखवावे? धण्यास वाटावे की आम्ही केल्या कारभारास हे हिसके मारितात. त्यास आपण इतक्या गोष्टी करणार नाहीत, परंतु मी आज्ञानपणे लिहिले असे. तिसरा मजकूर कर्नाटकात जावे, सुरापूरचे मुलकात तूर्त सिरावे असा मजकूर हाता ता राहिला. कारण भोसले येत नाही लौकर, त्यापक्षीं संशयाचें कारण जालें. याजकरिता विचार ठरला की भोसल्यासी बिघाड करावा, कर्नाटकात गोपालराव व रास्ते मात्र पाठवावे, वरकड सारी फौज घेऊन वराडचे रोखे व्हावे. याप्रो करार करून काल तुलजापुराहून कूच करून सुरापूरचा रोख सोडून ढोकी परगण्याचां गाव रामगड आहे तेथे दाहा कोस आले. येथे येक दोन मुकाम होतील. मग पुढे बिडावरून जाणार. रुकनुदौले धारूरचे घाटावर आहेत त्याजकडे पत्रे गेली आहेत की तुम्ही फौजसुध्धा येऊन भेटावे. रामचंद्र गणेश याजकडे पत्रे गेली की तुम्ही फौजसुधां पुढे न जाणे. वराडचे रोखे होणे. तुकोजी होलकर यास पत्रे गेली की नर्मदा उतरला असिला तरी फिरोन वराडचे रोखे येणे. याप्रो मनसुबा ठरला आहे. पुढे काय होईल पाहावे. लस्करचें वर्तमान स्वामीस कचे लिहावे परंतु कलत नाहीं. काय करावे? तजविजेने बाहेर मनास आणावे तेव्हा कलते. वरकड काय लिहूं. येथे मी बहुत जपोन आहे. स्वामीचा आसीर्वाद पार पाडील ते खरे. भोंसल्याकडे जावे असे ठरले ते दिवसी सखारामपंत, कृष्णराव, गोविंद सिवराम, दादा श्रीमंत होते. सखारामपंताचे स्वरूप पुण्यांत होते ते येथे नाही. गोपाल नाईक पुण्यात आपणाजवल

1126

काही मजकूर सकारपूर्वकाचे मनसुब्याचा बोलिले तो मजकूर आपण मजजवल सांगितला. लस्करात आल्यावर श्रीमंतास व दादास येके ठाई बसले असता सांगितला. कोठून हे वर्तमान निघाले, तुम्हाजवल कोण बोलला ते सांगा असे म्हणत होते. परंतु मी काही नाव सांगितले नाही. प्रमाणिक मुखेकरून ऐकिले आहे, नांव कशास पाहिजे? मग काही बोलिले नाही. सचिवाचा व प्रतिनिधीचा जाबस्वाल सुधा करतीलसा दिसत नाही. विनंति करितो, उतरे मागाहून पाठवीन. वरकड कामें स्वामीनी सांगितली त्यास गाठ पडत नाही. स्वामीस सत्य वाटेल की नाही देव जाणे असो. स्वामीनी सांगितल्यावर मी अनमान करीन की काये हे मनात येतच असेल. मग पाल्हाल कशास लिहूं? आजपर्यंत जाले वर्तमान लिहा असे. पुढे होईल तें लिहून पाठवीन. तुलजापूरचे मुकामचे पत्र पावले इतकाच जाब लिहावा म्हणजे पत्र पावले असे मजला कलेल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना रवाना सोमवार

¶*Haripant Phadke writes a full letter to Nana Fadnis at Poona from the Peshwa's camp at Tuljapur. The letter discloses many important points in Peshwa Madhaorao's method of work. The Dada referred to is Moroba, cousin of Nana who was the principal Secretary of the Peshwa and without whose knowledge no affairs could be transacted. Nana Fadnis was rather jealous of his cousin Moroba Dada.*

No. 101] *[31-12-1768*

पो छ २४ साबान
[illegible]

श्री

श्रीमंत रा॥ नाना स्वामीचे सेवेसी

पो माधवराव नारायण सां॥ नमस्कार विनंती येथील कुशल ता॥ छ २१ साबान पावेतो वर्तमान येथास्थित असे. यानंतर तोतिया किले नगरी आहे. हा किले देवगिरीस पाठवणे आणि देवगिरीस तुलाजी आंगऱ्या आहे तो आणून पुणियास पावता करून पुरंधरावर पाठवणे म्हणोन हुजूरची आज्ञा जाली आहे. परंतु येविशी सरकारची सनद नाही व बराबर हुजूरचे लोक व राऊतहि आसिले पाहिजेत व कांहीं आम्ही येथून देऊ. त्यास पंचवीस राऊत व पनास गारदी व येक कारकून हुजुरून पाठऊन द्यावा. येथून राऊत व लोक त्याबरोबर देऊन तोतियास देवगिरीस पाठऊन देऊन तेथून तुलाजी आंगऱ्यास आणून सेवेसी पाठऊन देतो. बहुत काय लिहा लोभ असो द्यावा हे विनंती.

¶*Madhavrao Narayan requests Nana Fadnis to send some more troops and gardis to safely escort the Pretender to Devgiri fort and Tulaji Angria back to Poona from Devgiri.*

तोतया घनगडास नेला त्यास त्याजला काये करतात आणि कसकसा ठेवितात हे तुम्ही व आम्ही मिळून घनगडानजीक जाऊन पाहू. त्याजवरून राघोपंत व आपण पर्वतीहून निघोन घनगडाआलीकडे पांच कोस भोवरकस म्हणोन गांव आहे तेथे गेलो. तों राघोपंताचे कोणी सोयरेधायरे भेटले. त्याचे जवळ राघोपंत जाऊन भोजन केले. आपणास बोलाविले नाही. मग आपण चितात आणिले की याणे आपल्यास जेवावयास बोलाविले नाही, आपण त्याजपासी कशास असावे ? असे जाणून आपले हाते भात करून जेऊन लागलेच पुण्यास फिरून आलो. आपले बिऱ्हाडी पर्वतीस आलो. महिणाभर परियेंत पहिल्याप्रा्ा भिक्षा मागून असो. मग येके दिवसी सिवराम दीक्षित आपणास पुण्यात भेटले ते कोठेसे भेटले म्हणून पुसिले, त्यास मोरभटाचे घरी होते. मोरभटाचे तुम्हास काये ठावके म्हणून पुसिले, त्यास पर्वतीस राघोपंतानी सांगितले होते की सिवराम दीक्षित तोतयाचे बरोबरचा आहे. मग आपण त्याजला विचारले कीं हे दीक्षित कोठे राहतात ? तेव्हां राघोपंती सांगितले की पुण्यात मोरभट याचे घरी राहातात, त्याजवरून आपण सहज मोरभटाचे घरास गेलो. तेथे दीक्षितांची भेट जाली. तेथे मोरभटाची व कोंडभटाची वोलख झाली. त्याणी आपणास विचारले कीं तुम्ही कोठे असता ? आपण सांगितले कीं पर्वतीस असतो. ऐसे बोलून बिराडास आलो. मोरभटाचे घरी माहादाजी नारायेण येत असे. याची मग येका दो दिवसी मोरभटाचे घरी वोलख येत जात होतो. दीक्षिताचा आमचा नमस्कार होत असे. आपणास दीक्षिताकडे जावयास कारण हेंच की तोतया खरा आहे की खोटा आहे हे सिवराम दीक्षितास ठाऊक असेल, त्याजला विचारावे याजकरिता जात होतो. विचारावयाचे कारण हेच की जर खराच असला तर सिवराम दीक्षित त्याचे कश्येपीचे आहे त्याचे बरे होईल. त्याची वोलख असल्यास आपलेहि बरे होईल म्हणोन दीक्षिताकडे जात असो. तेव्हां दीक्षित रोज गंगाधर-भट कवें याचे घरी जात येत असत. आपणास येक दिवसी बरोबर गंगाधर-भटाचे घरी दीक्षित घेऊन गेले. भटजीनी विचारले कीं दीक्षितबावा तुम्ही बरोबर ब्राह्मण आणिले आहेत हे कोण ? मग दीक्षित बोलिले की हे द्राविड ब्राह्मण आहेत. हे राघोपंत रेवदंडेकर याजबरोबर घनगडाजवळ जाऊन आले आहेत. त्याजवरून भटजीनी आपल्यास विचारिले की तोतयाचे वर्तमान काय आहे ? आपण सांगितले कीं किल्यावर अटकेत ठेविला आहे म्हणून ऐकतो ऐसे सांगितले. मग दीक्षित व आपण तेथून उठोन आपलाले घरास गेलो. साहेबी पुरसीस केली की तुम्ही घनगडाजवळून राघोपंतापासून आला हें वर्तमान दीक्षितास

काये ठाऊक? त्यास आपण सहज दीक्षिताजवल बोललो होतो त्याजवरून दीक्षितानी गंगाधरभटजीजवल सांगितले. पुढे दोनच्यार महिणे दीक्षित व आम्ही येका दो दिवसी भेटून बोलत असू. गंगाधर भटजीनी व विसाजीपंत गद्रे याणी श्रीमंतास राक्षेसभुवनाचे मुकामी पुण्याहून तोतयाविसी काही पत्र लिा आणि मजपासी दिल्हे. मजला म्हणाले की तुम्ही आमचे ममतेचे आहात. हें पत्र रघुनाथभट करवे श्रीमंतापासी आहेत त्याजवल पावते करून ते त्याचे श्रीमंताचे उतर आणून देतील ते घेऊन येणे. त्याजवरून आपण पत्र घेऊन राक्षसभुवणीचे मुकामी जाऊन ते पत्र रघुनाथभटास दिल्हे. त्याणी श्रीमंतास देऊन उतर दिल्हे ते गंगाधरभट यास व विसाजपंत गदरे याजपासी घेऊन आलो. तें पत्र गंगाधरभटजीणी वाचले. त्यात श्रीमंताणी लिा होते की तुम्ही घनगडास जाऊन तोतया खरा आहे की खोटा आहे याची चौकसी करून येणे ऐसे आपण ऐकिले. मग दोचौ दिवसी गंगाधरभटजीणी नागोराम यासी घनगडास पाा. विसाजीपंत गदरे व शामराव ऐसे भाऊ खरा म्हणत असेत, त्याजवरून त्यासहि नागो रामाबराबर दिल्हे. ते किल्यावर जाऊन तोतयासी पाहून खाली आले. आपण मणसुबा केला की हे गेले आहेत, तोतयासी खरे खोटे करितात हे आपण जाऊन पाहावे, यास्तव आपण घनगडाखाली नागो रामाजवल गेलो. आपल्यास नागो राम वोलले, कीं तूं श्रीमंतापासी रघुनाथभटाजवल जाऊन पत्राचे उतर घेऊन आलास, तू किल्यावर जाऊन आपले दृस्टीने तोतयासी पाहून येणे. त्याजवरून आपण परवानगीने वर्ता जाऊन तोतयासी बोललो कीं तू खरे किंवा खोटे हे जसे असेल तसे सांगावे. उगेच भ्रमात घालता. त्याजवरून तो बोलला की जे बोलणे तें नागोरामापासी व विसाजीपंतापासी व रामरायापासी सांगितले आहे. तुझी आपली काही वोलख नाही, तूं येथून जा. त्याजवर आपण खाली नागोरामापासी आलो. त्याणी विचारिले कीं तुम्ही जाऊन काय केले? आपण सांगितले कीं तोतयासी पाहेले आणि जे बोलावयाचे ते तुम्हापासी बोलिले आहेत असे आपणासी बोलला आणि मजला जाये म्हणोन सांगितले. मग आपण खाली आलो ऐसे नागोरामास सांगितले. त्याजवर नागोराम व विसाजीपंत व शामराये ऐसे वेहेरास आले त्याजसमागमे आपणहि आलो. तेथून नागोराम याणी गंगाधरभटास पत्र पुण्यास लिहून येक मणुष्य पाा. ते पत्र गंगाधरभटास पावलियावर तेहि वेहरास आले. तेथे भटजीसमागमे दीक्षितहि आले त * * नागोरामाचे व गंगाधर भटजीचे ऐसे याचे भाषण येकांतात काये झाले ते आपणास ठाउके नाहीं. येक दोन दिवस वहेरी अवघेच होते. उपरांतिक आपण पुण्यास आलो: बिऱ्हाडी राहिलो. त्याजवर दोचौ दिवसाणी नागोराम व गंगाधरभटजी वगैरे सर्व पुण्यास

आले. आपण आपले बिऱ्हाडी दोन तीन महिणे होतो. सिवराम दीक्षित याचे येथे जात होतो. त्याजवर श्रीमंत राक्षेसभुवणाहून पुण्यास आले. गंगाधरभट व नागोराम याची व श्रीमंताची काये बोलीचाली जाली ते आपणास ठाउकी नाही. मग फिरोन गंगाधरभट श्रीमंताची आज्ञा घेऊन व पत्र घेऊन घनगडास गेले. समागमे विसाजीपंत गदरे व शामराव व सिवराम दीक्षित व रांम दीक्षित व अनंदराव देशपांडे पुणेकर व दौलतगिरी गोसावी गंगाधरभटजीचे समागमे होता तो ऐसे घनगडास तोतयापासी बोलखावयासी गेले तेव्हा आपणहि समागमे गेलो. तेव्हा किल्यावर अवघेजन गेले, आपणहि गेलो. तेथे तोतयाचे व गंगाधरभटजी व विसाजीपंत व दीक्षित याचे भाशन येकांतात काये जाले ते आपणास ठाऊक नाही. मग अवघेजन खाली आले. येऊन विसाजीपंत गदरा व शामराव व गंगाधर भट ऐसे कुदरीस जनकोजी तोतयाकडे गेले. दौलतगिरी गोसावी व अनंदराव देशपांड्या पुण्यास आले. आपण चितास विचारले कीं गंगाधरभट वगैरे कुंदरीस गेले आहे, हे तेथून येतात तोंपावेतो कोकणात च्यार दिवस पोट भरावयास जावे. इतक्या गृहस्थाच्या बोलखी जाल्या आहेत. तोतया खरा जाल्यावर हे ग्रहस्त आहेत, याचे बरे जाल्यावर आमचेहि बरे करतील. ऐसे जाणून कोकणात परभारा घनगडाहून गेलो. दोन महिने कोकणातच होतो. मग पुण्यास आलो तो वर्तमान ऐकिले की दौलतगिरी गोसावी याणी काही माणसे नेऊन घनगडात फितूर केला त्याजबद्दल नागोराम वगैरे याजवर इतराजी जाली. कितीकांची डोचकी मारली ऐसी वदंता ऐकिली. सिवराम दीक्षित व विसाजीपंत गदरे व शामराव ऐसे धरले गेले. गोसावी पळून गेला ऐसे ऐकिले. पुढे घनगडाहून तोतयास पुण्यास तोफ-खान्यात आणिला ते समई कोंडभट पुण्यांतच होते, त्यार्ची व आमची भेट होत असे. आपल्यास येकदोन वेला गारदी येऊन तोतयासी भोजन व दशम्या करून घालावयासी घेऊन गेले होते. तेथे तोतयाचे व आपले बोलणे काही झाले नाही. पुढे तोतया अणुबाईचे वाड्यात नेला, तेथे गोधूबाई वाडियातून येत जात असे. साहेबी पुरसीस केली की गोधूबाईची व तुमची बोलख कधी जाली त्यास आपण गंगाधरभटाबरावर घनगडास गेलो आलो हे गोधूबाईस ठाऊक होते. आपल्यास गंगाधरभटाचे घरीहि येकदोन वेला भेटली होती त्याजमुळे तिची आपली बोलख होती. पुढे अणुबाईचे वाड्यांत तोतया होता. गोधूबाई आली ते आपल्यास विचारू लागली की शामभट घरचा मजकूर कसा काये आहे? तेव्हा आपण उतर केले की खरे खोटे आपणास ठाऊक नाही. आपण त्याजबराबर नवतो, तुमचे तुम्ही बोलखूण घ्या. खेपा झाल्यावर हिरमुष्टीभर अन्न मात्र आपणास प्राप्त करवावे. कोंडभटहि नित्या भेटत असे. तो व आपण बोलत असूं की

खेपा झाल्यास उतम आहे. मग तोतयासी तोफखान्यात नेले तेथेहि येक दोन वेला गार्दी येऊन दशम्या करावयास नेले. दशम्या करून घातल्या. चौकीमुले काही भाष झाले नाही. मगतो तयासी नगरास पाठविला. मग कोंडभट आपल्या घरास गेले. आपण पुण्यातच होतो. उपर मोरभट येक दिवस म्हणत होता की माहादाजी नारायण व कोंडभट ऐसे नगरास गेले आहेत म्हणून ऐकतो ऐसे बोलला. त्याजवरून आपण नगरास गेलो. तेथे चौदिवसी बाजारात कोंडभटाची व महादजीपंताची व आपली भेट जाली. तो व आपण चिमणाजीपंत मुजमदार याचे घरी त्याचे बिन्हाड होते तेथे गेलो, तों कोंडभटाणी सांगितले की किल्यातून तोतयाची चिठी आपणास आली आहे, की मीरखान वगैरे किल्यात फितावले आहेत. भगवतसत्येकडून काम घडोन येईल. मग त्याणी दोघाणी नारोबा शागिर्द माहादाजी नारायेणाचा होता तो पुण्यास कासीपंत फडके याजकडे काही ऐवज आणावयास पाा, तो कासीपंताजवल जाऊन दोनसे पुतल्या घेऊन आला. त्या पुतल्या किल्यातील लोकास वाटल्या व कोंडभटाणी आपले घरीहून काही आणिले रुा व सोन्याची कडी तेहि वाटली. मग कोंडभट याणे खेडकडुसानजीक कोरगांव आहे तेथील पाटील रामजी व माहादजी व काही कोली ऐसे घेऊन नगरानजीक आले. तेथे लोक ठेऊन दोवे पाटील व कोंडभट ऐसे विन्हाडास माहादाजी नारायणापासी आले. पुढे रात्री किल्यातील लोकाणी माल टाकावी आणि त्याणी तयार असावे, बाहेरून कोल्याणी वगैरे जाऊन माल वेंचूण किला घ्यावा ऐसा मनसुबा होता. तो अगोदरच किल्यात फितवा जाला म्हणोन कलले, त्याजवरून त्याणी किल्याची बंदोबस्ती केली. बोभाटा जाला. मग आपण व कोंडभट पल्हन पंढरपुरास गेलो. माहादाजी नारायेण कोणीकडे गेला आपल्यास ठाऊक नाही. नगरात होतो ते समई कोंडभट आपल्यास बोला होता की येथे कांही ऐवज लागला तर रामाजी माहादेव व शंकराजी केशव हे आपले या कार्याचे ममतेत आहेत, जो ऐवज लागेल तो देतील. पुढे तोतया दौलताबादेस नेला. आपण पंढरपुरी होतो. तेथे मणसुबा दोघाणी केला की खायापियास नाही, कोठे देवद्वारी राहावे. मग तेथून निघोन जेजुरीस आलो. देवलात होतो. तेथून पुण्यास गेलो. तेथे गणपतीचे दर्शणास गेलो, तो गोधूबाई आली होती तिची आपली भेट जाली. आपण त्याजला नगरचे वर्तमान साकल्यें सांगितले आणि आपल्यास खायास नाही, खराब जालो ऐसे सांगितले. मग गोधू-बाईणे धर्मदाखल रुा शंभर देते म्हणून सांगितले आणि वाड्यांत गेली. आपण आपले बिन्हाडास परवतीस उभैता गेलो. तेथे गोधूबाईणे आपल्या माणसाबरोबर रुा शंभर पाठऊन दिल्हे, ते रुा आपण उभैताणी घेऊन पोटास खात होतो. पुढें

उभैताणी मणसुबा केला की येथे उगेच बसून काये? कोठे तऱ्ही पोट भरावयास जाऊ. आता जाणे तर औरंगाबादेस जाऊन पोटहि भरू आणि तोतयाचा काही कांही प्रेत्न जाल्यास करू. ऐसा मणसुबा करून सातारियास+ धर्मशालेस जाऊन राहिलो. रोज देवास जात येत असो. तेथे येक दिवस केशोभट पुजारी गणपति किल्यातील त्याचा तेथे आला, त्यास आपण विचारले. त्याणे किल्यात असतो म्हणोन सांगितले. त्याजवरून आपण त्यासी च्यार गोष्टी ममतेच्या बोलून आपले वर्तमान सांगितले आणि त्याजबरोबर काल्या चबुऱ्यापरियेत गेलो आणि त्यास वाटेणे सांगितले की किल्यावर तोतया आहे त्यास आमचा नमस्कार प्रविष्ट करून याचा जाब आणून देणे म्हणोन सांगितले आणि त्यास दक्षना दोन च्यार रुा दिल्हे. त्याणे कबूल केले की आमचा जेथवर प्रेत्न होईल तितका करून म्हणून बोलून किल्यास गेला. आपण सातारियास बिऱ्हाडी गेलो. पेशजी जेजुरीमधे मल्हारपंत व शामा ब्राह्मण आम्ही पंढरीहून जेजुरीस गेलो त्याचे अगोदर हे दोघे जन देवापासी सेवा व ज्येप करीत होते, तेथे देवलात त्याची आमची वोलख जाली होती, तेथे त्याला आपले हे वर्तमान कुल सांगितले होते. त्याणीहि आपले वर्तमान आम्हास सांगितले कीं दाहापांच वर्षे आपण येथे सेवा व ज्यप करितो. मग आपणास आसीर्वाद दिल्हा की तुमचे कार्य होईल आणि तोतियाहि खरा होईल. काही चिंता न करणे ऐसे बोलिले होते. त्या ब्राह्मणास जेजुरीत दृष्टांत जाला कीं सातारियास जाऊन सेवा करणे. त्याजवरून ते सातारियास आले. तेथे त्याची व आपली मागती गाठ पडली. त्यास आम्ही आपले वर्तमान सांगितले. मग ते व आम्ही येकत्र जालो. अंताजीपंत पहिले पुण्यामध्ये सदासिवभट धर्माधिकारी याचे घरी राहात होते ते तोतयाकडे अणुबाईचे घरी वगैरे येत जात असेत, याजमुले त्याची आपली वोलख होती. तो नगरचे फितुरात काही नवता. तो शहरात बाईजीपुऱ्यांत पाचसात महिणे राहिला होता. आपण येक दिवस सातारियाहून शहरास आपला कोणी सोबती वोलखी असेल तर भेटल म्हणोन गेलो. तेथे अकसमात बाईजीपुऱ्यात हणुमंताची पूजा अंताजीपंत करीत होता त्याची आपली भेट जाली. त्याचे बिऱ्हाड बाइजीपुऱ्यात पाहेले. आपण आपल्या गोष्टीहि त्याजपासी सांगोन सातारियास आलो. येथून सारे सोबती घेऊन चौघे जन शहरीं अंताजीपंताचे बिऱ्हाडास आलो. तेथे दोनतीन महिणे होतो. चंपाशष्टी जालियावर येक दिवसी दौलताबादेस धोत्रजोडा घ्यावयास आलो आणि दरवाजियावर सांगितले की अगांतुक ब्राह्मण आहे. मजला आत भोजनास जाऊ द्या. त्याजवरून दरवाजकरी याणी जाऊ दिल्हे. मग शहरपणियात केशोभटाचे घर पुसत त्याचे

+ औरंगाबादेजवळील सातारा.

घरास गेलो. त्याचे मुलाची व आपली वोलख नव्हती. आपण त्याजला पुसिले कीं तुम्ही केशो भटाचे कोण ? तेव्हा त्याणी सांगितलें कीं आम्ही त्याचे पुत्र आहो. मग आपण त्यास सांगितले कीं तुमचे बापाची आमची वोलख आहे, आम्ही काही त्यास दक्षना दिल्ही आहे व आपले वर्तमान सांगितले आहे. तेव्हा कासीनाथ बोलला कीं तुमचें वर्तमान आम्हास कलले आहे. आमच्याणे नमस्कार तोतयासी पोहोचावयाचा जो प्रेत्न होईल तो करू. मग आपण त्यास सांगितले की तू शहरास येकदा येऊन आमचे बिऱ्हाड पाहून जाणे. त्याजवरून तो व आपण शहरास गेलो. तेथे अवघ्यास भेटविला आणि वर्तमान सांगितले. मग तेथेहि तो बोलला की जेथवर आपल्याच्याणे प्रेत्न होईल तो करू. मग त्यास येक रुा दक्षना दिल्ही आणि वाटे लाविला. त्याजवर तों फिरून आला नाही व आपणहि किल्यास आलो नाही. आत्माराम नाईक सावकार शहरात असतो त्याची व अंताजीपंताची वोलख होती. पेशजी दोन वर्षें जाली, जनकोजी शहरात होता, तेव्हा आपण येकदा शहरात आलो होतो. तेथे चौकात येक ब्राह्मण बाबूराव सोणी म्हणून होता तो जनकोजीच्या गोष्टी बोलत होता. त्याजवरून आपण त्याजला विचारले की तुमचे नाव काये ? आणि कोणीकडे असता ? तेव्हा त्याणी सांगितले कीं आमचे नांव बाबूराव, आम्ही जनकोजी तोतया याजकडे असतो. मग आपणहि आपले वर्तमान सांगितले कीं तोतयाचे फितुराचे आपण आहोत म्हणून सांगितले होते, तो बाबूराव हली आत्माराम नाइकाचे घरी बिऱ्हाडी आहे, तो अंताजीपंताचे बिऱ्हाड विचारीत आला, तो अंताजीपंत देवास गेला होता. मग हाहि देवास अंताजीपताकडे गेला. तेथे त्याचे भाशन काय झाले ते आपणास ठाऊक नाही. बाबूराव तेथून आपले बिऱ्हाडास गेला. अंताजीपंत घरास आला आणि आम्हास सांगितले की बाबूराव आत्माराम नाइकाचे घरी राहात आहेत, त्याणे वर्तमान सांगितले कीं केवलराम पुरबी या किल्यातील चाकर आहे त्याचा बाप येथे आला होता, त्याणे आत्माराम नाइकापासी व आपण बाबूराव उभैतापासी सांगितलें कीं किल्यावर तोतया आहे, तो शामभटाचे व कोंडभटाचे व अंताजीपंताचे नाव घेत असतो. ऐसी पुरबियाणे बाबूराव यास सांगितले, म्हणून अंताजीपंताणी आपण साऱ्यास सांगितले कीं साऱ्याणी त्यासी उतर केले की येणे प्रो बाबूराव खरे सांगतो किंवा खोटें सांगतो हे काये कले ? मग दुसरे दिवसी बाबू याणे आपले नावे परभारा आपल्यास न कलता तोतयासी पुरबियाजवल पत्र दिल्हे ते पुरबिया घेऊन दौलताबादेस जाऊन आपले लेकास दाखविले. तो लेक हे पत्र खरे लटके कोण्ही दिले हे पाहावयासी शहरी आत्माराम नाईक याचे घरी आला. मग आत्माराम नाईक त्या पुरबियास आपणा-पासी आवघ्यापासी आला ते समई आपण परसाकडे वाहेर गेलो होतो. बिऱ्हाडी

आत्माराम नाईक व कोंडभट वगैरे बोलत होते. इतकियात आपणहि बाहेरून आलो. मग आम्हास अवघ्याणी पुरबिया केवलरामास भेटविले. आम्हास पुरबियाचे वर्तमान सांगितले. मग आपण सारे त्यास बोलिलो, की आम्ही तोतयासी चिठी देतो हे नेऊन त्याजला देऊन जाब घेऊन येसील की काये ? तेव्हा तो बोला की तुमच्या पहिल्या येक दोन चिठ्या आपणाजवल आल्या, परंतु तुमची आमची भेट नाही म्हणून चिठ्या तोतयासी दिल्ह्या नाहीत. हाली तुमची आमची भेट जाली, आता चिठी द्याल ती तोतयास पावती करून तिचा जाब आणून देऊ, ऐसे बोलला. मग आपण साऱ्याणी त्यास तीन रुा दिल्हे आणि कोंडभटाणी चिठी लिहून दिल्ही ती चिठी घेऊन दुसरे दिवसी अंताजीपंत व कोंडभट ऐसे आत्माराम नाईक याचे घरी पुरविया होता त्याजपासी गेले आणि आणखी त्या चिठीत काही मजकूर आत्माराम नाईकाणी व त्याणी काये लिहिल्या हें आपणास ठाऊके नाही. आपण बिऱ्हाडीच होतो. चिठीचा जाब घेऊन पुरबिया कधी येईल म्हणून आत्माराम नाईकास पुसिले. त्यास त्याणी सांगितले की येका दों दिवसी येईल, परंतु जाब काही आला नाही. त्याजवर आठा दाहा दिवसाणी साहेबाची स्वारी येऊन आपणास शहरातून चौघास धरून किल्यास आणिले. बाबूराव अगोधर आठ दिवस नासिकास घरास आपल्या गेला. मल्हारपंत दुखनाईत होता तो शहरातच राहिला. येणेप्रो वर्तमान ठाऊक आहे. छ १७ माहे रमजान.

बो शंकरराव माधव * * कानुगो कुलकर्णी किले मजकूर

¶*A certain Dravid Brahmin submits a written statement giving a long personal story and explaining how he came in contact with people who more or less were involved in the affair of the Pretender of Sadashivrao. The writer goes to Ghangad, interviews the Pretender, cooks food for him and converses and associates himself closely with a number of persons who figured most in this affair, notably Raghunathbhat, Shivaram Dikshit, Gangadharbhat Karve, Anubai and Godubai. Hence the statement is important.*

No. 103] [*20-1-1769*

नकल

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री बालाजी जनार्दन स्वामी
गोसावी यांसी

पंा माधवराव बलाळ प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणे विशेष. प्रो येदलाबाद हा माहल राजश्री माहदजी सिंदे

याजकडे सरंजाम आहे. याची जफ्ती तुम्ही केली म्हणून हुजूर विदित जाले, त्याजवरून हे पत्र लिहिले आसे; तर या माहालची जफ्ती करावयास कारण काये? जफ्ती मोकळी करणे, वसूल घेतला आसल तो मारनिलेकडील चिटको सिवदेव कमाविसदार याजकडे माघारा देणे. फिरोन बोभाट येऊ न देणे. जाणीजे छ ११ रमजान सुा सन तिसा सितैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶Madhavrao Ballal Peshwa orders Balaji Janardan to restore to Mahadji Sindia the province of Edlabad which belonged to him and which was attached by the addressee.

No. 104] *[25-1-1769*

पौ छ ९ सवाल सुा तिसा
माघ वा भिवजी जासूद जथे
बजाजी नाईक.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गो

पो माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणे विशेष. तुम्ही छ २९ सावानचीं पत्रे पाठविली ती छ १४ रमजानी पावोन लिखितार्थ कलला.

गदवालचे खंडणीचा मजकूर तर वीस हजारावर चुकवावयाची नाहीं. पेशजी लिहिल्याप्रो कबूल करीत नसल्यावर इकडेच विल्हे लाऊ. तेथे वीस हजारावर न करणे.

गोविंद मल्हार खिजमतराऊ दिा रंभाजी निंबालकर याजकडे सन सबापासून साल मजकूरपर्यंत यैवज येणे येविसी लिा ते कलले. त्यास सारे निंबालकर येथे मिलाले आहेत. त्यासी बोलोन मागाहून लिहून पाठविलें जाईल.

हैदर नाइकाचे हवाल्याबाबत नारायणदासाकडे दोन लक्ष सत्रा हजार सातसे पंचवीस रुा येणे. त्याचे होन हैदरी मिलेनात याजकरितां तोडमोड करून काही होन, बाकी नख्त, याप्रो फडशा करून घेतला. नुकसान बाजार पाडास आणि खंडणीचे दरास चोवीस हजार सवा तेरा रुपये येक आणा आला, परतु नुक(सा)न नव्हे. बाजार पाडास मात्र नुकसान. खंडणीचे दरास नुकसान नाही म्हणून लिहिले ते कलले. तोडजोड करून ऐवज घेतला उतम केले.

मौजे टांकली ताा मानूर हा गांव पागा गणेश गंगाधराकडे आहे. त्याजकडे सिवचे सेरणीबाबत बारासे रुा करार केले. हवाला धोडो केशवानी घेतला त्यास ताकीद होऊन भरणा लवकर करीत ते करावे म्हणोन लिहिले ते कलले. त्यास सदरहू यैवज गणेश गंगाधर यांजकडील पागेचे बाजे लोक पोग्यांचे नालबंदी-पैकी जमाखर्च लस्करांत जाला.

रा छ १६ रमजान सुा तिसा सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The letter records the purport of the despatches sent to various powers, e.g., Haidar, the Raju of Gadwal, etc., in settlement of the tributes due from them.*

No. 105] *[16-2-1769 ?*

पौ छ २३ जिलकाद

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री बापू स्वामीचे सेवेसी

पांड्य त्रिंबकराव सिवदेव कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा माघ शुध्ध ११ सुा जैनाबाद जाणून स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. चिरंजीव तात्याचा काळ जाल्यावरी रो खंडेराव पोवार मातुश्रीच्या लक्षानरूप दरबारास आगोधर सरकारांतून वर्जिले आसतां गेलेच होते. हे वर्तमान यैकूण गणेश संभाजीस उभे करोन जवल कारकून थोरले बाईने दिल्हे आहेत, त्यास न कलत रो गोविंदराव गायेकवाड यांच्या विद्यमानें श्रीमंतापासी जाऊन विनंती करऊन नवे दिवाण करून कारभार आमचा आम्ही करूं, दोन लक्ष रुा नजर देऊं, म्हणौन विनंती केली. त्याजवर विचार करोन सांगू यैसे उतर केलें. मुत्सदीमंडलात कोणी कसे, कोणी कसे, बोलतच आहेत. चिवडा करावयासी कमी न केली. आतां गोपाल संभाजी व वासुदेव संभाजी मेरट प्रातून आले. तेहि आम्हास भेटून पुढे गेले. कांही देऊन रोजगार करावासी उमेद तर आहेच. यैसा खुलासा परभारे निघाला. थोरले बाईचे मानस आम्ही दरबारचा बंदबस्त करावा आणि दौलत राखावी. धाकटे बाईने खेकटे आरंभिले आहे. हातीचे तोंडी लांकूड देऊन काम बिघडले. याउपरी येविसीचा विचार काये

करावा? सविस्तर विनती करावयासी राजश्री चिंतो कासी यांसी पाा आहेत. हे विनंती करितील. ध्यानास आणून आज्ञा कर्तव्य ते करावी. तदनरूप वर्तू वं कालाबाग, पाटण दोनी माहाल रदकर्जास लाऊन दिल्हे आसतां कर्ज फिटले नाही. दोनी माहालच्या रसदा सरकारांत घेतल्या. हा कारभार रो आबाजी माहादेव यानी केला. आमचा हिसेबहि आणविला तो जाऊन पोहचला. आतां पैका घेऊन माहाल परभारे लावले. पुढे होणे ते होऊ, यैसे जाले. तूर्त आम्हांस रदकर्जातच च्यार रुा येणें तें हातचे गेले. इतका लाभ जाला. श्रीइछा प्रमाण. दरबारचे वर्तमान पोवाराकडील सरदारीचा बखेडा जाला आहे ते व राजकीये व स्वकीये सर्व वृत निवेदन माारनिले करितील. त्यास आज्ञा कर्तव्य ते करावी. येथील काम उलगडोन टोक्याचे मागें गंगातीरे येतो, तोंवर माारनिलेबराबर आज्ञा येईल तदनरूप श्रीदर्शनास जेजुरीस येणें आहेच. आपल्या दर्शनाचा योग घडोन समक्ष विनंती कर्तव्य तेहि दर्शनाती करूं. राजश्री चितोपंत हे आपले कुटुंबीचे आहेत. यास इतर भाव नाही. विनंती करतील ते ध्यानास आणून आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे. बहुत काय लिहिणे? लोभाची वृधि केली पाहिजे. हे विज्ञापना.

¶*Trimbakrao Sivdeo Odhekar, the Pawar's minister, requests Sakharam Bapu to use his influence with the Peshwa that he (the writer) may be retained in his office and thus frustrate the plans of the junior queen who desires to have another minister in his place.*

No. 106] *[2-3-1769*

पो छ २६ सवाल माघ मास
सुरु तिसा

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामींचे शेवेसी

विनंति शेवक धोंडो माहादेव कृतानेक साष्टांग नाा विाा ताा छ २२ सवाल-पर्यंत स्वामींचे कृपेवलोकनेकरून शेवकाचे वर्तमान येथास्थित असें विशेष. स्वामींचे आज्ञापत्र सादर जाले तेथे आज्ञा जे, रााा आबाजी माहादेव टोक्यात आहेत त्यास किल्यांत ठेऊन दो आसामीचा खासा उलफा देत जाणे म्हणून आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणें तेथून माारनिलेस आणून किलियात ठेवले. किलियाचा चौकीपाहारा बंदोबस्त करणें म्हणून आज्ञा, त्यास आज्ञेप्रो बंदोबस्त आहे व पुढेहि करितो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Dhondo Mahadev informs the Peshwa that Abaji Mahadev is put in confinement and is allowed his daily rations as directed.*

No. 107] [*4-3-1769*

पौ छ ६ जिलकाद
तिसा सितैन फालगून मास

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक कमलाकर भास्कर साा नाा विाा ताा छ २४ सवालपावेतो वर्तमान यथास्थित आसे विशेष. संगमरवरी बंगला शहरी आहे, त्याचे काम कसे आहे, दगड कसा आहे, लांबी रुंदी वलीची किती, आणावया योग्य आहे की नाही गाडे किती लागतील, तें ताावार लेहून पाा म्हणोन आज्ञापत्र सादर जाले; त्यावरून बंगल्याची चौकसी करितां शाहाजादेयाचे कबरेवर हुजरा होता, तो पूर्वी येसवंतराव पवार याणी खणोन नेला तो जैनाबादेस ठेविला होता ; त्यास राा संकराजी नारायण येथे आहेत त्यास पुसिले, त्याणी दाखविला. सरकारचे कामावर पडतो न्यावा, त्यावरून रुबरू तेथे जाऊन पाहिला. लांबी रुंदी गज च्यार व उंची आडीच गज, खाली तल नाही, वरता बगला नाही. च्यार दिवाली मात्र आहे, त्यात सुरूदार च्यार खांब असावे ते नाहीत, याखेरीज कोठे जाली नाही. कोदील दगड आडवा नाही. याची याद आलाहिदा लिहून पाठविली आहे व नकश्याहि करून पाा आहे. काम तर चांगले आहे परंतु कबरेवरील हुजरा आहे, बंगला नाही. त्यात खालीवर काही नाही व खांब नाही, काही दगड नाहीत आसे आहे. केवल तेथे नेऊन उपयोगी पडे आसे नाही. तथापि मर्जीस आले तर येक कारागीर आल्याने तो पाहील म्हणजे त्याचे विच्यारे न्यावा आसे जाल्यास सिध जाहे. आम्ही पूर्वी विनंति केली होती जे थोर दगड येक आहे तो पाहिला, परंतु कोदील+ आहे त्याची मूर्त होणार नाही. कारीगर हुजरा पाहावयास आलाच तर येथील दगड सर्व त्यास दाखऊ. त्यात कार्याच दगड निवेल तोराा करू. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Kamlakar Bhaskar solicits from Nana Fadnis orders about stones of certain types for working them into idols.*

No. 108] [*10-3-1769*

पौ छ १८ जिलकाद तिसा
वाा देवजी जासूद जथे कचोजी नाा

श्री

राजश्री बाळाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसी

विनंती उपरी. नव्या तोफा वोतवावयाची आज्ञा केली आहे. त्यास तुम्ही दोन तोफा एक पाचशेरी गोळाखाई ऐसी थोर तोप करविली आहे. त्यास तीन

+ कोदील = ठिसूळ.

स्थल प्रत
क्र. ३ सं. ७६८
ता.

बोटे दळ धरलियानी फारच पातळ होते म्हणून कारीगराने म्हटले त्याजवरून तुम्ही मनास आणून अडीच तसू दळ आतील आंगाचे व माहलीचे कंगणीसुधा च्यार तसू करावयाचे करार करून काम चालीस लाविलियाचे तुम्हा लिहिले; ऐशास भांडे दळदार होते खरेच, परंतु भारी फार, स्वारीच्या उपयोगाचे नाहीं. यात एक बोट कमी होईल तर करावे. किंबहुना लहान तोफ याप्रमाणे जाली तर जाहली. थोर तोफ तरी दळ दोन तसू व कंगणी दीड तसू येणेप्रमाणे तयार होई ऐसी करावी. याप्रो सरासरी साडेतीन तसू पडे ते करावे म्हणजे स्वारीत चालता भारी पडणार नाही. सारांश पंचरसात तांबे फार पडे व पंचरस फार चांगला होये ते करणें. रस चांगला जालिया वोतता चांगले भाडे वोतेल. रा छ १ जिलकाद सुा तिसा सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa sends Nana Fadnis instructions about the casting of guns.*

No. 109] [*18-3-1769*

पौ छ २७ जिलकाद
फालगुन मास सन
तिसा, चिठी लिहिणे

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यासी

पोष्य माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणे विशेष. बा देणे ता राजश्री रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण याचे स्वारीकडे खर्चास रुपये ४०००० चालीस हजार रुपये देविले असेत, तूर्त पावतं करणे. रा छ ९ जिलकाद सुा तिसा सितैन मया अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa writes to Balaji Janardan to deliver to Ramchandra Ganesh and Visaji Krishna a sum of Rs. 40,000 to cover the expenses of their expedition.*

No. 110] [*9-4-1769*

पौ छ ४ जिल्हेज चैत्र.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नाना
स्वामी गोसांवी यासी

पो बाबूराव सदासिव कृतानेक नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणोन स्वकीये लेखन करीत गेले पाहिजे विशेष. श्रीमंतांची आज्ञा म्हसें मुधोल

येथील मुकामी घेऊन संवत्छर प्रतिपदेस टोक्यास आलों. त्यास, प्रवरासंगमकर ब्राह्मण व पाटील यानी हुताशनीचें गडबडीत वेदमूर्ति रा॥ धोंडभट खरे याचें पुत्रास जिवेंच मारले व आणखीहि तीनच्यार माणसें टोक्यांतील मारली. हे कर्म मोठे दुर्घटच केलें. येविसींचें पारपत्य पुरतें जालें पाहिजे. त्यास, श्रीमंत देशास आल्यावर होणे ते होईल. प्रस्तुत त्यांजकडील काही सरकारातून सिक्षेचा प्रकार तूर्त जाला पाहिजे. तर प्रवरासंगमकरांची वतनें जोसी कुलकर्णी धर्माधिकारी व पाटिलकी क्षेत्रसंमंधे येजमानकृत्यें व मोकासे इनाम आहेत, त्यांची जप्ती रा॥ वासदेव गणेश कमावीसदार पा॥ नेवासे यांसी निक्षून पत्र पाठऊन करवावी. या कजियाचें विस्तारें वृत राजश्री नारोपंत नेवाशात होते त्यानी समक्ष मनास आणिलेंच आहे. तेहि पुण्यास स्वार होऊन गेले. आपलें त्यांचें भेटीआंती विदित होईल. छ १ जिल्हेज. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Baburao Sadashiv reports to Nana Fadnis that some persons were roughly handled by the Brahmins and the Patil of Pravarasangam during Holi sports and died in consequence. He suggests that, pending the decision of the Peshwa regarding this outrage, all the vatans belonging to those involved should be forthwith confiscated.*

No. 111] *[30-4-1769 ?*

पो + छ २९ जिल्हेज तिसा
चैत्र हा॥ रामजी जथे बनाजी
नाईक

श्री

राजश्री बालाजी जनार्दन
स्वामी गोसावियासी

विनंति उपरी आपाजी राम दिमत हैदर नाइक याजकडे इनामगाव व मुकासा सरकारातून आहे. त्यास ते करार प्रो वर्तले नाहीत, सा॥ गांवची जप्ती केली असे. तर कमाविसदारास कागद लेहून गावची जप्ती करणे. रा॥ छ २२ जिल्हेज बहुत काय लिहिणे हे विनंति.

¶*The Vatan granted to Apaji Ram, Haidar's Vakil, is confiscated.*

+ पैबस्ती नानांच्या हातची.

No. 112] [*15-6-1769*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शंकराजी सखदेव दिा राजश्री देवराव माहादेव हिंगणे कृतानेक सां नमस्कार विज्ञाति यैसीजे. प्रा मेरट वगैर माहाल प्रांत आंतरवेद बितपसील:—

१ प्रा मेरट	१ प्रा सरावा
१ प्रा जलालाबाद	१ प्रा बरणावा
१ प्रा काधला	१ प्रा शामली
१ प्रा किराणा	१ प्रा मुलताना
४	४

८

येकून आठ माहालच्या सनदा सन सलासात वेतल्या होत्या; परंतु ईा ता सुा तिसा आखर सालपावेतो आम्हाकडे आमल चालला नाही. छ १० माहे सफर सुा सबैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे हे विज्ञासि.

¶*Shankaraji Sukhdev explains to the Peshwa that the eight districts mentioned in the letter did not continue to be in the possession of the Hingnes during the seven preceding years.*

No. 113] [*24-8-1769*

पौ छ जोवल सबैन

श्री

श्रीमंत महाराज राजश्री पंत
प्रधान साहेब स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक आपाजी गणेश कृतानेक सां नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ता श्रावण बहुल सप्तमी मुकाम शहर आमदाबाद माहाराजाचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. विज्ञापना ऐसीजे. माहाराजाचे आज्ञापत्र हुजूर यावयाविशी आले. यावयास उजूर नाही; परंतु पेशजी पटण वगैरे ठाणी बाबीकडील गायेकवाडानी घेतली आहेत. सांप्रत राजश्री फतेसिंगराव गायेकवाड हुजूर गेले आहेत. त्यांजकडील सरंजाम इकडे बहुतसा नाही जाणौन कोता अंदेशा करून गाजुदीखान बाबी याने मेळावा करून पटणास

मोर्चे दिले आहेत. पटणास गायेकवाडाकडील रा॥ बच्याजी देवाजी आहेत. त्याची पत्रे आम्हास व राजश्री खंडेराव गायेकवाड नडियादेस आंहेत यास आली की कुमक जाल्याने स्थले राहतील. मुलुक मवासी! ही जागा गेल्यास चहूकडे दंगा होईल. त्याजवरून हा मजकूर आम्ही राजश्री खंडेराव यास लिहिला. त्याचे उतर आले कीं सरंजाम समवेत शहरास येतो. तुम्ही आम्ही पटणास जाऊन मोगलाचे पारपत्ये करावयास्तव तेथे गेले पाहिजे. पर्जेन्य अतिशये, पेरणी देखील जाली नाही. शहरचा कोट जागा जागा जाया जाला आहे, तोहि नीट करवितों. पटणाकडील दंगा निवारण करून येथून भाद्रपद शुध पक्षात स्वार होऊन दर्शनास येतो. दर्शनानंतर माहाराजास सविस्तर वर्तमान श्रुत करीन. रसद सालगुदस्ताची बाकी राहिली, त्याजविशी ताकीद पत्र आले. त्यास पहिलाहि काही यैवज पाठविला. सरकारचे जासूद येविशीची पत्रे घेऊन आले. त्याचे उतर विनंती पत्र लिहिले की पाऊण लक्षाच्या हुंड्या रवाना केल्या आहेत. त्याच हाली रा॥ माहादाजी जिवाजी याजकडे पाठविल्या आहेत. हुंडीचे मुदतीप्रमाणे यैवज सरकारात भरणा करतील. राहिला यैवज तोहि येते समई सेवेसी घेऊन येईन. सेवेसी श्रुत होये हे विनंती.

¶*Appaji Ganesh of Ahmedabad writes to the Peshwa that he has sent bills of exchange amounting to Rs. 75,000 out of the revenue of Gujarat and adds that speedy measures have been taken to put a stop to the rising of Babi at Pattan.*

No. 114] [*7-10-1769*

श्री

राजश्री हरिपंत स्वामीचे सेवेसी

विनंती उपर. तुम्ही पत्र व आमचे पत्राचा जाब मल्हारजीबराबर पाठविलें ते पावली. मर्जी ठीक नाहीं, त्यापक्षी मग काय असों. मी उद्या यावयाचा निश्चय रविवारीचा केला, परंतु श्रीमंत म्हणतात कीं सोमवारी जावे. तत्राप तुमची येक पुरवणी दाखवावयाजोगी आहे, ललिताचे वेलेस पाहाटेस जाईन तेव्हां दाखवीन. मग आज्ञा दिल्ही तर येईन, नाहीं तर सोमवारी. रा॥ छ ६ जाखर आवसीचा प्रहर रात्र हे विनंती.

¶*Nana informs Haripant that he was detained by the Peshwa and that he would return shortly.*

No. 115] [*16-10-1769 ?*

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक त्रिंबकराव विस्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ १९ जमादिलाकरपर्यंत किले मर्दनगडी सुखरूप असों विशेष. स्वामीनी कृपा करून पत्र कृष्णातीराहून कूच होऊन स्वारी सुरापूराचे सुमारें जाली, बहुतकरून संस्थानाच्या खंडण्या विल्हे लागल्या, श्रीरंगपटण व बिदरूर हीं दोन्हीं संस्थाने विल्हे लागणें याकरितां त्या प्रांतें जात असों, दोहींकडील मजकूर विल्हे लागल्यावर विचार ठरेल तो लिहून पाठऊं; व पुरवणीं पत्रीं लिहिलें कीं कुलस्वामीचे दर्शनाकरितां गुहागरावरून तुम्हीं जाणार तर विजेदुर्गादिक स्थलीं जाऊन किले कोट आरमार बंदोबस्त पाहावा, इजारत[1] करणें, न करणें, तालुकदार कोण कसे वर्ततात, रयेतेचें परिपालन कसें कोण करितो, हा बारीक मोठा अर्थ ध्यानांत आणून बंदोबस्त करणें तो करून लिहिणें, तो लिहून पाठवावा. त्यास स्वामीची आज्ञा प्रमाण. शरीर अशक्त. हे दिवस उष्ण. तथापि सामार्थ्यानरूप प्रकृत स्वस्थ राहिल्यास विजेदुर्गादिक स्थलें मार्गानें लागतील तीं पाहून उचित जरूर प्रकार बंदोबस्त सांगणें तो सांगोन कलेल तितका ध्यानांत आणून जरूर लिहिणें तो लिहून पाठऊं; आणि कुल-स्वामीचे दर्शन घेऊन घरास जाऊं. शरीरीं आरोग्य श्रीकृपेकरून जाले. परंतु उष्ण देश, औषध काठिण, यास्तव प्रकृत सूक्ष्म फार जाली आहे. दिवसेंदिवस आरोग्यच आहे. आपले कृपावलोकनें श्रीदयेंकरून आरोग्यदृढताच होईल. फिरंगी यांचा प्रकार केवल येकदेसी मनसबा. सारांष हा प्रकार किमपि कलतच नाहीं. गारागोले बंदुखासाठीं बहुत प्रकारें प्रेत्न केला परंतु न दिल्हे. बेइतबारी फार, थोडक्या गोष्टी लांबिवतांहि न ये. मर्दनगडचे तालुक्याचाहि बंदोबस्त आपलेकडील आम्ही मात्र केला. त्यानी सेजारधर्मास परस्परें उचित मजकूर ते बोलून चालून कबूल न केले. चालता प्रकार मात्र राखून ठेविला. विस्वास धरतां येत नाहीं. ये प्रांतीचे ग्रहस्त वतनदार तत्रास्थित व अत्रस्थित प्रसंगास अनुपयोगीच. आपले बलें शाहाणपणें सावधपणें राहील त्याचाच परिणाम. बहुत प्रकारें बंदोबस्त करून दिल्हा व ताकीदहि केली. त्याचप्रमाणे

---

१ मक्तेगिरी.

कौणाचाहि विस्वास न धरितां सावध राहील तरच परिणाम. स्वामीनीहि परभारी ताकीद करणे ते करावी. हे विनंती.

¶*The Peshwa who is on an expedition in the Karnatak asks Trimbakrao Pethe to make enquiries as regards the condition of the ryots in Konkan when he will be proceeding on a journey to his family god, which he promises to do in spite of his indifferent health.*

No. 116] *[18-10-1769*

श्रीशंकर प्रा

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

विनंति उपरी. आश्विन वद्य त्रितीया बुधवारीं दोन प्रहरां चिमणाजी देशमुख याची बातमी आली कीं वारसेंयाचे नजीक घाटाखालीं दोनप्रहरपर्यंत गाडदी सीदी भील व पंनास पाउणसेंपर्यंत स्वार याप्रो जमावसुद्धां सोनगडाहून निघोन सालेरीस जातो. तमाम गांव खेडीं जालीत पोलीत चालिला. याप्रमाणे बातम्री येतांच आम्ही सडी फौज बराबरी घेऊन कलंबाचे बारीनें घाटाखालें उतरोन रातोरात गेलों. मार्ग झाडीचा, डोंगराळ, गवत भारी, अडचण फारच, परंतु रातवा खपोन उज्याडतां प्रातःकालीं त्याचा मुकाम होता तेथें गेलों. तों त्यांचीहि तयारी जाली होती. डोंगराचे आश्रयानें बराच दम खादला; तों आम्ही साऱ्या फौजेचा येकवेलच येलगार करून हला केली. तों श्रीमंत रावसाहेबांचे पुण्येंकरून फते जाहली. गाडदियांचा मोड जाहाला. दोन अडीचशे गाडदी ठार जाले. दोन अडीचशे जखमी जाहाले. कांहीं, गवत मातबर वाढलें आहे त्याचे आश्रयानें पळाले. चिमण देशमुख खासा यास जखमा लागून घोड्याखालीं पडला. मग पलोन गेला, किंवा मुडद्यामध्यें पडला, याचा पता पुर्ता लागला नाहीं. शोध बहुत केला. कोण्ही पलोन गेला म्हणतात, कोणी गवतामध्यें लपाला म्हणतात. वरकड गाडदी भील तमाम पलाले. बंदुखा व तरवारा वगेरे हत्यारें सहस्रावधी लोकांस सांपडलीं. पंनास साठ घोडे लाहान थोर पाडाव आले. निशान नगारा तासची तबल गाडद्यांचीं निशानें वगेरे बहुत पाडाव आलीं. याप्रों श्रीमंतांचे प्रतापें गोष्टी जाहाली. आम्हाकडीलहि दाहावीस भले माणूस जखमी, व घोडीं दाहापांच याप्रो जाहालीं. येणेप्रो ईश्वरें कृत्य केलें. आज गुरुवारीं त्रितीय प्रहरीं आम्ही लस्करांत आतांच आलों. येथून वीस कोसावर देशमुख होता. आज दोन दिवस घोड्यावरील जीन आतांच उतरले. आपण सरकारचे नेत्र आहेत. जाहालें वर्तमान आपणास कलावें. आपण कारकून येक मर्जीस आल्यास पाठवून

द्यावे. जखमी जाहलेलीं घोडीं व भले माणूस रुबरु पाहून जातील व देशमुखाकडील गांडदी किती मारून मुडदे पडले आहेत तेहि पाहोन जाईल. म्हणजे जाहालेले वर्तमान ध्यानास येईल. बहुत काय लिहिणे लोभ करीत जाणे हे विनंती.

¶*Naropant Nana receives a report of how a riot of the Bhils and the Gardis led by Chimanaji Deshmukh was put down.*

No. 117] [*13-11-1769*

पैवस्ति छ १३ रजबु
सबैन कार्तिक हस्ते कल्याण
सांडणीस्वार

श्री

पुरवणी विज्ञापना. श्रीमंताकडे आपले कागदावर विनंती करून घ्यावयासी मी गेलो होतो, तेव्हां श्रीमंत बोलले कीं नाना तेथून येतील तेव्हां पुण्यांतील चौकीपाहऱ्याचा बदोबस्त चांगला असावा. त्याजवरून मी विनंती केली नानाचा बंदोबस्त भारी आहे, माणूस फार भिते. माणसापासून अंतर पडल्यास मुलाहिजा होत नाहीं. त्याजवरून बहुत प्रसन्न होऊन बोलिले, असे आहे तरीच पुण्यातील बंदोबस्त राहतो. बालाजीपंत ठोसरहि जवल होते. आपल्या मेहनतीचा वगैरे बंदोबस्त आइकोन फार संतोषी होतात. भेटीअंती सविस्तर विनंती करीन. हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke intimates to Nana Fadnis how the Peshwa expressed his complete satisfaction with the addressee's work.*

No. 118] [*10-12-1769*

पो छ ४ साबान सुरु
तिसा सितैन हा। कृष्णाजी
खंडोजी जथे हावजी
ना। ठुबे रू

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी
गोसावि यांसी

विनंति उपरी. तुम्ही पत्र छ २४ रजब व छ २९ रजबचे पाठविले ते छ २८ मिनहूस प्रविष्ट जाहाले. डाकेची पत्रे पाठविली ती पावली. जीवनराव व

सेव्याजी आंटोले[1] याचा मजकूर लिहिला तो कलला. सेव्याजी आइतोले याणी रुा दिल्हे तर त्यास लस्करास पाठऊन देणे. न देई तर किल्यावर ठेवणार ते उतमच आहे. जगजीवन पवाराचा मजकूर तर त्याजकडील पंधरा हजार रुा येणे ते घेणे. न देई तर कोहजेवरी अटकेत ठेवणे. रुा छ २९ रजब सुरू तिसा सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे ? रुपये दिल्हे तर पका जामीन घेऊन मोकले करणे. हे विनंति.

¶Nana Fadnis is asked to receive money from Setyaji Aitole and Jagjivan Pawar and if they refuse to pay, to put them in prison.

No. 119] *[25-12-1769*

पौ छ २० साबान तिसा
मार्गसीर्ष बाा रूपाजी
जासुद जथे बनाजी
नाईक.

श्री

राजश्री बालाजी जनार्दन
स्वामी गोसावी यासीं

विनंती उपरी :

गाइकवाडाकडील माहालच्या बंदोबस्ता रुा चिटको आपाजी रुा करावे लागतात. त्याजसमागमे दोनसे राऊत दिल्हे पाहिजेत ते देवावे म्हणोन लिहिले. त्यास माारनिलेबाा रुा दुर्जनसिंग वगैरेचे राऊत द्यावयाविसी तुम्हास लिहिलेच आहे, त्याप्रो देणे.

किता कलमे :

१ भडोचकर मोगलानी आमोद वगैर माहाली दंगा केला, त्याचे पारपत्यास दोनसे राऊत देवावे.

१ खानदेशात दाभाडे व टोके व भिल लबाडी करितात त्याचे पारपत्यास सरसुभाकडे दोनसे राऊत दिल्हे पाहिजे.

—

२

याप्रो च्यारसे राऊत द्यावे लागतात. त्यास खानदेशच्या सुभ्याकडे दोनसे राऊत रुा रामचंद्र गणेश याजकडून देवितों, व भडोचचे कामास दोनसे

---

१ ऐवोळे.

राऊत दिल्हेच पाहिजे. त्याची सिबंदा तेथील तेथे फिटेल म्हणोन लिहिले ते कलले. ऐशास खानदेसच्या कामास दोनसे राऊत रामचंद्र गणेश याजकडून देविले, उतम केले. भडोचचे कामास यादवरायाकडे दोनसे राऊत देणे ते रा॥ विसाजी केशव याजकडून देऊन ते काम करावे.

रा॥ छ १५ साबान सुा॥ तिसा सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶The Peshwa writes to Balaji Janardan that four hundred troopers should be despatched to quell the disturbances created by the Mughal Subha of Broach and by the Dabhade, Toke and the Bhils in Khandesh.

No. 120] *[28-12-1770*

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे शेवेसी

विनंति सेवक विस्वासराव लक्ष्मण कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना येसीजे. किले करेरा वगैरे ठाणी राजश्री रघुनाथ हरि याचे स्वाधीन करून दिढा महिन्यानी मारनिलेची कबज आणून देऊ. यासी अंतर करू तरी सरकारचे आपराधी. दुसरे किले झासी येथील जकिरा सन इहिदे सबैनाच्या आवल सालापासून फरोक्त केला असल्यास त्याची निशा राजश्री रघुनाथ हरि याची करून पुरी कबज आणून देऊ. मिति पौष सुध ११ सके १६९२ शेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶Vishvasrao Lakshman writing to the Peshwa undertakes to hand over to Raghunath Hari the fort of Karera and other places.

No. 121] [*31-12-1769*

पौ छ १६ जिल्हेज
सबैन

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री बालाजी जनार्दन स्वामी
गोसावी यासीं

पो माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष. धोंडी ठाकूर व जयराम ठाकूर वस्ती पेठ येवले पो पाटोदे यार्णा हुजूर विदित केले, कीं आपले कर्ज लक्षुमण ठाकूर नगडा वस्ती पुणे पेठ रविवार याजकडे येणे. त्यास दोन तीन वर्शे तगादा करितो; परंतु कर्ज वारून देत नाही. कोतवालाची वगैरे हिमाईत करून धटाई करितात. त्यास सरकारातून नजर ठराऊन कर्ज वसूल करून देविले पाहिजे म्हणोन; त्याजवरून सावकार माराकडे नजर करार करून हे पत्र तुम्हास लिहिले असे; तरी खताप्रो वाजबी हिशोब व्याजसुधा निकाल करणे. या कामास घनशाम देवाजी कारकून व ढलाईत आा ५ पाठविले असे; तरी याचे वाजबी कर्ज असेल ते व्याजसुधा निकाल करून देवणे. जाणिजे छ २ रमजान सुा सबैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Nana Fadnis is asked by the Peshwa to realise the debts of Dhon.. ..akur of Yevla, which are due to him from Lakshman Thakur of Poona. A certain percentage was charged by Government for realising debts of individual creditors.*

No. 122] [*1769 ?*

श्री

राजश्री हरिपंत स्वामीचे सेवेसीं

विनंती उपरी. रद कर्जाच्या यादीच्या नकला व झासीचे यादीची नकल गुदस्ताची व गायेकवाडाकडे ऐवज नेमला त्या यादीची नकल पाठविली पाहिजे म्हणोन लिा. त्यास रद कर्जाच्या यादी नकला दोन व झासीचे यादीची नकल करून सांडणीस्वाराबराबर तीन यादी पाठविल्या आहेत. वेऊन उतर पाठवणे. गायेकवाडाकडे ऐवज नेमल्याची याद पुण्यास आपाजीपंता गेली, तिची नकल

+ हिमाईत = संरक्षण, आश्रय.

पुण्यास गेल्यावर पाठऊन देऊ. आज स्वामीचे दर्शन घेऊन श्राध करू. उदईक पुडी करून कूच करून जाऊ. काल पूज्यवार यामुले स्वामीचे दर्शन घेतले नाही. रवाना शुक्रवार हे विनंती.

¶*Nana Fadnis writes to Haripant, forwarding certain documents as requested and communicating programme of his tour.*

No. 123] *[1769 (?)*

श्रीशंकर प्रसन्न

श्रीमंतर राजश्री पंत
प्रधान साहेबाचे शेवेशी

सेरीकर देसमुख व देशाई व देशपांडे तालुके नाणेमावल कृतानेक विज्ञापना. तागायत मजकूरचे वर्तमान सन. सितामध्यें रबी नाबूद जाली. त्यापासून तीन वरसे कुणबियास रबीचे बी मिलत नाहीं, यामुले रबीची कैफीयत[1] पडली, खरिपावर अनावृष्टि जाली त्यामुले खरीप गेले. जुजबी पीक जाले ते मार्गाचे रहदारीमुळें जेठ्याचे खालीं आटले. दिवाण महसूल द्यावयास कुणबियाचे पदरी राहिले नाहीं. मार्गाचे रहदारी वसई कल्याण कुलाबा चेऊल आद्य करून जो येतो तो ओझीच घेऊन येतो. ओझी चालून त्यास जेवावयास घालावे या दहशतीनें खंडालेपासून वडगांवपावेतों गांव उध्वस जाहाले. ओझी बेमोईन येतात. उजूर केला तर तोडावर मारून ओझी चालवितात याजकरितां रयेतीनें धास्त घेतली. पूर्वी लोहगड, राजमाची दोन किल्ले याचा मसाला रयतेस होतो त्याखालीं रयेत आजुर्दा असतां हल्ली विसापूर जाहाला त्याणे तो त्राहे म्हणविले, यैसा प्रजेवर ईश्वरक्षोभ. आपण ईश्वरी अंश जाणोन विनंति लिहिली आहे. कृपाळु होऊन पारपत्य केले पाहिजे. प्रजा स्वामीची आहे. प्रजेचे आशीर्वादे उत्तरोत्तर अभीष्ट होईल. विसापूरकर वाटेने जातात त्या पाटिलाची नाहक इजत घेतात. मागे खाबासेतच्या पाटिलास मारलें. प्रस्तुत मौजे भुसी येथील पाटिलास ओझ्यानिमित्त तोंडावर मारून काहाली (काबली) झोलणे डोईवर देऊन कुरवाडे याच्या घाटे नेला. त्यामुळें तो गांव ओस जाला. तेव्हां कोकणातून पाटील मात्र एकटा समजाऊन आणून गांवावर बसविला आहे. चार कुले चहूंकडे गेली, ती येत नाहीं. तैसेच खंडाले व कारले रहदारीमुलें ओस जाली. तमाम गावास पल सुटला. आवल्याची मोट सुटली आहे. मागती मोठेची मोट करणार स्वामी समर्थ आहेत. किल्ले लोहगडी राजश्री नारो रामचंद्र याणीं आम्हास व दाहावीस

+ येथून पुढें हस्ताक्षर नाना फडनीसाचें असे.

१ पेरण्याची जमीन.

पाटलि आणून कित्येक प्रकारे शब्दगौरव करून दिलासा केला. परंतु शुष्क गोष्टीनें रयेतेचे समाधान होऊन संचणी होत नाही. स्वामी कृपाळु होऊन सालमजकुरी चड सवाई आहे ते माफ केलियास रयेतेस उमेद होईल आणि वस्ती राहील. येविसी आभयेपत्र सादर करणार स्वामी समर्थ आहेत. रयतेचे जीवन आपणास न कलेसे काये आहे. प्रजन्यहि समीप आला. पेस्तरची कीर्द अद्याप नाहीं. भाजपोळ केल्याखेरीज (ज)मीनची संचणी कांहीच नव्हे. स्वामी सर्वज्ञ आहेत हे विज्ञापना.

¶*The Deshmukh, Desai, Deshpandes of Tarf Nane Mawal plead inability to pay increased assessment on the ground of irregular rainfall and damages suffered on account of armies marching. They also complain about the ryots being forced to carry loads.*

No. 124] [*1769 ?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत
प्रधान साहेबाचे शेवेशी

आज्ञाधारक देसमुख, देसाई देसपाडे तालुके नाणेमावल पायावर डोई ठेवून विनंती यैसिजे. तागायत मजकुरी आम्हास राहावयास पूर्वी साहेबी खेडी इनाम दिली आहेत. त्याजवर गुदस्ता विसापूरची धमक पटी केली. ते समई गवत व पानताटी घातल्या. त्यास गुदस्ता नवी जागा म्हणोन आज्ञेप्रमाणे गवत ताटी दिल्या. सालमजकुरी मागतात. त्यास साहेबी पूर्वापार आम्हास दिल्हे आहे म्हणोन त्या खेडियांत राहातो. वस्ती म्हणावी तर सा खेड्या मिळून तीस पंचतीस घरे आहेत. गांव बितपशील :—

मौजे पाले	घरे ३	मौजे कारदोली घरे	५
मौजे भाजगांव	४	मौजे नांदगांव	१६ पैकीं
मौजे बुधले	५	मौजे गयालनहमी	१२
		पागलोली	६
	१२		२३

येकून सा गांवची घरें ३५ आहेत. त्याजवर येकूण चालीस से गवत व ताटी ३९ आहेत त्यास साहेब कृपा करून मना केली पाहिजे. पचतीस घरे आहेत ती आमची भाऊबंदाची व मागे मृत्य पावले त्याच्या बायका रांडरल्या आहेत. कोणी

कुणबी नाहींत त्यास बेछत्र करावे यैसे नाहीं. जमीदार म्हणजे मापाच्या अधोल्या. मोजिले तरी खंड्या मोजील. फोडिले तरी काहीच नाहीं. याजकरितां मना चिठ्ठी विसापूरकर यास आगत्य दिली पाहिजे हे विज्ञापना.

¶*The Deshmukh, Desai and Deshpande of Nane Mawal request the Peshwa to grant exemption from a certain tax (on thatch) which required to be paid in kind.*

No. 125]

[25-1-1777 ?

श्री

राजश्री मल्हारपंत साने स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री तुकोजी होलकर व माहदजी शिंदे याजकडील रुमाल तेथे पुरंधरी आहेत जुने व नवे त्यांत होलकराचे आवर्जे सन इसने सबैनचे वगैरे कागद चालते असतील ते पाठऊन * * जमेचे खतावणीचे व खर्चाचे खतावणीचे व बेड्याचे याप्रमाणें शोध करून सत्वर पाठऊन द्यावे. राजश्री माहदाजीपंत गुरुजी शिंदे होलकर यांजकडे गेले होते व श्रीमंत राजश्री दादासाहेब याजकडे गेले होते, त्याचे हिसेब

१ राजश्री दादासाहेब याजकडे खर्च जाहला आहे त्याचा हिसेब.

१ गुरुजीबावा याजकडे शागीर्दपेशा वगैरे लोक होते त्याचा हिसेब.

१

येकूण दोन हिसेबाचा नकला अगर येका तरी हिसेबाची नकल शिंद्याचे रुमालात असेल ती पाठऊन द्यावी. सदरहू हिसेब राऊ मल्हारपंत भाऊ याचे रुमालात होते तेथे शोध करावा, व आपाजीपंत गाडगील, याचें रुमालात शोध करावा, आणि दोहो हिसेबाच्या नकला करून व आवर्जे होलकराचे येणेप्रमाणे सत्वर पाठऊन द्यावे. जे कागद तयार असतिल ते लवकर अधिक पाठवावे. तयार नासितील त्याच्या नकला करून मागाहून पाठऊन द्यावे. हे विनंती. पौष्य वद्य २ मंदवासर साईकाल.

¶*Some account papers with reference to Holkar and Sindia have been asked for from Purandar where the papers were kept for safety.*

No. 126] *[18-1-1770*

पौ छ १४ सवाल

सबैन माघ.

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसी

विनंती उपरी नव्या तोफा वोतावयास बालाजी वामन पाा आहेत. त्यास पहिली जागा बांधिली आहे ती लाहान. याजकरितां दुसरें घर हतीचे खंबाऱ्यासारिखे उंच माारनिले सांगतील त्याप्रो तयार करून देणे. जनार्दन मुकुंद दामले यास पैठणास पाा आहे. त्यास घोडी तटूचे दाणावैरणीबदल रुा २० वीस तसल-मातीस दिल्हे आहेत याचा हिसेब घेणे. सदरहू घोडी तटूचा दाणा व बालाजी वामन याजबाल घोडी तटू आहे व यक उट आहे व मानाजी जाधव खिजमतगार याजबाा पागेचे घोडे आहे, त्यास दाणावैरणीची बेगमी पुण्यास पावल्यावर पुढें देत जाणें. बालाजी वामन याचे दिवटीचें तेल रमजानचे लस्करात पावले आहे, पुढे सवालापासून दररोज पावसेरप्रो देणें. रोा छ २० रमजान सुरु सबैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती .

¶*The Peshwa writes to Nana Fadnis, giving instructions about the establishment of a gun factory and other matters.*

No. 127] *[26-2-1770*

पौ छ १ जिल्हेज-

सबैन चैत्र.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यासी

पो माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणे विशेष. रा पांडुरंग कृष्ण गोडबोले यास मुंबईस पाठविले आहेत. यांस तोफा चांगल्या विकत मिळाल्या तर खरेदी करावयास आज्ञा केली आहे. लस्करांतून गोलंदाज समागमे दिल्हा आहे. त्यास हे मुंबईस जाऊन यादी लिहून दिल्ही आहे त्याप्रो तोफा विकत मिलाल्या तर किमत करून तुम्हांस लिहून पाठवितील, त्याप्रो रुपये पाठऊन देणे; व किल्यांवरून तोफा आहेत त्यांतील उपयोगी असल्यास पाहावयास सांगितले आहे. जर उपयोगी तोफा किल्यापैकी पुण्यास आणावयाच्या असल्या तर तुम्हांस लिहितील त्याप्रो

१ हतीचा तबेला किंवा साखळदंड बांधण्याचा खांब.

घाट चढऊन पुण्यास आणावयाची तर्तूद करणें. पाऊस पडू लागला नाही तो घाट चढोन आल्या म्हणजे फार उपयोगी पडतील. आगाव ऐवज थोडा बहुत तोफाचे खोबद्दल लागल्यास लिहून पाठवितील, त्यास तोफेबद्दल आगांव ऐवज देणे. त्याजपासून माारनिले निशा घेऊन तुम्हांस लिहून पाठवितील त्याप्रों ऐवज देणे. रा छ २९ सवाल सुा सबैन मया व अलफ. हे विनंती.

¶*Madhavrao Ballal writes to Nana Fadnis that Pandurang Krishna Godbole is sent to Bombay to purchase big guns to replenish the artillery.*

No. 128] *[15-3-1770*

श्री

आसीर्वाद उपरी. येथील क्षेम छ १७ जिलकाद जाणून तेथील वर्तमान लिहीत जाणे विशेष: कडपेहून सोरा मीठ खरिदी करून आणविले ते किले मजकुरी पाठविलें आहे. तेथून यादी लिहून आलेले बजिन्नस तुम्हाकडे पाठविले आहे. त्याप्रमाणे कचे सेराने वजन करऊन रुजू पाहणे, मग पके सेराने वजन करून जमा धरणे, तपसीलवार लिहून पाठवणे. सोरा आणावयास बैल भाड्यानी करून पाठविले होते, त्यास त्याचा करार दर बैली सात फलें[1] प्रों करून आठ मण सोरा दर बैली आणावा याप्रों करार होता. त्यास हाली सोरा बैलावर आला. त्याचें आधीं कचें वजन करऊन मग पकें वजन करावें त्याप्रों भाऊ याचे बैलाचा हिसेब करून पैका आकारावा. त्यापो मोघम पावलें आहे ते पोतनीसाकडे रुजू पाहून वजा करून घेऊन बाकीचा यैवज देवणें. कचे आठ मणास सात फलम भाडे याप्रमाणे करार आहे त्याप्रो समजून करणे आण उतर पाठऊन देणें. रा छ १६ जिलकाद हे आसीर्वाद.

¶*Instructions about weighing and valuing of the ingredients of ammunition are given in this letter.*

No. 129] *[26-4-1770*

पौ छ १० सफर जेष्ट
सबैन

श्रीवेंकटेशजी

श्रीमंत राजश्री नानासाहेब
याप्रति

आश्रित गंगाविष्णु वैद्य कृतानेक आसीर्वाद विनंती येथील क्षेम ता वैशाख शुध १० प्रतिपदापरियेंत मुा सवाई जयेनगर आपले कृपे करून येथास्थित असो. यानंतर आपली आज्ञा घेऊन स्वार पुणियाहून जालो ते दरमजल

---

१ तीन रुपये किमतीचें सोन्याचे नाणें.

सैन्यात श्रीमंत राजश्री माहादजी सिंदे पाटील साहेब याजपासी पावलो. त्यांचा निरोप घेऊन जावे तो श्रीमंत पाटीलबावा बोलिले की राजश्री बाजी नरसिह याचे शेरीरास सावकाश बहुत नाही. त्यासी आपण राहून उपाये करावा. फार संकट घातले. सरकारची हेहि चाकरी आहे, यासी उपाये करणे. त्यासी आम्ही सागितले की, हे गोष्टी बहुत कठिन आहे. दाहा वीस वैद्य तुमचे उपाये करून चुकले. यासी तुम्ही सांगता की, कृपा करून याजला उपाये करणे श्री कृपा करील. त्याजवरोन तेथ राहिलो. आठा दिवसाचा करार करून राहिलो. त्यासी बोलिलो की आम्ही पचवीस हजार रुा घेऊ. त्यासी पाटीलबावा बोलिले की, याच्या जिवावरोन काही आदीक रुा नाहीत. साहा हजार रुो रोख आम्ही देऊ. ते रोख दिल्हे. आनि रसायेन दिल्हे, आनखी करार केला, दोन हजार रुपयाचा गाव वौशपरंपरा तुम्हास देऊ. बरे जालियावरी यैसे बोलोन आवशेष दिल्हें. आठा दिवसात गून आला. निरोप मागू लागलो तेव्हा पाटीलबावानी सनद दोन हजार रुपयाचे गाववि़शई सनद अजमेरीस लिहून दिल्ही; आनि निरोप दिल्हा. आजमेरीस आलो. आजमेरीचे सुभेदारानी गाव दिल्हा. आमल बसविला. निरोप घेऊन मुा मजकुरास गावीहून आलो. आता त्यानी गाव दूर करून आमल उठऊन दिल्हा. मातबर गावहि देत नाही. पाटीलबावा दुसरा गाव देतील यैसे लिहून आम्हास पाठविले. त्यास आपणास कलावे. आम्ही श्रम बहुत केले. मात्रां रसायेन बहुत खर्च जाले. त्यासी आपण कृपा करून श्रीमंत साहेबांचे कानावर घालोन की गाव वंशपरपरा देऊन सनद दिल्ही. गाव दिल्हा. आता आमल चालविला मागती बंद केला. आजमेरीच्या सुभेदारानी आमल उठऊन दिल्हा. त्यासी आपण कृपा करून पाटीलबावास पत्रं पाठवावी. गाव छ्यात्तडी आपण दिल्हा तो चालिवावा उचित आहे. आम्ही येथ आहे. आपल्या पत्राचे उतर आलियावरी शेवेसी येऊ. गावाविशई बहुत प्रकारे लिहून आमचा गाव दिल्हा तो चालवीत यैसे करणार स्वामी समर्थ आहेत. विशेष काय लिहिणे. कृपा वृधिमान केली पाहिजे हे विनंती.

सर्व मडळीस नमस्कार आनुकर्म (क्रमे) आसीर्वाद व जोसीबावास नमस्कार व पुरानिकबावास नमस्कार. आपण कासीद सुखलाल बराबर पाठविला होता. त्यानें नौकरी उतम करून जयेपुरास पोहचाविले. आपणास कलावे. याची तलब कृपा करून देविली पाहिजे. आम्ही पदरचे आसो हे विनंती. सुखलाल कासीद जबानी सांगता कलो येईल. हे विनर्ता.

¶*Ganga Vishnu Waidya cured Baji Narsinha, Sindia's Diwan, of a serious illness and was therefore given a village in inam by Mahadji Sindia. The jagir was later on resumed by Sindia's officer; Ganga Vishnu therefore requests Nana Fadnis to intercede on his behalf with Sindia and get the jagir restored.*

No. 130] [*2-6-1770*

दोन

श्री

विनंती यैसीजे. दाराज्याहा बाहादूर याणी आनागोंदीचाहि बंदोबस्त केला. बाबरजंग तेथें होता. तो याच्या स्वारी पूर्वी एक प्रहर अगोधर दोन तीन हजार जमावानसी होता. तो तुंगभद्रा उतरून गेला. पलीकडे कमलापूर आहे तेथें जाऊन राहिला. दाराज्याहा जाता गांवकरी येऊन भेटले. नजरा केल्या. याणी ठाण्याचा बंदोबस्त केला. दाणा तेथें फार, काहीं सांपडला. एक तोफ बाबरजंगाची राहिली ते पंचरसी चांगली होती. याणी आणिली. याउपरी दुवाब्यांत यास घ्यावयास कांही राहिले नाहीं. कोपल, बाहादूरबिंडा दोन ठिकाणे राहिली. पलीकडे तो भाऊच आहेत. आजपावेतो दाराज्याहा याणी ठाणी व महाल व संस्थाने घेऊन बंदोबस्त केला त्याचा येकंदर एक उगणतीचा तपशील :—

१	परगणे सिदनूर हा माहाल दाराज्याहाकडील सरंजामातील त्या पैकीं गांव चांगले ठाण्याचे टिपूनें दाबले होते ते सोडून घेतले.	
३	समता	
	१	कर्डीकल
	१	लिंगसगुर
	१	संती केल्लूर
३		
६	ठाणी	
	१	केदकी नहाल
	१	तलेखान
	१	होकरण हाल
	१	पंचन हाल
	१	गंगावती
	१	रारावी
६		
४	संस्थानें	
	१	कनकगिरि
	१	केचनगुंड

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
क्र. ६ नं.
ता.
अ नं.

१ तावलगिरा
१ आनागोंदी

४

१४

चवदा घेतली. या उपरी दुवाब्यांत कोपल बाहादूरबिंड्यासिवाय कांहीं राहिले नाहीं. तेथें जाणार. या पैकीं कमाविसदार करून पैका दाराज्याहानीं घेतला. कर्डीकल वगैरे तीन समता पंचवीस हजारास विल्हे लाविल्या. तावलगिरा चालीस हजार व गंगावती वगैरे ठाणी पंचावन्न हजार. कनकगीरचे दोन लक्षाचे बोलणे लागले आहे. ठरेल. आनागोदीचे आदियाप नाहीं. येकूण तीन लक्ष वीस हजार, याप्रमाणे नवाबाचा मुतसदी लिहिणार आहे त्याणे मधेस्तास लिहिले होते. रवाना छ ७ सफर हे विनंती.

¶*The letter reports tentative settlement of territory south of the Tungabhadra recently recovered from Haidar.*

No. 131] [*2-8-1770*

पौ छ १३ जाखर आश्विन शुा १४

मुा नजीक जलेश्वर

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण स्वामी गोसांवी यांस पौ माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणे विशेष. तुमची रवानगी हिंदुस्थानांत केली तेसमई हिंदुस्थानचे माहालचे ऐवजाची नेमणूक तुम्हाकडे करून दिल्ही. त्यास तुम्ही त्या प्रांती गेल्यावर बुंदेलखंड वगैरे मामलती विल्हे लाविल्या; त्याचा जाजती ऐवज जाला तो स्वारीकडे तुम्हीं घेतला. सालमजकूरचा हिंदुस्थानचे माहालचा ऐवज येणे त्यास तुम्हाकडे ऐवज द्यावयाचा नाहीं; कारण की तुम्ही त्या प्रांती आहा. फौजेचा दबाव चहूकडे पडला. चार रुपये खंडण्याचे मिलतील. माहालचा ऐवज झाडून साल मजकुरीं हुजूर द्यावा लागतो, याजकरितां तुम्हांस लिहिले असे; तरी तमाम मामलेदारास ताकीद करून रसदेचे ऐवजाचा भरणा जलदीने देसी होय तीं गोष्ट करणे. जाणिजे छ १० रविलाखर सुा इहिदे सबेन मया व अलेफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Peshwa Madhavrao asks Visaji Krishna and Ramchandra Ganesh to pay into Government treasury contributions received by them from Northern provinces for the current year and not to appropriate them for their own use.*

No. 132] [*23-8-1770 ?*

[पहिला बंद गहाळ आहे.]

२

कचे वगैरे आणतात, त्यापैकी गैरसाल वगैर कितेक निघतात. त्याजवर सरकारचे निशाण पडत नाही. रुपयाहि वहाटाऊन कोण्ही देत नाही. तो रुपया वाजवी रीतीने वटावाप्रो घेऊन सरकारच्या व बाजारच्या चलनीचा रुपया देत जाईन; व खुर्दा विकावयास इतर उदमी व दालदी व भंडारी व कोली पाजकर वगैरे याजपासोन खरीदी येक पैशाचे आंतराने घेऊन विकत जाईन. सरकारात प्रयोजन लागल्यास जो खुर्दा पाहिजे तो मजपासून विकत घ्यावा. पेंठेत न मिले तर कोठून तरी प्रयत्न करून आणून देत जाईन. यासमधे माझे दुकानास महसूल पालक व घर म्हैस पालक याप्रमाणे द्यावयाची आज्ञा करून, मजपासून काही जीवन माफीक सरकारात नजर घेऊन वतनी सराफी करून दिल्हीयानी, आणखी दुकाने सराफीची आणून पेठेत दुकाने घालवीन, याप्रमाणे करार होऊन आज्ञा जाहाली पाहिजे म्हणून विनंती. त्याजवरून मनास आणिता प्रांत मजकुरची रयेत सरकारदेण्याचा रुपया पोता लावावयास आणितात. त्यातील गैरसाल व हीण व फुटका रुपया निघतो, त्यावर सरकार पोत्याचे निशाण पडत नाही. तेव्हा रुपया माघारा घेऊन जाऊ. बाहेरून वटाहून आणावयास रयतास हेलपटा पडतो. तेणेकरून रयतेची हैराणगत व चाकरमाने याची वहिवाट चालत नाही; व सरकारात प्रयोजनानरूप खुर्दा पाहिजे, त्या समई थोक मिलत नाही, याजकरिता सराफीची दुकाने इतर तालुक्याचे पेठेत आहेत, व जंजिऱ्याचे पेंठेत दुकान सराफीचे असावे ते नाही. सबब मामुरीवर नजर देऊन लक्षुमण सेठ बिन वीस सेठ मजकूर यासी रस्त्यात जागा नेमून दिल्हा आसे. त्या जाग्यात नवे दुकान बांधोन सराफी चाल उदीम करील त्याची कलमे बितपसील :

रुपया गैरसल पोते चालनीखेरीज निघतील ते रयेतपासून सराफ मजकुराने घेऊन वाजबे रीतीचा बटा घेऊन रुपया खरा करून देत जावा.

कलम १

खुर्दा विकत घेणे तो दालदी भंडारी व कोली पाजकर वगैरे उदमी लोकापासून विकरीच्या दरास येक पैशाने

उदमी लोकानी रुपया किरकोलापासोन थोकपर्यंत वटावणे ते सराफ मजकुराचे दुकानी वटावावा. सराफ मजकुराने रास्त वटाव घेऊन द्यावा.

कलम १

पेठ मजकुरी नवी सराफीची दुकाने सरकारला कोन (कडोन ?) येतील व सराफ मजकूर आणील, त्या दुकानास

जाजती घेऊन विकत घेणे. देणे तो खरेदीच्या दरास येक पैशाने कमी गिराइकास इतर सराफाखेरीज करून इतर लोकास देत जावा.

कलम १

सरकारात खुर्द्याचे प्रयोजन लागेल, ते समई खुर्दा पाहिजे तो लक्षुमण सेठ मजकुरानें आणून द्यावा. त्याचे रुपये सरकारातून देणे ते खरेदीच्या दरास निमे पैसा कमी करून रुपये सराफास दिल्हे जाईल. कलम १

पेठेत दुकानदार उदमी आहेत, ते जिनसाची विकरी करितील. त्याचा पैका घेता रुपया बंधा घेऊन किरकोल उरेल तो गिराखास खुर्दा देतील त्यास सराफ मजकुराने मुजाहिम[+] व्हावयास प्रयोजन नाही. कलम १

जागा व त्या दुकानास महसूल करून घेणे ते सराफ मजकुराचे रदबदलीवरून करून दिल्हा जाईल. आणखी सराफ आणून दुकाने घालवील. त्यास सराफानी खुर्दा लक्षुमण सेठ मजकूर याचे दुकान चालवीत द्यावा. त्यास त्याणे खुर्दा देणे तो खरेदीच्या पाडास निम पैसा कमी करून देत जावा. सराफाचा उदीम पाहोन महसूल सरकारातोन करार केला जाईल.

कलम १

कलमे ६ साहा.

येणेप्रमाणे साहा कलमे करार करून लक्षुमण सेठ माार याजला पेठ मजकुरी सराफीचे वतन करून दिल्हे आसे. यासमधे नजर जीवन मवाफिक सराफ मजकुरापासोन नख्त रुपये ७५ पाऊणसे सरकारात घेऊन हे पत्र भोगवटियास सादर केले आहे. या वतनसमधे लक्षुमण सेट्या पालक[++] सराफीचे येका दुकानाचा महसूल, येक वराची घरपटी व येक म्हैसीची ठाणपालक दिल्ही असे. दरसाल सरकारातून पालक पडत जाईल. पालक घेऊन पेठ मजकुरी दुकान घालोन सराफीचा उदीम पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने करील; व पेठ मजकुरी नवी सराफाची दुकाने हा आणील, व सरकार कौलाने येतील त्यास उदीम पाहोन, महसूल याचे रदबदलीने करून दुकानास जागा नेमून दिल्ही जाईल; तरी तुम्ही सराफीचे कामकाज सदरहू अन्वये लक्षुमण सेट मजकुर याचे हातून घेत जाणे. सराफीचे

+ विरुद्ध वागावयास.

+ + पालक = Exemption from tax (Wilson).

वतनास येक दुकानाचा महसूल व येक घराची घरपटी व येक म्हेसीची ठाण याप्रमाणे दरसाल सरकारातून पाल पडत जाईल, ते पालक चालऊन यासी सराफीचे वतनाचा भोगवटा सुखरूप करून देणे. या पत्राची तालीक तुम्ही घेऊन, आसल पत्र सराफ मजकुरास भोगवटियास परतोन देणे. छ १ जमादिलोवल मोर्तब सुद.

¶*This is a Contract with one Lakshman Shet for minting copper coins. The conditions on which the contract is given are detailed in the paper. The first sheet is missing and with it the place and the names of the persons are also missing.*

No. 133] *[14-10-1770 ?*

पौ छ २६ जमादिलाखर
सन खमस सितैन.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
वेंकाजीपंत[+] स्वामीचे सेवेसी

पो बालाजी जनार्दन सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ २४ जाखरपर्यंत येथास्थित असे विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. राजश्री त्रिंबक नारायेण मंत्री याजकडील यैवज साताऱ्याचे खर्चास यैवज देविला आहे. त्यास या यैवजपैकी बाईचे रसदेचे पंचवीस हजार रुपये साताऱ्याचे खर्चास देऊन मंत्री याजकडील वरातेपैकी पंचवीस हजार रुपये पुण्याचे खर्चास घेता; त्यास मंत्री याजकडील यैवजाची घालमेल न करावी म्हणोन पत्री विस्तारे लिहिले ते कलले. ऐशास यैवजाची घालमेल येथून जाहाली नाही. श्रीमंतापासी जाहाली. मंत्री याजकडील यैवजी येकूण साठ हजार रुपयाची वरात पेसजी तुम्हाकडे साताऱ्याचे खर्चास दिल्ही आहे. त्यात रसदेचे पनास हजार रुपये कार्तिक मासी व नऊ हजार रुपये वैशाख मासी ऐशा मुदती लाऊन दिल्या आहेत. त्यास मंत्री याजकडील रसदेचा यैवज पौष शुध पौर्णिमेस घ्यावयाचा करार गुंतापासून जाहाला, त्याप्रमाणेच साल मजकुरी करार जाहला. तेव्हा कार्तिक मासी यैवज यावयाचा राहिला. वाईचे रसदेचे पंचवीस हजार रुपये तूर्त यावे ते तुम्हाकडे देऊन त्याचे मुबदला मंत्री याजकडील मुदतीचे पौष मासचे पुण्याचे खर्चास लाऊन दिल्हे. मंत्री येथे आल्यावर हा मजकूर कलला. याजकरिता तेच समई सरकारचे पत्र

+ पोतनीस.

तुम्हास लिहून पाठविले. किंबहुना आगोधरचा यैवज पुण्याचे खर्चास लागला असता, तरी यैवजाची घालमेल होत्ये ही होऊ न द्यावी म्हणोन लिा तरी असोत. तो प्रकार नसतां, पुण्याचे खर्चाची वोढ असा प्रकार असतां, आगोधर बाईचा यैवज यावयाचा तो तुम्हाकडे दिल्हा, आणि मुदतीचा पुढील पुण्याचे खर्चास लागला, असे असोन मध्येच यैवजाची घालमेल करणे हे विहित नसेल म्हणौन तुम्ही लिहिलेत, हीच गोष्ट अपूर्वात आहे. असोत. घालमेल यैवजाची येथून होणार नाही. श्रीमंतापासीच जाहाली आहे. श्रीमंताचेहि पत्र आठा चौ रोजी तुम्हास येईल. यैवजाची घालमेल काये जाहाली, बाईचे तूर्तचे पंचवीस हजार तुम्हाकडे देऊन पौष मास पो पंचवीस पुण्याकडे घेतले, यांत तुम्हाकडील नुकसानी कोणती जाली व पैकाहि उणा कोठे जाहाला? तेथील खर्चासहि ऐवज जरूर असावा हेंच लक्ष आमचे आहे; तर मंत्र्याकडील पोषमासपौ पंचवीस हजार आपण घेऊ नयेत. बहुत काय लिहिणें, लोभ असों द्यावा हे विनंती.

¶*Nana Fadnis writes to Venkajipant at Satara, explaining the provision made by the Peshwa for the expenses of the Rani of Satara, cut of the revenues of Wai and the draft drawn against the Mantri.*

No. 134] [*25-10-1770*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बालाजीपंत दादा स्वामीचे शेवेसी

पो कृष्णाजी लक्ष्मण कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता॥ छ ९ रजब जाणून स्वकीये कुशल लिहीत आसिले पाहिजे विशेष. राजश्री कृष्णाजी भैराळ व चिंतोपंत फडनीस श्रीमंत राजश्री नानास विनंती करितात की माहालची लावणी पाडली ते माजी मामलेदार व सरफडणीस येक होऊन पाडली, बखेडे केले, दहकाची तकरीर केली, म्हणोन वर्तमान सांगतात म्हणोन ऐकिले. त्यास मामलेदार व फडनीस सांगत आसतील ते खरेच आसेल, थोर आहेत. लावणीचा मजकूर पूर्वी राजश्री लक्ष्मण कोनेर याजकडील मामलत निवोन राजश्री नारो आपाजीकडे जाली, तेव्हा त्याणी दरोबस्त माहालचे वहित पडित निवडून समजोन घेतले व गावगना माहालानिहाय कारकून पाठऊन, पाहाणी करून, मग जमाबंदी केली त्याप्रमाणे राजश्री कृष्णाजी भैराळ यास राजश्री कृष्णाजी बलाल दफ्तरदार याणी च्यार पाच वेळा सांगितले कीं जमीन वहित पडित याची चौकसी करावी व गावगना कारकून पाठऊन पिकाची पाहाणी करावी, नंतर

---

१ येथून पुढें हस्ताक्षर नाना फडणीस यांचें.

जमाबंदी करावी. त्यानंतर माघसिमी (माघमासी) येथ आलो. तेव्हा त्यास सांगितले कीं गावगना पाहाणी केल्यासिवाये जमाबंदी कैसी करता? कोण्या गावचे पीक कसे आले, तुम्ही जमाबंदी करता त्यास गाव बुडतो की तरतो, सरकारकिफायेत होते की नुकसानी होत्ये, हे तुमच्या ध्यानात कसे येईल? मोघम जमाबंदी केल्याने सारेच गावगना पाटील हाका मारतील की आम्ही बुडालो. जमाबंदी सख्त जाली. मोघम जमाबंदी कर्णे ठीक नव्हे. मागील आमलदार पाहणी करून, मग जमाबंदी करीत आले, त्याप्रोच तुम्ही करावें. याप्रो दाहावीस वेळा सांगितले, परंतु त्याच्या ध्यानासहि गोष्ट न येता जमाबंदी मोघम केली. जमाबंदीचा सांप्रदाये मागील पाहाता, माघआखेर जमाबंदीचा फडशा होऊन वसूल चालता करावा आणि जेष्ठ आषाढ आखेरपर्येत वसुलाचा झाडा होऊन, श्रावणमासी जमा वसूल होतात. भाद्रपदमासी हिसेब पुण्यास कारकून घेऊन येतात. हा मजकूर सर्व मामलेदारास पुसल्यास निवेदन करतील. साल मजकुरी सन इहिदेत राजश्री कृष्णाजी मैराळ याणी जमाबंदीस फालगुन शुधात याचे पुत्राचा वृतबंध जाल्यानंतर जमाबंदीस प्रारंभ केला, तो चैत्र आखेर-पर्येत जमाबंदी जाली, आणि वैशाख जेस्ट दो महिन्यात वसुलाचा फडशा करून माहाली बाकी दाहा बारा हजार रुपये आजमासे ठेऊन, पुण्यास श्रीमंताचे भेटीस आले. येणेप्रमाणे येथील वहिवाट जाली. मग लावणी आम्ही पाडली की मामलेदारानी पाडली हे आपले ध्यानास येईल. माजी मामलेदारानी दिकत कोणे प्रकारे कसकसी केली याची चौकसी त्याणी केलीच आसेल, हे त्यास पुसावे. मी कारकून, हिसेबाचा मजकडे संमंध; मी लावणी कसी पाडली याचा तपसील काये सांगतात ती चवकसी करावी. दहकाची तकरीर केली ऐसे म्हणतात, त्यास दहकाचा हिसेब मामलेदारानी परभारे श्रीमंतापासी पाठविला, त्याजवरून श्रीमंतानी वरातदारास मनाई दिल्ही. ऐशास नारो बाबाजीपासून सरकारात हिशेब पाठवावा तो माझेपासून जात आसे. आसे असता मामलेदारानी परभारे हिसेब पाठविला. आम्ही नेवाशात कारकूनसुधा जवल आसता हिसेब जाऊन, मनाई आली, तेव्हा आम्ही कारकून सरकारचे आसोन कामाचे काये, ऐसे जाणोन, महिनां पंधरा दिवस गावगना बारकाईने शोध घेऊन दहकाचा हिसेबं आकारून सरकारात पाा, यात तकरीर जाली की काये? आम्ही हिसेब पाठविला त्यास व जमीदाराचा हिसेब व माहालचे फडनीस याचा हिसेब याची रुजुवात येथे राजश्री मल्हार जगंनाथ निाा नागोराम याचे गुजारतीने जाली, त्यात तफावत जाली नाही. शे दोनसे रुपयाचे अंतर पडले. येणेप्रो मजकूर आहे. यात आम्ही बखेडा करून लावणी पाडली व तकरीर केली ती कसी हें आपण ध्यानात

आणावे. येथे मार होत गेला तो श्रीमंतास वरचेवर लिहीत गेलो. मामलेदारानी मामलतीस चड केला तो साधला नाही, म्हणोन ऐसी नाना प्रकारची तुफाने मजवर घातल्यास चड सुटतो की काये? कोण्या गावास तगाई, अथवा कोण्या गावास कौल, आथवा पडित जमीनीस इस्ताव्याचा कौल मामलतदार लावणीचा बंदोबस्त करीत आसता मी कोणास दिकत केली की काये? याजपासून लावणीचा बंदोबस्त घडला नाही व मी कोणास दिकत काही केली नाही. आपणास लावणीं होईना, आणि कारकुनावर निमित्ये घ्यावी, आसा मी कमाविसदार कोठे पाहिला नाही. माजी मामलेदार व आम्ही येक जालो ऐसे राजश्री कृष्णाजी मैराळ श्रीमंतास सांगतात्र. त्यास नारो बाबाजीची मामलत निघोन लक्ष्मण कोनेर याजकडे जाली, तेव्हा मी नारो बाबाजीकडे जात होतो. त्याचे हिसेबाचा फडशा दोन वर्षे होत होता. लक्षुमण कोनेरकडून मामलत निघोन नारो आपाजीकडे जाली, ते समई लक्षमण कोनेर याकडे येक वर्षे जात होतो; तेव्हा त्याचा फडशा जाला म्हणून राजश्री रामचंद्र नारायेण याजकडील मामलत निघोन राजश्री मैराळ जिवाजीकडे जाली. त्यास राजश्री माहादाजी अनंत जवल आहेत. हिसे रसिदीचा वगैरे हिसेब तुटमुदतीचा होणे, या कामामुळे पाचसात वेला त्याजकडे गेलो होतो. इतकेच निमित्य मजकडे येऊन लावणी पाडल म्हणतात, याची चवकसी करून लटक्याचे पारपत्य करणार श्रीमंत समर्थ आहेत. +मी तीस वर्षे चाकरी केली, सरकारात लटके बोलणें व सरकार-कामात नुकसानी करणे, ही गोष्टी मजपासून घडती तरी श्रीमंत राजश्री नानाचे पायापासी टिकणूक कैसी होती? मजला आपण लाहानपणीपासून मांहीत आहेत. आता सर्व आश्रा स्वामीचा आहे. मामलेदाराचे वसिले बहुत आहेत. माझे साहित्य कळेल तसे करावे. सर्व मजकूर रा। कृष्णाजीपंत सांगता विदित होईल. बहुत काये लिहिणे, कृपा लोभ कीजे हे विनंती.

¶*Krishnaji Lakshman represents to Balajipant Dada that he has been wrongly blamed in the matter of the assessment of revenue and prays that an enquiru should be instituted and justice be rendered to the writer.*

No. 135] *[10-2-1771*

श्री

राजश्री मल्हारजी कापसे हवालदार

किले मुरूगमला गोसावी यासी

सु॥ इहिदे सबैन मया व अलफ. समत मुरूगमला व पेठ किले मार येथें तुम्ही किल्यावरून परभारा रयेतेस उपद्रव करून दंड गुन्हेगारी घेता म्हणोन

+ अक्षर निराळें.

हुजूर विदित जालें, त्यावरून हे आज्ञापत्र सादर केले असें; तरी तुम्हास समत मजकुरीं गावखेड्यास खंड गुन्हेगारी घेऊन उपसर्ग करावयास प्रयोजन काये? अत:पर हे गोष्ट परिछिन्न कार्याची नसे. आजतागाईत खंड गुन्हेगारीचा हिसेब लेहून हुजूर पाठवणें. या उपरी पेठेत व समत मजकुरी रयतेस वगैरे यास उपसर्ग न करणें. जाणीजे छ २४ सवाल. आज्ञा प्रमाण.

¶*Malharji Kapse is ordered to desist from molesting the ryots of the villages under fort Murugmala.*

No. 136] *[31-3-1771*

पैवस्ति छ ११ रबिल्यैवल इहिदे

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री बालाजी पंत नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य त्रिंबकराव शिवदेवं कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम तागाईत चैत्र वद्य १ मुकाम आंतरवेदींत मथुरावृंदावनाजवळ येमुना उतरोन उत्तर-तीरीं जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असावें. विशेष, परगणें जैनाबाद मंडई, माजरोद, समेत व परगणें हातगड येथें ब्राम्हणांस इनाम जमिनी व गांव ब्राम्हणांस व फकीरांस वगैरे चालत आहे व आजीबाद जमिनी व धर्मादाय खर्च पडत असतो; याचा झाडा काढून आणावयास राजश्री गोविंद अनंत कारकून सरकारचें आज्ञापत्र घेऊन जैनाबादेस आले, त्यास कमाविसदार सालमजकुरीं नवे करोन पाठविले आहेत, त्यांची माहितगिरी पुर्त्ती नाहीं, याजकरितां सेवेसी विनंती लिहिली आहे. आम्हांस खानदेशचे माहाल जैनाबाद व मांजरोद मंडई वगैरे भोवरासें आदी करोन कच्चा हिशेव हुजूर समजावणेंचा आहे. कमाविसदार व जमीदार देशीं आल्यावर समक्ष आणून कचे हिशेब समजाऊन देऊन आज्ञेप्रमाणें वर्तणूक करूं. तूर्त माहालीं आधींच आफती पडोन निमे जमेस ठिकाणा नाहीं. त्याहीमधें कारकून माहालीं गेल्यामुळें बखेडा होऊन होत्या कामांत आंतर होतें. याजकरितां विनंती मान्य पडोन या समयीं कारकुनास माघारें बोलाऊन घ्यावयाची आज्ञा करावी. देशीं आम्ही आल्यावरी कच्चा हिशेब जमीदार देखील हुजूर आणून समजावयास अंतर होणार नाहीं. आम्हास सरकारआज्ञेप्रमाणें वर्तणूक करावयास उजूर काये आहे? माहालांत कमती दरसाल आफती पडोन मनमानेसी आली आहे. फौजेस खर्च दोन दोन तीन तीन छावण्यामुळें जाजती पडतो. यामुळें कर्जाशींच गांठ आहे. सविस्तर आमचें वर्तमान कचे आहे. स्वामीपाशीं निवेदून आज्ञाप्रमाणें

वर्तणूक होईल. आफतीच्या कारभारांत कारकुनांनीं तेथें बखेडा केल्यास होणार कामांत आंतर पडोन नुकसान होतें, याजकरितां विनंती लिहिली आहे. सविस्तर विनंती माहालींहून राजश्री आपाजी गणेश कमाविसदार यांजकडून कारकून येऊन करितील तें ध्यानास आणून कारकून हुजरोन गेले आहेत त्यांस बोलाऊन घ्यावयाविशी आज्ञा केली पाहिजे. येविशी चिरंजीव राजश्री दादोशंकर खांसा स्वारी समागमें कर्नाटकांत आहेत ते फिरोन आल्यावर ते सेवेसी विनंती करितील. सर सुभेदार दरसाल येऊन पैका घेतात तितका माहालीं जमा होत नाहीं. सरकारमर्जीप्रमाणें सेवक लोकांस वर्तणूक करितां ज्याजती पैका लागतो व माहालींहि कमती यास्तव कच्चे हिशेब समक्ष आल्यावर समजावणें जरूर आहे. कमाविसदार नावाकफ नवे आहेत. सरकारमर्जीची समजोती पडणार नाहीं, याकरितां आम्ही देशीं येंऊ तोंवर महकूफ करावें. दर्शनास आलियावरी सविस्तर निवेदन होईल, सेवेसी कळावें. साडे नऊ हजार रुपये सरकारांतून सरसुभेदार येऊन घेतात, त्यास माहालीं ठिकाणा नाहीं. सविस्तर कच्चे हिशेब देशीं आल्यावर समजाऊं तेव्हां ध्यानास येईल. कृपा करोन कारकून माहालीं पाठविले आहेत त्यांस बोलाऊन घ्यावयास आज्ञा केली पाहिजे. बहुत काय लिहिणें लोभाची वृद्धि केली पाहिजे हें विनंती.

¶*Trimbakrao Shivdeo writes from the Doab requesting Nana Fadnis that the inspecting officers sent by the latter to examine accounts of his talukas in Khandesh be recalled.*

No. 137] *[17-9-1771*

पौ छ २९ जाखर

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नाना स्वामींचे सेवेसी

पौ सखाराम भगवंत साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ छ ७ जमादिलाखर जाणून स्वकीये कुशल लेखन करीत गेले पाहिजे विशेष. केसो बलाल नव्हेकर चिंचवडी राहतात, त्याचे सुनेने जीव दिल्हा की काय जाहाले ये गोष्टीचा शोध लागला नाही आणि केसोपंतास व त्याचे गोत्रजास आपंक्त केले म्हणोन येथे मशारनिलेचे गोत्र पुरुष आहेत त्याणी विदित केले. त्यावरून येथे सिष्टब्राह्मणास पुसतां त्याणी शास्त्रमते सांगितले की याविसीचा दोष गोत्र पुरुषाकडे नाही, यांची श्वानसंध्या चालावी. त्यावरून सर्व ब्राह्मणांचे मते येथे पुरुष

आहेत ते मुक्त जाले. ऐसियासी देसी गोत्र पुरुषांची मुलें मनुषें आहेत, शास्त्रता पाहतां गोत्रजांकडे हा दोष नाहीं. त्यावरून सिष्ट ब्राह्मण याणी त्याचीहि मुक्तता केलीच आसेल. येथे पुर्ता शोध मनास आणून श्रीमंतानीं श्री देव यांस व वेदशास्त्रसंपन्न रामशास्त्रीबावास व आपल्यास पत्रे लिहिली आहेत तर आपण उभयेतास सांगोन यांची मुक्तता लवकर करावी. यांची घराणी थोर आहेत. लग्ने, मुहूर्त, हव्यकव्य सर्व राहिलीं आहेत. चौघा ब्राह्मणाचें मतें होईल तें करावे. बहुत काय लिहिणें? लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Sakharam Bhagwant requests Nana Fadnis to execute the decision he had given in the case of restoring to normal social relations, relatives of a brahmin female suspected to have committed suicide.*

No. 138] [*19-10-1771*

नकल

श्री

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री रामचंद्र बलाल सुभेदार किले महीपतगड गोसावी यांसी

सेवक भगवंतराव त्र्यंबक प्रतिनिधि नमस्कार. सुा इसने सबैन मया व अलफ. रावो बलाल व कृष्णाजी बलाल व बालाजी नारायेण व बहिरो लक्षुमण उपनाम कारले देशकुलकर्णी व गांवकुलकर्णी सुभा दाभोल याणी कऱ्हाडचे मुकामी हुजूर येऊन विनंती केली जे, सुभे मजकूरचे आकरा माहालचे देशकुलकर्णी व गांव-कुलकर्णी आपलेपैकी ता॥ खेड तलवटीबंदर देखील नादबंदरपैकी देहे दरोबस्त व निमेचे व चौथाई स्वामीचे जिल्हेत तालुके महिपतगड व किले महीमंडणगड सदरहू तीन किले यांचे तनखेयास देहे सदरहू तर्फेपैकीं आहेत. यैसियासी वतनाचा हकरुसूम कैलासवासी संभाजी माहाराज नावडीचे मुकामीहून मोगलानें धरून नेले, तदोत्तर याकूबखान याणी किले अंजणवेल हबसी याणी घेतली, जंजिरे सुवर्णदुर्ग कानोजी आंगरे सरखेल यांजकडे जाहला, त्या सालापासून आपला हक रुसूम सरकारामध्यें जत जाहला. वडील आपले संभाजी बलाल व लक्षमण बलाल लाहान कुटुंबसुधा हबसी व आंगरे यांचे किलेयात राहिलें. स्वामीकडे आपल्या हरदू वतनाची चाकरी करावयासी रूजू व्हावें, परंतु त्याचे कैदेमुळें येता नये. हबसी व आंगरे याजकडे आपले वडील व आपण हक रुसूम याचे यैवजीं मोघमे मुशाहिरा देत तो घेत होतो. यैसियासी कैलासवासी नानासाहेब याणी सन सीत खमसैनांत जंजिरे सुवर्णदुर्ग व किले अजणवेल सरकारात फते केले. त्या समयीं आपण पुणे मुकामी हुजूर येऊन सर्व आपली हकीकत निवेदन केली,

त्यावरून कृपाळु होऊन वतनदारीवर नजर देऊन आपला हक रुसूम याचा अजमास पाहून त्या अजमासाच्या अन्वयें साल दरसाल जैसी जमाबंदी आकारेल त्यापैकीं सेपनास रुपये सरकारात ठेऊन बाकी यैवज आपणास देत होते तो घेत आलो. याअन्वये भोगवटा चालत आला. स्वामीकडे यावें त्यास सन सितैनात कैलासवासी यमाजीपंत आणा यांजकडे येऊन सदरहू अन्वयें विनंती केली. त्यावरून किले महीपतगडास व व्याघ्रगडास व महीमंडणगडास पत्रें दिली जे माारनिलेची वतनसमधे सेवा घेऊन यांचा हकरुसूम आकारले त्याप्रमाणें यांस पावता करणें, यैसी पत्रें घेतली. उपरांत तालुके तालुकेयांस पत्रें रुजू करून सेवा करावी तो आणास देवाज्ञा जाहली. उपरांत स्वामीचे जिल्हेत काही दिवस हाली-माजी जाहाली यामुलें ते गोष्टी न घडली. यैसियास हली स्वामीनी कृपाळु होऊन सरकारजमाबंदी साल दरसाल आकारेल त्याप्रमाणें परभारा रयेत निसबत आपला हक रुसुम बिा

नख्त बाव यैन वेरीज दर रुपयास ८॥·
नारल राजभागास दर हजारी नख्त ८=॥·
यैन जिनस गला दर खंडीस राजभागास कैली ८॥·
वजन किमती दर रुपयास नख्त ८॥.

येकूण नख्तबाब यैन वेरजेस निम आणा व गला दर खडीस अदमण वजनी किमतीवर दर रुपयास निम आणा व नारल दर हजारी राजभागास अडीच आणे येणेंप्रमाणें आपला हकरुसूम सिरस्ता आहे. यैसियासी राजश्री पंत प्रधान यास विनंती केली त्यावरून साल मजकुरापासून हकरुसूम परभारा रयेत निा देत जाणे म्हणोन राजश्री विसाजी केशव सर सुभेदार प्रांत कोकण व रामाजी माहादेव तालुके सुवर्णदुर्ग येथील सुभेदार यांसी पत्रें दिलीं आहेत. त्याप्रमाणें स्वाम कृपाळु होऊन हक रुसुम परभारा रयतेनिसबत चालऊन वृत्तिची चाकरी घ्यावी म्हणोन, त्यावरून याचा पूर्वअन्वयें सविस्तर मनास आणून हे पत्र तुम्हास सादर केले असे. तरी किले मजकूरच्या तालुक्यास तर्फ खेड व ताा नादू बंदर येथील देह आहेत तेथें साल दरसाल जमाबंदी आकारेल त्यास परभारा रयेत-निसबत सदरहू लिहिलेंप्रमाणें देशकुळकर्णी व गांवकुळकर्णी यांचा हक रुसुम पावता करून वतनाची चाकरी घेत जाणें. प्रतिवर्षी नवीन पत्राचा अक्षेप न करणें. या पत्राची प्रति लेहून घेऊन हे पत्र भोगवटीयास परतोन यांजकडे देणें. जाणिजे छ १० रजब निदेश समक्ष.

¶*Bhagwantrao Trimbak Pratinidhi issues orders to Ramchandra Ballal Subhedar to restore the vatan rights of the Karles, Kulkarnis of Dabhol. The paper incidentally mentions the capture of Sambhaji at Navdi by Aurangzeb's forces. Navdi is the name of the village where the present bazar of port Sangameshwar stands and through which the motor road now crosses the river. This spot is nearly two miles south of Kasba Sangameshwar.*

No. 139] [*8-12-1771*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक भिकाजी नायक सरदेसाई तर्फ खिलणा सां नमस्कार. विज्ञापना ऐसिजे. विठल नारायण नामजोशी व कृष्णाजी रामकाणा यांचा मौजे मुरबाड ता॥ संगमेश्वर येथील ठिकाणाचा कज्या होऊन मनसुबी हुजूर पडली, त्याविसी राजश्री बाळंभट मावलंकर निा॥ सदाशिव नायक सरदेसाई यांस हुजूर बोलावणे जालें. त्यास दादोबा नाईक यासी बरें वाटत नाहीं, यामुळें त्यास तूर्त येतां नये. मना चिठी द्यावी म्हणून राजश्री सदाशिव नाईक याचे पत्र आले त्याजवरून सरकारांत आम्ही विनंती करून दोन महिन्यांची मुदत मागोन हा कागद लिहून दिल्हा असे. तरी आजपासून दोनमहिनियानी बाळंभट हुजूर हजर होतील, न जाल्यास आपण हजीर करून देऊं. छ १ रमजान सुा॥ इसने सबैन मया व अलफ हे विज्ञापना.

¶*Bhikaji Naik Sardesai writes to the Peshwa that he stands surety for Balambhat Mawalankar and pledges to produce the latter in the court after two months from the date.*

No. 140] [*8-12-1771 ?*

श्री

शेवेसी विज्ञापना तागायत छ १ रमजानपावेतो वर्तमान येथास्थित असे विशेष. महादेवकर ब्राम्हणाचे देउली चोरी जाहाली. तिचा माग चोराचा ब्राम्हणानी काढीत नेला. चोराचा थांग लाऊन राजश्री बाबूजी नाईक जोशी याजकडे जाऊन सांगितले. त्याणी चोर धरून कांहीं वस्तभाव चोरापासीं सांपडली. ते ब्राम्हणाचे हवाला करून चोर बारामतीस पाठविले. ब्राम्हण महादेवास आपले घरीं आले. हे वर्तमान मलवडीकर वाटग्यास कळले. त्यावरून ब्राम्हणास बोलाऊन नेऊन वादपूस केली, तुम्ही चोराचा पत्ता लाऊन चोर आम्हाजवल आणावे, आम्ही पारपत्य करावे; ते आमचे मुलकांतील चोर पेसव्याकडे कसे नेले म्हणोन पुसिले. त्यावरून ब्राम्हणानीं सांगितले कीं बाबूजी नाईक याणी चोर धरिले, वस्तभाव सांपडली ते आम्हांस दिल्ही. ते देवाचे जामदारखानियास आणिली. चोर बारामतीस ठेविले आहेत. पुढें पेशव्याकडे पारपत्यांस रवाना करतील ऐसे सांगितले. परंतु ते न आईकता ब्राम्हण धरून नेऊन कैदेंत ठेविले. मारहाण करूं लागले. तेव्हां दहा पाच ब्राम्हण पुण्यास आले

आणि म्हणो लागले कीं मलवडीकरानीं ब्राम्हणावर गहजब केला आहे. त्यास लेहून मोक्तलीक करावली पाहिजे, म्हणोन सांगितले. त्यावरून येथून घाटग्यास पत्र लिहिले कीं ब्राम्हणास मारहाण करावी हे तुम्हास उचित नाहीं. चोर सरकारांत आले आहेत. खासा स्वारी आलियावरी पारपत्य होईल. तुम्ही ब्राम्हणास सोडून देणे, म्हणोन लिहून राजश्री नारो लक्ष्मण कारकून याजबराबर पांचसात राऊत देऊन घाटग्याकडे मलवडीस रवाना केले. मशारनिल्हे मलवडीस गेले. पत्र घाटग्यास दिल्हे. ब्राम्हणास सोडून देणे म्हणोन नानाप्रकारें सांगितले, परंतु ते ब्राम्हणास सोडीत नाहीं. मारहाण करितात ऐसे मशारनिल्हेनी लेहून पाठविले आहे, तेच बजिन्नस सेवेसी रवाना केले आहे, त्यावरून सविस्तर निवेदन होईल. ब्राम्हणाकडे अन्याये दिसत नसतां सरकारचे पत्र कारकून गेला असतां त्यानीं भाषणे केली आणि कारकुनास सरकारच्या पिटून लाविले ते वृत्त सविस्तर पत्रावरूनच कळूं येईल. याप्रकारे वर्तणूक करणार राज्यांत बहुत-करून राहिले नाहींत. फौज पाा पारपत्यही केल्यास होते, परंतु कानावर पडून आज्ञा होईल त्याप्रमाणें करावे हे उचित जाणोन सविस्तर विदित व्हावे यास्तव लिहिले असे. ब्राम्हणास स्नानसंध्या नाहीं, अन्न नाहीं. नित्य चोराप्रमाणे मारहाण होते. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶This is a complaint lodged by the Brahmins of Mahadeo against the Ghatge of Malavdi for keeping them in confinement and beating them cruelly. A theft was committed at the temple of Mahadeo which was traced and the culprits handed over to Babuji Naik. The offenders were sent to Poona and the recovered property went back to the temple. Ghatge within whose jurisdiction lay the place, naturally took offence at the attempt of overreaching his authority and had the Brahmins confined whereupon the Brahmin community sought relief against him from the Peshwa.

No. 141] *[1771-72.*

श्री

यादी त्रिंबकराव विश्वनाथ याजकडील अजमास सुा इसने सबैन मया व अलफ. खो कापड रो

९४४०४३०॥–	हुजुरून यैवज पावला देखील सन सबैनचे बाकी मिलोन रो.
९४२१९३॥॥·	सन सबैनात फौज छावणीस राहिली त्यास नालबंदी पैा यैवज पावला तो रो.

भारत इतिहास संशोधक मंडळ
स्वरूप प्रत
नं.
ता.
रो.

२३००००	कृष्णराव बळवंत याजसमागमे...फौज़ साल गुा[illegible]त्यास वगैरे खैवज पावला तो देखील[illegible] रो.
६३१२६२४।–	
४६२६७६१	माारनिलेनी माघ मासापासून वैशाख-अखेरपर्यंत खर्चाचा अजमास करून पाठविला ती बेरीज रो.
१७९००००	सालमजकुरची नालबंदी फौजेस द्यावी लागेल ती देखील कापड मिलोन रो
११६८९३८५।–	
२०००००	कापडाबा कापड आख ३९४००० किता ४६००० किता ४००००० पैा निमे नख्त रो
१२८८९३८५।–	

¶*An account of monies spent by Trimbak Vishvanath Pethe on his Karnatak expedition.*

No. 142] [*Before 1772.*

श्री

राजाश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोविंदपत तात्या स्वामीचे सेवेसी पोष्य सदाशिव दिनकर सां नमस्कार विनंति. येथील कुशल ता॥ छ २९ साबान मुकाम भादोले जाणून स्वकीय कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. बहुत दिवस जाहाले पत्री परामर्श होत नाहीं, तरी ऐसे नसावें. निरंतर पत्रद्वारा सांभाल होत असावा. यानंतर राजश्री विस्वासराव रामचंद्र यांजविसीं श्रीमंतास विनंती केली तो मजकूर आपलेहि श्रवणांत आहेच. त्याजवर घरास आल्यानंतर, माारनिलेकडील कारकुनास बोलाऊन, सरंकारचे

जाबसालाविसी बोलून, त्यांजकडील उतरें जाली ती पूर्वी श्रीमंताचे सेवेसी विनंतिपत्र विनविलें होते. त्याजवर माारनिलेस समागमे घेऊन पुण्यांस यावे, तर मी घरी आल्यापासून दिवसेंदिवस रोगाने क्षीण जाहालों याजमुलें दिवसगत लागली. सेवटी तसाच घरीहून निघोन, विस्वासरावजीस समागमे घेऊन, मुकाम मजकुरापावेतो आलो. येथे मजला ज्वर उत्पन्न जाहाला, तेणेकरून फार विकल जाहालो. काहीं उतार पडला म्हणजे पुढें यावे, याकरितां बारा दिवस येथें राहिलो; परंतु दिवसेदिवस वाखा फारच होऊ लागला, त्यामुलें लाच्यार होऊन माघारा फिरलों. विस्वासरावजी समागमे होते ते पुढें यावयाकरितां आले आहेत. श्रीमंतांचे सेवेसी विनंतिपत्र विनविलें आहे. आपण प्रविष्ट करून ज्यांत सरकारचे जाबसालाचा उलगडा पडून माारनिलेचा परिणाम लागे ते करणें आपणाकडे आहे. तात्या, रावजी श्रीमंताचे दर्शनार्थ उदित आहेत, परंतु भयचकित आहेत, तें भय दूर करून यांस दरबारास नेले पाहिजे. मी समागमे येत होतो. माझी दशा असी जाली, याजकरितां मागे फिरलो ; स्वस्छ जाल्यावर येईन. रावजीचा जाबसाल अगत्यवाद धरून केला पाहिजे. बहुत काये लिहिणे? लोभ करावा हे विनंती.

¶*Sadashiv Dinakar who was not in good health earnestly requests Govind Shivgram to win the favour of the Peshwa in deciding the case of Viswasrao Ramchandra.*

No. 143] [*25-9-1772 (?)*

पो छ १ रजब

श्री

राजश्रिया विराजित गजमान्य गजश्री
हरिपंत तात्या स्वामीचे सेवेसी

पो कृष्णाजी गोविंद गोरे कृतानेक सा नमस्कार. विनंति येथील कुशल ता भाद्रपद वद्य चतुर्दसीपावेतो यथास्थित असे विशेष. नवमीस माहामात्रा मातुश्रीस दिल्ही ते दशमी येकादसी तीन दिवस माहामात्रा दिल्ही. येकादसीस नुस्ते दुधातच दिल्ही. ऐसे तीन दिवस देऊन द्वादसीस पथ्य मीठ शाका इत्यादि पथ्य जाहाले. मर्जी बहुत नाजुक जाहाली आहे. चालावयासी सामर्थ नाही व पालखीत बसोन च्यार कोस जावयासी कठिण पडेल असा प्रसंग आहे. तथापि मात्रेने आपला गुण केला. किंचित प्रकृत हलकी जाहाली. दाहा[१] सीत निवारण

---

१ दाह.

जाहालें. पुढे आठच्यार दिवस पथ्य साधारण घडेल. त्या उपरांत येखादी मात्रा द्यावी असा योग मर्जीनुरूप करावा. निःशेष अरोग्यता शरीरी बाणलियावरी अरोग्यतेचे वृत सेवेसी लिहून पाठवीन. येथे आलो तेच दिवसी कांसीकर समर्थ पंडित आज़ दाहा महिने मातुश्रीपासी आहेत, त्यास माहावात होऊन संध्याकाल पावेतो बिदा व्हावे अशा योगात वैद्याचे येणे जाहाले. बहुत यत्न केला. मात्राचा अनुपानाचा प्रकार फार केला. त्यावरून त्या ब्राह्मणाचा त्रिदोष सनिपात दूर होऊ(न) आरोग्य जाहाले. कलले पाहिजे. श्रीमंत मातुश्री आईसाहेबी श्रीकासीस जावयाचा उद्योग फार चितात धरिला आहे तदनुरूप येथील निकटस्थहि भर देतात व श्रीमंतहि खानगीचा विचार तरतूद करितात, परंतु येथे पालखीत बसावयासी सामर्थ नाही हे कोण्ही विचारीत नाही व तिरस्थली यात्रा व्हावी असी पत्रेहि हिंदुस्थानातून यावी, त्या उपरी प्रस्थान करावे असेहि कोण्ही लिहिले नाहीं, हें अपूर्व वाटते. येविशीचे मी छोटेखानी शागीर्द मला काये पडले आहे? परंतु ज्या गोष्टीनी परिणाम नीट ते येथे लिहिल्यातच उतम. कलले पाहिजे हे विनंति. राजश्री हरिपंत भाऊ बरवे यास नमस्कार रा॥ शनवार अमवाश्या प्रहर दिवस.

¶*Krishnaji Govind Gore reports to Haripant Phadke, the improvement in Gopikabai's health and advises that on account of declining health she should not be allowed to proceed on a pilgrimage to Prayag.*

No. 144] *[4-11-1772?*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीस

समस्त ब्राह्मण तालुके सुवर्णदुर्ग कृतानेक वेदोक्त आशीर्वाद विनंती येथील कुशल तागाईत मार्गशीर्ष शुद्ध १० पावेतों कृपालोकनेंकरून सर्व ब्राह्मण यथास्थित असो विशेष. समस्त ब्राह्मण तालुके सुवर्णदुर्ग म्हणोन स्वामीस पत्र लिहिलें आहे. त्यांतील अभिप्राय ऐकणेयांत आले कीं तालुके मजकूरची मामलत राजश्री मोरोपंत फडके याजकडेस आहे. त्यांणी रयतेस व ब्राह्मणासच वीस पंचवीस वर्षें बहुत दुख दिल्हें आहे, तें कशावरून समजावें? फडके तो इनामदाखल म्हणवितात. ब्राह्मणासीं विरोध करून आसीमुळें चौथाई वगैरे सुटी दिल्या असतां रयतेस पावल्या नाहींत. अनेक प्रकारें रयतेवर जलेल होतो. याजकरितां फडके याजकडील मामलत काढल्यानें दरसाल खर्च भागोन बारा पधरा हजारपावेतों सरकारांत देणार, मामलतीची तहगिरी जाल्यावर साहासात

महिन्यांनीं सात आठ लाख रुपये तफावत लागू करून देणार व पुढें रयतेचा व ब्राह्मणाचा बंदोबस्त करून बोभाट न येतां मामलत करावी. याअन्वयें स्वामीस पत्र लिहिलें किंवा समजाविले हें न कळे. त्याजवरून विनंती कीं आजपावेतों कोंकण तालुकेयांत दाहा तालुके अहेत. तेथील मामलेदार हरयेक कारणावरून रयतेस जलेल पोहचवितात. त्याजवरून रयत धन्याजवळ फिर्याद जाऊन आपलें पोटाचें कारण समजाऊन मामलेदारास ताकीद करऊन बंदोबस्त करवितात, अशी आजपावेतों परंपरा चाल आहे. परंतु सर्व प्रांतस्थांचें नांव सांगोन तफावती व तजकरे करणे आणि सर्वांस दोष लावणें हें प्रांतस्थाचें काम नव्हे. आमचे सरकारांतून सुटी वगैरे दिल्या त्याविषयीं मात्र हुजूर बोलणीं अथवा फिर्यादी करणें ते केली. सालगुदस्तां मोरोपंत सुभेदार खाली सुवर्णदुर्गास आल्यावर ब्राह्मण व खोत यास सर्वांस बोलाऊन नेऊन समजाऊन सांगोन द्वेषकारण मागील सर्व सोडून आमची समजी केली. येक साल दर व येक साला सूट आम्हास दिल्ही. व गांवगंनाचे खोत व जमीनदार आणून सर्वाची समजी करून यादीवर नांवनिशी ज्याची त्याची घेतली. याप्रमाणें सर्व प्रांताचा येकोपा केला असतां हाली समस्तांचें नांवाचें पत्र स्वामीस लिहिलें म्हणौन ऐकितों. त्यास ज्याणी पत्र लिहिलें अथवा ज्यांणीं स्वामीस समजाविलें असेल त्यास हुजूर बोलाऊन नेऊन त्यांची व आमची सर्व प्रांतस्तांची समक्ष रुजुवात करून उभयतांची नांवनिशीवार यादी जाल्यावर सर्व स्वामीचें ध्यानांस येईल. उगांच प्रांतस्थाचें नाव सांगून कोणीं पत्रें लिहितात ते आम्हा प्रांतस्थांत नाहींत व तफावती वगैरे करणें हें आमचा रयतांवेयाचा पेशा नव्हे. आजपावेतों फडके याचे मामलतीस अठावीस तीस वर्षें जाहालीं. परंतु कोणास कोणते गोष्टीविशी जलेल जाहालें नाहीं. सुटीचा व दरादामाचा तंटा आमचा होता. ते त्याणी आम्हांस सर्वांस सांगोन समजी केली. आतां तंटा त्यांचा आमचा कोणे गोष्टीचा राहिला नाहीं. तंटा आहे म्हणोन स्वामीस समजावीत असतील, त्यास हुजूर बोलाऊन न्यावें. आम्हास आज्ञा जाहाली म्हणजे आम्ही येऊं. बोलणें समक्षच होणें तें होईल. तालुकेयास तोटा आहे तो सांभाळून जाजती सरकारांत देऊं करून कोणी मामलत करणार आणि रयतेचा बच्याव बोभाट न येतां करणार. त्यास मामलतीच्या घालमेली वरघाटीं व कोंकण प्रांतीं होतात. परंतु जो नवा जाहाला त्याणें मागले मामेदारांपेक्षां आपणास बरें म्हणोन घेऊन रयतेचें बरेपण केलें ऐसें आजपावेतों ऐकण्यांत आलें नाहीं. प्रस्तुत कोणी ग्रहस्त उभा राहोन स्वामीजवल बोलतो कीं रयेतचा बोभाट न येतां मामलत करतो. बरें आहे; असा पुरुष ईश्वरें निर्माण केला आहे. त्याची आमची गांठ समक्ष पडे तें स्वामींनीं

केलें पाहिजे. गाठ पडल्यानंतर आम्ही त्याजवळ च्यार गोष्टी यथामतीनें पुसों म्हणजे आमचीहि समजूत पडेल. नंतर स्वामीचे विचारास येईल तसें करावें. बहुत काय लिहिणें लोभ आसों दीजे हे विनंती.

¶*The Brahmins of Taluk Suwarandurga disavow the representations made by some busy body of the locality against Moropant Phadke, the Mamlatdar.*

No. 145] [*7-12-1772*

श्री

यादी जदीद गाडदी ठेवायाची आज्ञा जाली त्याविसी कलमे मुा इसने सबैन मया व अलफ.

गाडदी माणूस चांगले कसबी धडधडीत ठेवावे. त्यास सेरा दर आसामीस दरमाहा रुपये.

लोक करार होतील त्यांस आठ महिने दूर न करावे. प्रयोजन असो अथवा नसो; तत्राप ठेवावे. कलम १

सदरहू माणूस चांगले मुसलमान अरब वगैरे चांगले आणावे. तेरा रुपये नख्त सेरा केला जाईल. येणे-प्रो करार करावे. करार.

चाकरीचे तेरखेपासून आठ महिने दूर करू नयेत. चाकरीस जिकडे पाठऊ तिकडे जावे. येणे प्रो करार करावे. करार.

छ २९ साबान मार्गसीर्ष.

तीनसे माणूस गाडदी आणलियास दोन जमादार मर्द माणूस आढलाचे असिले तर पनास रुपया आलीकडे माणूस पाहोन तैनात केली जाईल कलम १

सदरहू गाडादियात दोन जमातदार ये ते पाहून त्याची तैनात पनासपर्यंत होईल. येणेप्रो करार करावें. करार.

¶*This is an order to recruit more Gardis into the Peshwa's service. The sanction appears to be given by Narayanrao against whom they ultimately acted.*

No. 146] *[1772*

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री
गोपालराव गणेश गोसांवी यासी

सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार सुा सलास सबैन मया व अलफ. संस्थान गढेमंडळे प्रा॥ बुंदेलखंड भोसले यांचा अमल खेरीजकरून व पा॥ रेवा व मुकुंदपुर वगैरे माहाल देखील सुहावल प्रा॥ बुंदेलखंड येथील कमावीस सालमजकुरापासून तुम्हांस सांगितली असे ; तरी इमाने इतबारें वर्तोन अमल चौकसीने करणे. मामलतसमधे कलमे

तालुक्यांत मवासाची ठाणी मातबर आहेत, तेथे अमल बसवावयासी सिबंदी खर्च लागेल त्यास तुम्ही कस्त मेहनत करून सालमजकुरापासोन दोन सालांत अमल बसवावा. अमलं बसण्यामुलें सिबंदी वगैरे खर्च जो होईल तो अमल बसल्या सालापासून पांच सालांत उगऊन घेणे.

कलम १

दोन वर्षें अमल बसवावयास व पुढें पांच सालांत सिबंदी वगैरे खर्च बसेल तो तेथेच उगऊन घ्यावा. हुजुरून येक रुपया पावणार नाही. करारा-प्रमाणें मामलत निभवावी. दरम्याने मामलतीची घालमेल सरकारातून करूं नये. केल्यास कचा हिशेब पाहोन फडशा करून दिल्हा जाईल.

कलम १

जोर तलबी संस्थाने सरकारात रुजू नसतील व भोंसल्याचाहि अमल

पा॥ रेवा मुकुंदपूर वगैरे माहाल पौ रा॥ बालाजी गोविंद यांजकडे ऐवज कांही येत आहे म्हणौन कलले. ऐशास सन इसने सबैनात जो ऐवज आला असेल त्याप्रो॥ पुढे साल बसाल त्याजकडे बेदिकत देत जाऊन वरकड अमल तुम्ही करणे.

कलम १

सरकारचे सरदार व रा॥ बालाजी गोविंद वगैरे यांजकडील व भोसले यांचे तालुक्याचे माहाल संस्थानालगते आहेत त्यांस उपसर्ग करूं नये. उपसर्ग जाहाल्यास नुकसानी होईल ती भरून द्यावी.

कलम १

तालुके मजकूर येथील मामलत तुम्हांस सांगितली यामुलें शाह संस्थानास पोहोंचोन संस्थानचे वकील हुजूर आल्यास खंडणीचा यैवज करार

नसेल त्याजवर स्वारी करून जरब बसऊन अमलांत आणावे. होईल तो तुम्हांस सिबंदीचे वगैरे खर्चास दिल्हा जाईल.

कलम १ कलम १

येणेंप्रमाणे साहा कलमे करार केली असेत ; तरी सदरहूप्रमाणें वर्तणूक करणें.

¶*The Peshwa appoints Gopalrao Ganesh to some districts in Bundelkhand and specifies his duties.*

No. 147] *[1772 ?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान साहेबाचे सेवेसी

विज्ञापना. राजश्री जानोजीराऊ निंबाळकर खानदेश प्रांतें आले होते. त्यासी कितेक भावभक्तीचीं पत्रे साहेबाचा स्नेह दर्शऊन लिहीत होते. आपण साहेबाचा व त्याचा स्नेह याजकरितां त्याच्याच लिहिल्याप्रमाणें वर्तणूक केली. कांहीं अंतर न दाखविलें. यैसें असतां तूर्त आमचे लोक आम्हांपासून निरोप घेऊन देशास जातात, त्यां मार्गी उपद्रव करून लुटितात व आम्ही श्रीतुकोबा-बावाच्या कार्याचे निमित्य गाडा व दोघी शुद्रिया व नगारा सुपियास रवाना केला होता, तो कोरटीपासी माणकोपंताने घेतला. याजकरितां आम्ही राजश्री जानोजी निंबालकर यास लिहिलें. त्यास बटकी बजिनस करमलीयांत त्याचे घरीं जासुदानें वळखोन रुबरु दाखविल्या. गाडा बैल व नगारा नानजेच्या ठाणियांत आहेत यैसें असतां आमच्या पत्राचा अव्हेर करून दिल्हे नाहीत. वरचेवरी जाब लिहिला आणखी वरचेवरी लोकांस उपद्रव करितात. त्या (फाटलेले) तात गतवरसीहि त्यानी जे केलें (फाटलेले)च आहे त्याजबदलणीयाचे मु (फाटलेले) होती, परंतु साहेबीं आज्ञा केली कीं तूर्त प्रसंग आहे. आम्ही पुढें समजोन घेऊन. तूर्त तुम्ही यैवज मोबदला कोठें न करणें. आपण आज्ञेप्रमाणेंच वर्तणूक केली. यैसीयासी फिरोन त्यानी हा विचार आरंभिला आहे. अखेर सालचा प्रसंग आमची तो वाट करमलीयावरून, दरम्यान भीमातीरपावेतों त्याची ठाणी, ते ठाणेदार लबाडी करावयास चुकत नाहींत राजश्री जानोजी निंबाळकरहि काना-डोला करून त्यास ताकीद करीत नाहींत. याजकरितां सेवेसी विज्ञापना लिहिली जाते कीं, राजश्री जानोजीराऊ यास जो बुधिवाद ल्याहावयाचा तो लेहून गाडा

दोन बटकी व बैल च्यार व गाड्यावरी बिशाद होती ते व नगारा यैसा श्रीसनिध सुपियास पावे तो अर्थ केला पाहिजे. आणखी कोठें मार्गामधें उपद्रव न होये तें करावें. आपण तों गतवरसीपासून (फाटलेलें) साहेबाच्या आज्ञेवरून सोसीत गेलों (फाटलेले) पोंहचाविलीं असतीं म्हणजे ते (फाटलेले) करिते याजकरितां त्यास जे आज्ञापत्रीं ताकीद लिहिली ते लेहून मार्गामधें उपद्रव न होये तें केलें पाहिजे. मार्गांतील उपद्रव कार्याचा नाहीं ये गोष्टीची पैरवी जैसी साहेबाच्या चित्तास येईल तेणेंप्रमाणें आज्ञा केली पाहिजे, व येक पत्र त्यास जें घ्याल तें आमच्या जासुदाबरोबर देऊन आम्हांकडे पाठविले पाहिजे. तें आपण त्यास प्रविष्ट करून. सेवेसी विदित होये हे विज्ञापना. साहेब तों त्याजविषईं स्नेह धरितात, तो आपल्या जातिधर्मास चुकत नाहीं. विनंती वारंवार याजविषईं ल्याहावी यैसा अर्थ नव्हता; परंतु आज्ञेप्रमाणें सेवक लोकास वर्तावें लागतें हे विज्ञाप्ति. आज्ञेप्रमाणें रवाना (फाटलेले) सेडगर यास रुपये १० दाहा अक्षरी दहा (फाटलेले) विज्ञापना.

¶*The Peshwa is requested to take steps to prevent the plundering activities of Janoji Nimbalkar's officers who, despite the avowed friendship existing between their master and the addressee, persist in capturing stray troopers and attacking the Peshwa's commissariat.*

No. 148] *[1772 ?*

श्री

राजश्री महादजी सदाशिव ठाणे कावी

स्वामीचे शेवेशी

विनंति उपरी. कावी व टप्याचे गावगनाचा उलगडा करावयाचा तपशील :—

१ सरकार तलपंतचा कापूस सरकारांत दरोबस्त कापूस घेण्याविसी लिहिले आहे. रयतेस कापूस पाहिजे असे लोकाचे वगैरे म्हणणे. त्यास ज्या असामीचा कापूस घ्याल ते असामीचे खाड्यांत दर भारी मण दोन प्रमाणे ठेवून बाकीचा घ्यावा. कदाचित एका * * असामीस कमी पाहिजे व कोणास जाजती पाहिजे त्याचे गांवचे गांवीं संमंधानें राखावे. येथें बोभाट मनश्वी येतो, याजकरितां गांवचे गांवीं पाटलास वगैरे सांगोन समाधान राखावे. येविसी पुन्हा लिहिणे न पडे तें करावें.

१ कापूस चौथे हिशाप्रमाणें रयतेचा घ्याल त्या ऐवजीं लागलीच ज्वार ठेवावी. बोभाट येऊं देऊं नये.

+ तलपत = Land paying full rent or assessment, or a half or other proportion of produce to the Government, as distinguished from lands held as private property, or at a quit-rent or rent-free. (Wilson.)

१ पंसा(चा)येतपैकीं निमे भागाखेरीज जाजती कापूस येईल त्याचे मोबदला ज्वार ठेवावी ती आसामीवार निरनिराले ढगले करून ठेवावे. बोभाट येऊं नये.
१ वाट्याचा चौ भागा कापूस घेण्याविसी लिहिले आहे, परंतु दर भारी दोन मण प्रमाणें राखावा व सलामीकरितां जाजती कापूस येईल त्याची ज्वार देऊन जफ्ती खाली करावी राखावी व वाट्याचा बाकी मालहि जफ्तच ठेवावे.

४

येणेंप्रमाणें वहिवाट करून एकंदर यादी गांवगन्नाच्या पाठवाव्या. त्यासहि ताकीद करावी, या उपरी दिवसगत लाऊ नये. माल खराब होतो. पुन्हा लिहिणे न पडे, व कोणाचा बोभाटही न येई असे करावे. दोन प्रो सरकारची परवानगी जाली असे कोणास समथे देऊ नये. तुम्ही तुमचे कार-स्थानें जितका कमी होईल तितका करून भरून घ्यावा. अजमासे पांच सहा हजार तलपतचे खाली तेराहून वरकड सरकारात येई असे कारस्थान करावे व ज्वार कापसाचे मोबदला घ्यावयाचा कोणाचा बोभाट येऊ देऊ नये व कावी टप्याचे व देगाव टप्याचे सालाचे हिशेब कुलारग वार लौकर पाठवून द्यावे. आवकाश कामाचा नाहीं हे विनंती.

¶*Instructions are issued about the collection of cotton from the ryots of Kavi and the villages coming under its jurisdiction.*

No. 149] [*1772 ?*

श्री

सेवेसी विनंती. इमारतीस काम येणेप्रमाणें चालत आहे.

जंजिरे वसई दर्या बुरुजाचे सारा काम लपेट तीनसे हात, त्यापैकीं दोनसे हात घेरा तयार जाहाला. चवदा तोफाच्या जंग्या[1] होऊन त्या बुरुजास भर आठ नव हात उंची भर घालून चवदा तोफा लागू केल्या. बुरुजाचा घेर शंभर हात होणे आहे ते काम जून पायावर चढवावे लागते ते करा-वयासी लाविले आहे. माघअखेर तयार होईल व दर्या बुरजापुढील

जंजिरे अर्नाला येथील इमारतीचे काम साल मजकुरी पश्चिमेकडील सवा दोनसे हात फाज कोरी आहेत. तिचे आतून पक्की इमारत सवादोनसे हात होणे. त्यापैकीं दीडसे हात लांबी पाया नव हात खोली भुईत घालून भुईवर नव हात उंच इमारत आली. पुढें होतच आहे. बाकी पाउणसे हात लांबी पाया घालणे आहे. तो खणावयांस लाविले आहेत. तेवढा

+ अक्षर वेगळें.

१ तोफ ठेवण्यासाठीं तटांतील जागा.

फांज[1] पांचसे हात लांब आहे त्यापैकीं पावणेचारसे हात उंची, एकवीस हात आसून (आतून) अरूंद आहे त्यास तक्तपोसी करून बाहेरून गिलावा करून पावणे चारसे हात लांबी तयार जाले. त्यास चरक्याच्या जंग्या व बंदुकाच्या जेजालेच्या जेरजंग्या देखील तटास पाहरेकरी बसावयासी जागे देखील काम जाले. पुढें हे फाज सवासे हात राहिली ते माघ अखेर होईल. मग फाल्गुन मासापासून त्याचें पुढील फांजेचे काम लागेल.

कलम १

कोट डाहाणू येथील इमारत पहिली पंधरा सोला हात उंची जाली आहे. त्याजवर दुसरे पांच हात उंची उत्तरेकडील फांज तयार जाली. त्याजबराबर सारामीद एकवीस हात करावयास लाविला आहे.

कलम १

पाया भरून काढला म्हणजे ते काम वरते चढेल. सारांष पश्चिमेकडील फाज अखीरसाल करणे सोला हात उंची होये यैसी करितो व उतरेकडील दरवाजियाचे काम दरवाजियाचे बाजूंचे उंच करून दरवाजा बरासा मजबूद करून लाविला व दरवाजियाचे उजवे हाताकडील सर्ज्या बुरूज याचे काम नीच होते तें उंच करून दुशा[2]ला जाली व हाली येशंवत बुरुजाची दुशाल करावयास काम लाविले आहे व पश्चिमेकडील इमारत चालत आहे

कलम १

कोट सिरगांव येथील कोट तेरा हात उंची(चा) जाहाला होता. त्यास खाली साल मजकुरी त्याजवर उंची इमारत पांच सा हात पूर्वेकडील फाज व उत्तरेकडील निमे फाज व पुढें दुसरा दरवजा होत आहे दीड फाज उंची तयार जाली.

कलम १

येणेंप्रमाणें तयार जाहाले हे विज्ञापना.

¶*Repairs of forts in the Bassein territory are reported in detail in this paper.*

No. 150] [*1772?*

श्री

विनंति यैसीजे. शर्फुद्दौलाकडील मजकूर. सविस्तर मजकूर पेशजी लिहिण्यांत आलाच होता. दौलाचा कारभारी आली महंमदखान यख्तीयार तो मध्यस्तास

---

१ भोवतालची भिंत. २ तट.

मिळाला. पहिले तालुकियांत दहा अक्रा लाख रुपये वसूल करून समयास तीन चार हजार फौजेनें चाकरी करीत होते. स्वराज्याचा मख्ता वारीत होते ते हाल्ली मध्येस्तानीं दौलाचा कारभारी हाताखाली घेऊन ती दिवसांत कारभार करून खिताब वगैरे देऊन आली महंमदखान तालुकियांत गेला. इतकी जलदी केली. शर्फुदौलानीं आम्हास निरोप सांगून पाठविला कीं वख्तावर नजर देऊन होते तसे पाहातो असाच समये. खाविंदीच्या दर्ज्यापुढें बोलतां येत नाहीं. बरे, सर्व करणार भरणार आली मंहमदखा माझें नांव मात्र राखितो. मी होये नाहीं दोहोतून एकहि म्हणत नाहीं असे सांगून पाठविले. आम्ही उगेच होतो. तूर्त कारभार जाला त्याचा तपशील

पहिला तालुका
जागिरीत

१ बीड
१ पाथरी
१ धारूर
१ सिरसाले
१

५

यास अकार अजमासे रुपये

११००००० पहिला वसूल आली महंमदखान याणी समजाविला.
३००००० हाल्ली काम दुसऱ्यास सांगू लागले सबब चढ कबूल केला.

१४००००

खर्च अजमासे रुपये.

२००००० महाल मजकूर
२००००० स्वराज्य मख्ता वगैरे
१००००० शर्फुदौला (यांस) दरसाल देत जावे जातीस
२००००० शर्फुदौलाचे लेकास जेमीयेत नेहमी

१९०००० स्वार ५००
५०००० गाडद ५००

२००००

७००००

बाकी रोख सरकारांत देत जावे ७००००

सात लक्ष सरकारांत देत जावे. येणेप्रमाणे कारभार घाटून आहे. ते समई शर्फुदौला यांस दरबारास बोलावन नेऊन लटकण व भुजबंदी दिल्हे, शर्फुल उमराव यैसा किताब दिल्हा. व चिरंजिवास जिगा सरपेच आलम नकारा व यावरून दौला खिताब व आली माखान यास सरपेच व आली यावरजंग खिताब याप्रमाणें विध उरकला. जाले वर्तमान लिहिले असे. या सिवाय शर्फुदौला यांचे जातीस वानवले जागीर आहे. त्याचा मख्ता जाबीतजंग देत होता, त्या प्रमाणें हल्ली सरकारांतून चालीस हजार शर्फुदौलास पावतात. येकूण ते चालीस व हल्ली लाख येकूण एक लाख चालीस हजार रोख जातीस जाले. रवाना छ ३ रबिलौवल हे विनंति.

¶*The writer gives an explanation regarding the revenue administration for Parganas Beed, Pathari and Dharur under one Sharfudaula. He also mentions the honour and the robes of office granted by Sharfudaula to Ali Muhammad Khan.*

No. 151] [*1772?*

श्री

सेवेसी विज्ञापना.

प्रगणें आसेरी येथील किले गंभीरगड घेतला, तें समयीं कोणी कुल कोली वारली आले असतील ते त्यांनीं न्यावें. मागील कोणी पंच सामल्यांत कोली वारली असतील त्यांस तगादा न करावा. याप्रमाणें पत्र राजश्री रामजी माहादेव यासी. गंभीरगड सरकारांत घेतला त्या आलीकडे कुलें किले गंभीरगड घेतला तें समयीं कुमकेस लोक गेले होते, त्यापैकी पंचवीस माणूस ठेविलें आहे; त्यांस निरोप देत नाहीं, येक किल्यास भरती नाही. म्हणून लोक देवावें.

तुमच्या किल्ल्याची भरती जाहली असली तर लोक पाठवणें. पत्र द्यावें. + देणें.

+हस्ताक्षर निराळें.

तुमचीं आलीं असतील तीं नेणें. पत्र द्यावें. पहिलीं पंच साला असतील तीं न नेणें. पत्र द्यावें, +देणें.

पेठेच्या राज्यास ताकीदपत्र बाबती सरदेशमुखीचा तह आहे त्याप्रमाणें सुरलीत अंमल पंताजी मोरेंस्वर याच्या कमाविसदारांकडे देणे.

कलम १

वाजबी मक्ता असेल त्याप्रमाणें अमल देणें. पत्र द्यावें. + देणें.

तांदलाचें सालाबाद दस्तक खेप १ बैल सर २५ आहे. जाजती बैल ५ कुटुंबाची बेगमी होत नाहीं. यास्तव सेवेसी विनंती केली असें, कुरणपैकी गवत सालाबाद ४०००० पावत असतें तें द्यावयाची आज्ञा.

गुदस्तांप्रमाणें गवत + देणें. जिवाजीपंतावर चिठी द्यावी. देणें.

किले गंभीर गड घेतला तें समयीं आमचें लोक रामनगरचें चाहुडीवर होते, त्यांची हत्यारें व पांघरुणें व दिवाणें कापड वहाणा गला व तेल तूप राज्यानें घेतलें आहे. हल्लीं रामाजी माहादेव यांचें ठाणें आहे तरी मशारनिल्हेस पत्र व राज्यास पत्र वस्तभाव द्यावी ऐसें पत्रें.

वाजबी याचें घेतलें असेल तें देणे. पत्र द्यावें. + देणें.

भोरपेखालून कांहीं लांकूड अणविलें आहे त्यास गाड्यास घनगडकरी व धारकर अटकाव करितात त्यांस पत्रें व जकातीचें दस्तक द्यावयाची आज्ञा.

दस्तक द्यावें. + देणें.

किले अशेरीं येथें भात उंदराचे उपद्रवेंकरून फार जायां होते, तर तेथें तक्तपोसी कोठी बांधावी लागते. तरी किले मजकुरीं कोठी बांधावयास आज्ञा.

दस्तक द्यावें. रुजू पत्र द्यावें. + देणें.

¶*Orders are issued in answer to demands made by officials at Gambhirgad and Aseri.*

No. 152] [*1772?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

धारूर सरकारच्या माहालचें वर्तमान तरी त्या प्रांतें आमचें आगमन जालें नाहीं त्याजकरितां बाकी तेढीच राहिली. सालमकुजरीं परस्परें खानदेश प्रांतीं

+ हस्ताक्षर निराळें.

गेलों. तिकडे फौजाचा शह जमीदारानी * * * * अमची येकानें सेळगांवकर त्रिंबकजी देशमुखानें अमचा कमाविसदार धरून जें कर्म करूं नये तें करून सोळासें रुपये घेतले व कमाविसदार धरतांच तमाम परगणियांतील अमल उठला. अद्यापि चौ पगरणियांतील पांचसें रुपये वसूल नाहीं. याजकरितां या प्रांतें आलो आहो. मुलुक डोंगरी बणजोर हटकर तमाम जागाजागा वाडे बळावून बसले आहेत. केवल कटकट करावी तरी अखेरसालचा समये, सिबंदी घरास जावयाचा गवगवा, याजकरितां इलाजेकरून कांहीं कार्यभाग करावा लागतो, व लोकांची समाजावीस खरें लटकें बोलोन करावी लागते. याजकरितां आठ पंधरा दिवस या प्रांतें गुंतोन कार्यभागाचें ऊर्जित करून सेवेसी येतों. सविस्तर वर्तमान सेवेसी आल्यावरी विदित करून. श्रमपरिहार करणार साहेब आहेत. याउपरी दीक्षिताकडे * * रवाना केली आहेत. आज्ञेप्रमाणें येऊन सेवेसी पावता होईल. अंतराये होणार नाहीं. सेवेसीं विदित होये. साहेबीं लिहिलें जे राजश्री (सुलतानजी) निंबाळकर यास आम्ही लिहिलें होतें त्याचें उत्तर त्यानीं लिहिलें आहे, व तुम्हीहि त्यासी श्नेहेंच वर्तणें म्हणऊन आज्ञा केली. यैसियासी आम्ही त्यासी श्नेहेंच वर्तणूक करितों. त्यासी आम्हांसी मामलियामुलें कांहीं विपर्यास तों नाहीं; आम्हांस आपला कार्येभाग बरावाईट करावा लागतो; याजकरितां ते समीप आहेत. बोभाट जातात. परंतु साहेबांच्या प्रतापे सेवकाकडे कोणाच्यानें पाहवत नाहीं. याउपरी आमचा मनसुब्यावरी आठा दिवसा इकडील निर्गम साहेबाच्या * * * * * * सेवेसी येतों. विदित होये हे विज्ञापाना.

¶*The Kamavisdar of Khandesh dwells at large over his difficulties.*

No. 153] [*1772?*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान साहेबाचे शेवेसी

आज्ञाधारक बाबूराव राणे हावालदार व कारकून किल्ले चांवड तालुके शिवनेर चरणांवरी मस्तक ठेऊन साष्टांग दंडवत व नमस्कार विज्ञापना. तागाईत छ १४ रजमानपावेतों किल्ले मजकूरचें व सेवकांचें वर्तमान यथास्थित असें विशेष. इकडील वर्तमान रामाजी जनार्दन जफ्तीचें कामावर पुणेयाहून आले होते. त्यांणीं किल्ले मजकूरचे सरंजामाचे गांव जफ्त करून बंदी केली. मुलकांत वसुलाचें व सरंजामाचें कामावर किले मजकूरपैकी शिपाई गेले होते ते उठऊन दिल्हे व कांहीं धरून नेले आणि कसबें आंबेगाव येथें ठाणें बसविलें. मुलकांत माणूस फिरों न

देत. तेव्हां किल्ले मजकूरची स्वारी पाठऊन त्यांची यांची लढाई होऊन ठाणें उधळून दिल्हें. त्यांजकडील च्यार आसामी ठार केल्या व आठ आसामी जखमी जाहाल्या; त्यांतील सरदार होता तो पडला. किल्ले मजकूरपैकी दोन आसामी जखमी जाल्या. त्यांजकडील दोन घोडीं ठार जालीं व दोन जखमीं व तीन तट्टें येकूण पांच घोडीं धरून आणिलीं; त्याजवरून रामाजी जनार्दन लष्करवाल्यांस मिळोन मुलकांत दंगा बहुतच मांडिला आहे. आमच्याहि स्वाऱ्या त्यांचे पल्ल्यावर फिरत आहेत. लष्करवाले यांणीं दोन तोफां आणून मागणीचा डोंगर किल्ले हडसर येथील पूर्वेस अतकोंशावर आहे, त्याजवर चढऊन पूर्वेचें अंगास आज दोन दिवस मारगिरी सुरू केली आहे. तालुके कर्नाळा येथून च्यारशें माणूस चक्रदेव यांजकडून वेढ्यास आलें तें नाणें घांटानें चढत होते. त्यास किल्ले मजकूरपैकी लोक व किल्ले जीवधन येथील लोक जाऊन घाटाची बंदी केली, त्याजवरून ते लोक माघारें फिरोन आहुदे घांटानें चढावयास गेले तों तेथेंहि इकडील लोक व किल्ले सिदगडकरी लोक जाऊन लोक माघारें फिरविले. नंतर ते लोक रातोरात निघोन मालशेजचे घांटानें चढोन वरते लष्करांत आले. हडसरें-भोंवतीं नाकेबंदी करून शह दिल्हा आहे. हल्ली रामाजी जनार्दन याजकडील जफ्तीचें काम दूर करून रामाजी मोरेश्वर यांजकडे जालें. त्याचा कारकून शामजी लक्ष्मण जुन्नरांत होते ते गढींत जाऊन राहिले आहेत. त्यांणीं किल्ले हाय येथें पत्रें सूर सन्न म्हणोन आणिलीं त्याच्या नकलां किल्लयास पाठविल्या त्याची नकल सेवेसी पाठविली आहे. वरकड मजकूर राजश्री सुभेदार यांणीं लिहिला आहे त्यावरून निवेदन होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The garrison of fort Chawand obstructed Ramaji Janardan, a Government officer sent from head-quarters to confiscate lands attached to the fort. The paper reports the complaint to the Peshwa.*

No. 154] [*28-3-1773*

श्री

राजश्री नारो आपाजी गोसावी यासी

सुा सलास सबैन मया व अलफ. पुण्यांत पाण्याचा तोटा फार जाला आहे व नलाचे पाण्यांत किडे पडले आहेत म्हणोन ऐकिले. त्यास खासा स्वारी पुण्यांस आली असतां येक महिना पाणी पुरेल कीं नाही व नलाचे पाण्यांत किडे पडले की काय ते लिहिणे. तल्यांत विहिरी खणल्याने पाणी पडेसे असल्यास दाहावीस विहिरी खणावयाचें काम चालीस लावणे. जाणिजे छ ४ मोहरम.

¶*In view of the Peshwa's impending stay at Poona, Naro Appaji is asked to state whether the water-supply there was sufficient and pure and if not, to dig more wells.*

No. 155]

श्री

विनंती सेवक त्रिंबकराव सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. लस्करांत वोली वैरण न आणावी व घरे न मोडावी. वाळली वैरण आणावी ऐसी ताकीद करावी येविसी आज्ञा आली. त्यासी आज्ञेप्रमाणे गोटांत ताकीद केली आहे. आज्ञेप्रमाणे आपले मिसलीवरच आहे. हे विज्ञाति.

¶Trimbakrao Sivdeo puts into force Peshwa's order about securing forage for the army in a peaceful manner.

No. 156] [*29-8-1773*

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री रघुनाथ हरि गोसावी यासी

सेवक नारायणराव बलाल प्रधान नमस्कार विा. उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणे विशेष. आपाजी राम गाडगील याची आसामी साा वोडसे तालुके झासी येथे पेशजीपासून दीडशे रुपयाची चालत होती. त्यास ते मृत्य पावले, सबब त्याचे पुत्र राजश्री कासीराव आपाजी याचे नावे सदरहू आसामी साल मजकुरापासून करार करून पेशजीप्रमाणे सालिना वेतन रुो १५० दीडशे करार केले असेत. तरी सालाबादप्रमाणे सदरहू वेतन माारनिलेस पावीत जाणे. +जाणिजे छ १० जमादिलाखर सुा आर्बा सबैन व मया व अलफ.

¶Narayanrao Ballal renews the grant of an annual remuneration of Rs. 150 to Kasirao Apaji Gadgil and informs Raghunath Hari Newalker accordingly. The letter is important from the handwriting of Nana Fadnis which appears in the last line of the letter. It shows that Nana Fadnis functioned as the sole karbhari of Narayanrao up to the eve of his murder.

+ 'जाणिजे' पासून अखेरचा सर्व मजकूर नाना फडणिसाचे हातचा आहे. यावरून नाना फडणिस नारायणरावाचे कारभारावर अखेरपर्यंत होता हे निर्विवाद आहे. खुनाच्या आदले दिवसाचें हें पत्र आहे. कागद रवाना झाला नाही म्हणून पुण्यांत राहिला; नाहीं तर तो रघुनाथ हरीकडे गेला असता.

No. 157] *[12-10-1773*

पो छ २ साबान कार्तिक
शुा ४ इंदुवासर मो
पेडगाव.

श्री

अपत्ये गोविंदाचे सां नमस्कार विज्ञापना ता आस्विन वद्य येकादसीपावेतो येथास्तित असे विशेष. राजश्री केदारजी सिंदे यांचें घर पेशजी जप्त होऊन जिनस सरकारात आला तो ज्या कारखान्याचा जिनस त्या कारखान्यात जमा जाहाला तो लिहून काढावयास रा बाजीपंत भावे यांसी लाविले आहे. त्यास येविसीची निकड फार आहे; तरी सत्वर जाबता लस्करात पाठऊन देणे म्हणोन आपली दोन तीन पत्रे आली. त्यास जिनस जमा आहे तो लिहून काडिला; परंतु त्यापौ कारखान्याकारखान्यांतून जिनस सिंदे यास पावला आहे तोहि लिहून काढिला पाहिजे. येकेका कारखान्यात दाहापाच वेला लिहून पाठवावे तेव्हा कारकून येऊन येक दुसरा जाबसाल होतो. याप्रो त्यास हिसके फार. बाजीपंत भावे याजकडे दुसरे काम तूर्त नाही. सिंदे याची जमा काये, त्यापो पावले काय, बाकी राहिले काय हेच नेहेमी लिहून काढितात. बहुत करून तयार जाहलेच आहे. पुर्ते जाहलियावरी लिहून पाठऊ; येविसी राजश्री आपाजीपंत गोंधलेकर यांस श्रीमंत राजश्री नाना याणी लिहून पाठविले, त्यावरून तोह आम्हास निकड फारच करितात. ज्या गोष्टीने लवकर तयार होऊन लस्करात पावे तेच करितो. पो होनगुदे येथील सन सलास सबैनचा हिशेब सत्वर आणऊन, दसरी तालेबंध धरून पाठऊन देणे म्हणोन लिहिले. त्यावरून हिशेब दसरी आणविला; आणि पाहिला तो वसुली जमा धरून हिशेब लिहिला आहे. पो मजकुरची जमाबंदी अद्याप जाहालीच नाही. वसुली हिशेबाचा तालेबंद धरिल्याने कम जाजती येथास्तित नाही, याजकरिता तूर्त इजमाईली समजीचा सूड लिहून पाठऊन देतो. पाटीलक्या वगैरे वतनाचा झाडा तयार करून पाठवितो. तालुके सिवनेरी व तालुके सोलापूर येथील अजमास व गुदस्ताचे तालेबंद तयार जाहाले. राजश्री उधोपंत दादा पुढे लस्करात गेलेच आहेत. अजमास व तालेबंद घेऊन कारकून लवकरच येऊन पोहचतील. श्रीत्रिंबकेश्वरचाहि अजमास लवकरच पाठवितो. पा नेवासे व पा पारनेर व पा बागलकोट व प्रांत वाई येथील अजमास सालमजकुरचे करार जाहाले. त्याच्याखेरीज राजश्री गोविंदपंत आपटे यांजकडील तेरीज तप-

---

+ अंदाजी.

सीलवार ओढून दिल्याचे आहेत ; व सदरहू च्यार माहालचा सूड आलाहिदा लिहून पाठविलो. राजश्री आबाजी माहादेव याच्या आसाम्या वगैरे निवडून पाठविल्या आहेत. कलावे हे विनंती.

¶One Govind reports why there was delay in sending Kedarji Sindia's accounts and says he is expediting the matter.

No. 158]

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य

राजश्री सखारामपंत स्वामी गोसावी

यांसी

पोष्ये विठल सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे विशेष. कृपा करून पत्र पाठविले ते पावोन परम समाधान जाले. यैसेच निरंतर पत्रद्वारे सांभाळ करीत गेले पाहिजे विशेष. सर्व मजकूर श्रीमंताच्या पत्रावरून विदित होईल. आपण लिहिले की घरचे सुख धरून बहुत दिवस न राहाणे आणि क्षुलक गोष्टीसाठी वाईट दाखवावे यांत जबून दिसते. ये गोष्टीसाठी * * च्यार वेला सांगितले परंतु स्मरण राहात नाही म्हणून लिहिले. त्यास प्रस्तुत तर कांही विपर्यास दाखविला नाही. पालनपूरची सनद मावारी पाठविली म्हणून लिहिले आसेल तर आम्हासे सोरठात दों लक्षाची जागा द्यावी यैसा करार. आमच्या मते सोरटात निमे द्यावे, निमे पालनपूर द्यावे, त्यास आपण कदीम तीन लक्ष पालनपुरास येक पालनपूरच पाठविले याकरिता सनद मावारी पाठविली की आमचा हाहि करार सोरटचा आहे. घोड्याचे राण द्वारकासन्निध याकरिता सोरटच आसावे. त्यास तुम्ही पोवार पांडबा गोपालराव व थोरले सरदार यास देऊ तेव्हाच तुम्हास देऊ. त्यास तुम्हासहि दंडक पडला आहे की दुसऱ्याचे मालेस जोडावे. धोडोबानी इद्रोबाचे मालेस जोडिले, परंतु प्रसंग पडला तेव्हा निवड सहजच जाली. आद्यापहि काही जाले नाही. प्रसंग हमेशा पडतील. हे कर्म यैसे आहे की टेकीवर आहेत. टेकीस आल्यास काट कोण करील, कोण न करील, मरण तृणाप्रमाणे कोण धरील हे ध्यानांत आसो द्यावे. चौघाबराबर धरल्याचे सकट वाटत. वरकड त्या सरजामाचा आजच खजाना यावा यैसे नवते, परंतु लौकिक संपादावा लागतो. प्रसंग पडतो तेव्हा कळावयाचे तें धन्यास कळते. मग सर्वत्र सारखे हे येक आपूर्व वाटते. वरकड मजकूर तर दोघे सरदार वेगळे करून आम्ही मरणास आथवा

जबून = गैरमातबर.

स्थळ प्रत

निष्टेस कोण्हास गोष्ट सांगू देणार नाही. संरजाम जामची मिष्टा असली तर ईस्वरे देवील, नाही तर जे आहे ते फारच आहे. ईस्वर इछेने थोडे थोडे सर्व आनकूल आहे. खावंदासी वाईट मनातून कधी दाखवणार नाही. वरहलक्षेण-भर रुसू, मग काहीच नाही. आपणहि सिकेवणीचे लिहिले, उतमच जाले. पहिलेपासून आपण सांगतच आहेत त्याप्राा आम्ही चालतच आहों. पुढे चाढ. विशेष काय लिहीणे हे विनंती.

¶Vithal Shivdeo Vinchurkar expresses his bitter disappointment for not being assigned the particular provinces in Gujarat he was keen on securing.

No. 159]

पाा क्र १६ रजब भिवराव

श्री

राजश्री नरसिगराव जाधव गोसावी यासी

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रीो भिवराव शामजी रामराम विनंती उपरी. श्रीमंत राजश्री पंतसाहेब याणी व तुम्ही आम्हापासी किर्या घेऊन आम्हास कार्यास पाठविले. आम्ही कार्य बोलल्याप्रमाणे रा आपाजीपंत याचे गुजारतीन राजकारण ठीक करून रा आपाजीपंत व मुस्तुपाखान पंधरा दिवसाचा वाइदा करून गेले. त्यास तीन महिन्यानी मुस्तुपाखान कटाळून न पुसतां उठोन आला ते वर्तमान विदित जाले. त्याउपरी दुसरे पत्र व ताजखान पाठविला त्यास दोन महिने जाले, स्वाल जाब काही कलत नाही. यैसे आसता आम्हास लबाड केले. खावदांकडे नामुसकी आली. सनदा होयाच्या नव्हत्या तर आम्हास कष्टी करावयाच नव्हते. कर्ज तीस रुपये खादले. याउपरी सात पाच परगण्याच्या सनदा हारइलाज करून आले पाहिजे. आजच्या प्रसंगी स्वस्थान हातास लागते. वतनदार मायेमध्ये गोविले आहेत. आजिचा प्रसंग पुढे दाहा हाजार रुपये खर्च केल्याने साधनार नाही, त्वरा करावी. आम्हास तोंडगसी न द्यावे. खावदाच्या कीर्येवर पात्याजलो. तुलसी देवाच्या बाधून ठेविल्या आहेत, त्याचे स्मरण आसिले पाहिजे. सनदा अल्याखेरीज आमची सुटका होत नाही. कलल पाहिजे. बहुत काये लिहिणे कृपा लोभ आसो दीजे हे विनंती. राजश्री आपाजीपंताने किलेदारासी बोलून त्याची कीर्या घेऊन आपण वचन देऊण आम्हास गोऊन पाडून गेले. थोरपण केले. पुढे आणिखी मनसुभा याजप्रमाण करतील. कळल पाहिजे हे विनंती.

¶Bhivrao Shamji takes Narsingrao Jadhav to task for the latter and the Peshwa not having kept their word in a delicate matter which had been entrusted to the writer.

No. 160] [*1766 ?*

श्री

राजेश्री राव प्रधान

गोसावी यासी

